


अत्यंत वेगाने प्रचंड प्रमाणावर लेखन करण्याबाबत ड्यूमाची बरोबरी कोणताही लेखक करू शकला नाही. मायकेल लेव्ही या ब्रिटिश प्रकाशनसंस्थेने ड्यूमाचे २७७ खंड प्रकाशित केले आहेत, यावरून त्याच्या लेखनशक्तीची कल्पना येते.

१८४४ साली या कादंबरीचे ८ भाग लिहिले. ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या द्वारे फ्रान्सच्या इतिहासाची पुनर्रचना करण्याची महत्वाकांक्षी योजना ड्यूमाने आखली, आणि १२०० ग्रंथांचा प्रचंड पर्वत अल्पावधीतच रचला. त्यापैकी ही एक कादंबरी. अमाप पैसा मिळवूनही कर्जदारांच्या जाचात ड्यूमा मरण पावला.

'तीन शिलेदार' ही त्याची पहिलीच कादंबरी. या कादंबरीने त्याला अफाट कीर्ती मिळवून दिली. आपल्याकडे 'ऐतिहासिक कादंबरी' म्हटली म्हणजे हरिभाऊ आपट्यांचे नाव डोळ्यांपुढे उभे राहते, तसेच फ्रेंच भाषेत ड्यूमाचे. पुढच्या 'वीस वर्षांनंतर' राजकीय घडामोडींत शिलेदारांचे महत्व उंचावत गेले होते. चांगल्या हेतूने पराक्रम करून त्यांनी आपापल्या कर्तबगारीवर ते स्थान मिळवले होते.

दुर्जनांचे निर्दालन आणि न्यायाची स्थापना करू पाहाणाऱ्या उमद्या शिलेदारांबद्दल, आबालवृद्धांना आकर्षण वाटत असे. तथापि काळ फिरला की परिस्थिती बदलते. फ्रान्समध्ये अराजकसदृश कालखंड आला, डार्टा व त्याच्या साथीदारांचे वय झाले होते. तरीही त्यांचे प्रयत्न चालू राहिले, या रंगेल व साहसी शिलेदारांनी राजाचीच उचलबांगडी करण्याचा घाट घातला, पण त्यात अपयश येऊन त्या पराक्रमी लोकांचा दुर्दैवी अंत झाला. त्याची ही कथा

*मुंबईतील ढवळे आणि 'पॉप्युलर'चे भटकळ ही प्रकाशन क्षेत्रातील अग्रगण्य नावे. त्यांनी 'ढवळे पॉप्युलर' या संयुक्त विद्यमाने 'नंदी पुस्तके' अशी मालिका प्रकाशित केली. त्या अंतर्गत १९५८ साली प्रसिद्ध झालेले दत्त आपटे यांचे हे अनुवादित पुस्तक.*


| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | माझारीनची जुनी पत्रे | १७० |
| २ | मॉन्शर फोके | १७३ |
| ३ | राऊल | १७६ |
| ४ | ऑथाची अटक | १७९ |
| ५ | ऑथाची सुटका | १८४ |
| ६ | पार्थाचे गुप्त बेत | १८७ |
| ७ | वॉक्सला | १९२ |
| ८ | आरामीची करामत | १९७ |
| ९ | राजाची सुटका व फिलिपचे दुर्दैव | २०२ |
| १० | बेल बेटाकडे | २०५ |
| ११ | शेवट | २०८ |



# लोखंडी मुखवटा

## १. माझारीनची जुनी पत्रे

''आपण मॉन्शर फोकेचे जिवलग स्नेही आहात असं कळलं, म्हणूनच मी आपल्या भेटीस आले आहे.'' मादाम शेव्हरूज नम्रतेने म्हणाली.

''मित्र!'' मुद्रेवर शक्य तेवढे आश्चर्य दाखविण्याचा प्रयत्न करीत आरामी म्हणाला, ''मी एक धर्मगुरूचा पेशा पत्करलेला सामान्य मनुष्य आहे, आणि मी त्यांचा चाहता आहे एवढंच!''

''त्यांनीच तुम्हाला बिशपचा हुद्दा मिळवून दिला ना?''

''होय!''

''शिलेदारी-पेशातून निवृत्त होणाऱ्या उतार वयातील माणसाला ही जागा मोठी छान आहे नाही?''

''तुला म्हातारपणी राजकारणाचे डाव खेळण्याची उमेद आहे पण मला कोठे आहे?'' आरामीच्या मनात विचार आला, व मग तो सौम्यपणाने म्हणाला, ''यावरून तुम्ही अंदाज बांधला होय?''

''साहजिक आहे, आणि शिवाय त्यांच्या मालकीच्या बेलबेटावरही तुम्ही त्यांच्याबरोबर गेला होता, हेही मला समजलं. तेथे काहीतरी तटबंदी वगैरे करण्याचा मॉन्शर फोकेंचा विचार आहे म्हणे.''

''हे बेट त्यांच्या मालकीचं आहे एवढंच मला माहीत आहे!''

''माझी कल्पना, तेथील लष्करी सुसज्जतेसंबंधी त्यांना सल्लामसलत देण्यासाठी तुम्ही गेला होता.''

''मी धर्मगुरूचा पेशा पत्करल्यापासून या सर्व गोष्टी विसरून गेलो आहे.'' आरामी तुसडेपणाने म्हणाला. मादाम शेव्हरूजचा चेंगटपणा त्याला चांगलाच जाणवू लागला होता.

''अलीकडे बॅस्टालचे तुरुंगाधिकारी मॉ.बीमा हेही तुमच्या स्नेही मंडळीत आहेतसे म्हणतात!'' त्याच्या तुसडेपणाकडे दुर्लक्ष करून शेव्हरूजने आपले घोडे पुढे दामटले.

''या बयेचा मला कशात तरी गुंतविण्याचा विचार दिसतो. थेरडीची कारस्थानी वृत्ती अद्यापि शाबूत आहे म्हणावयाची.'' आरामीच्या मनात विचार आला व मग तो म्हणाला, ''कसचं! कसचं!! माझी त्यांची ओळख आहे झालं!''

''डॉर्टा म्हणत होते की, ते तुमच्या अर्ध्या वचनात आहेत म्हणून!''

''तसेच काही नाही, मी त्यांना क्वचित् प्रसंगी आर्थिक मदत करतो एवढंच!'' ही बया आपणास भेटावयास येते काय आणि नाही ते प्रश्न विचारून सतावते काय याचाच उलगडा आरामीला होईना. म्हातारी काहीतरी कारस्थानाच्या मागे आहे एवढा कयास मात्र त्याने बांधला. डॉर्टा हिला काही माहिती सांगत असेल असा विचारही त्याच्या मनास शिवला नाही. ''पण बाईसाहेब, ते जाऊ द्या सारं, आपण कोणत्या विशिष्ट हेतूनं माझ्याकडे आला आहात याचा एकदा खुलासा केलात तर बरं होईल.'' त्याने स्पष्टपणाने सवाल केला.

''नाही म्हटलं, आपण जेजुइटांचे मुख्य धर्मगुरू आहात, पण ही नेमणूक स्पेनच्या राजेसाहेबांकडून व्हावी लागते व तो मनुष्यही स्पेनचा नागरिक असावा लागतो, म्हणून म्हटलं आपली ही जागा टिकणार का?''

''आपण तर स्पेनच्या राजेसाहेबांचा निरोप घेऊन आल्याप्रमाणे बोलत आहात बाईसाहेब!'' आपला संताप शक्यतो आवरण्याचा प्रयत्न करीत आरामी म्हणाला, ''आपली समजूत चुकीची आहे.''

''काही असलं तरी स्पेनच्या राजेसाहेबांची मान्यता मी आपणास मिळवून देऊ शकेन!''

''अस्सं!''

''पण माझी एक मागणी आहे.''

''कोणती?''

''माझी सर्वस्वी वाताहात झाली असल्यानं मला पैशाची अत्यंत नड आहे.''

''अस्सं होय थेरडे!'' आरामी पुटपुटला व मग उघडपणाने म्हणाला, ''आणि मी कुठे कुबेर लागून गेलो आहे!''

''तुम्ही नसला तरी तुमचे दोस्त आहेत की!''

''तुम्ही फोकेंना उद्देशून बोलत आहातसं दिसतं पण त्यांचीही आर्थिक परिस्थिती कमालीची बिघडली आहे हे मी तुम्हाला सांगतो.''

''पण मजकडे असलेली पत्रं निराळंच सांगतात!''

''कुणाची पत्रं?''

''कार्डिनल माझारीन यांची!''

''माझारीनची पत्रं! आणि ती काय सांगतात?''

''सुमारे तीन कोटि फ्रँक्स तुमच्या स्नेह्यांनी सरकारी खजिन्यातून उचललेले दिसतात!''

आरामीने आश्चर्याने आऽच वासला. ''काय म्हणता? माझारीनची पत्रं तुमच्या ताब्यात असून त्यात अशा अर्थाचा मजकूर आहे? ही गोष्ट मॉ.फोकेंच्या नजरेला तुम्ही आणलीच असेल?''

''नाही, तशी वेळ अद्यापि आलीच नाही, पण ती पत्रं मात्र मी अद्यापि नीट जपून ठेवली आहेत.''

''मग आता ती वेळ आली वाटतं?''

''होय!''

''ही पत्रं तुम्ही फोकेंना दाखवणार असालच?''

''तत्पूर्वी आपली भेट घ्यावी म्हणून मी आले आहे.''

''या प्रकरणात काही तरी पैसे काढण्याचा आपला विचार दिसतो.'' आरामी कडवटपणाने म्हणाला.

''उघड आहे. माल पाच लाख फ्रँक्सची गरज आहे.''

''वाऽ, छान योजना आहे.''

''सौदा काही महाग नाहीसं मला वाटतं.''

''पण तो फोकेंना पटणं शक्य नाही! फोकें ती पत्रं मान्य करणं शक्य नाही, कारण त्यामुळं त्यांची अब्रू पणाला लागणार आहे, पत्रं खरी असली तर! आणि खोटी असतील तर अशा खोट्या गोष्टी करण्याबद्दल आपल्या सर्व सामर्थ्यानिशी तुम्हाला ते जाब विचारतीलच!''

''मला धमकी देण्यापेक्षा, सदर पत्रं फोकेंच्या शत्रूच्या हाती जाण्यात धोका आहे हे समजून घेतील शिलेदारसाहेब, तर अधिक बरं होईल नाही?'' शेव्हरूज शांतपणाने म्हणाली.

''फोकेंचा व स्पेनच्या राजेसाहेबांचा ऋणानुबंध चांगला असल्यानं फोकेंचे शत्रू त्यांना उपद्रव करू शकतीलसं वाटत नाही.''

''फ्रान्समधील पक्षोपपक्षांच्या लढ्यात स्पेनचे राजेसाहेब आपलं सामर्थ्य पणाला लावतील अशी कल्पना करणं धाडसाचं होईल नाही?''

''एकदा पक्षोपक्षांची लढत चालू झाली म्हणजे काय होईल आणि काय नाही हे कुणी सांगावं?''

''ठीक आहे, मग मी जाते तर!''

''आपण त्या पत्रांचा उपयोग करून काही पैसे काढण्याचा विचार करीत असाल तर त्याचा उपयोग नाही एवढं लक्षात ठेवून आपण जात आहात ना?''

''मी आता इतर काही व्यक्तींना भेटून काय ते ठरवीन!''

''तू कितीही दमदाटी कर हडळी!'' आरामी मनात म्हणाला, व तिला निरोप देण्यासाठी उठून उभा राहिला. शेव्हरूजला कळून चुकले की, या प्राण्यामार्फत मॉन्शर फोकेंच्यावर दडपण आणून काही पैसे उकळणे कठीण आहे.

माझारीननंतर फ्रान्सची अधिकारसूत्रे धारण करणाऱ्या फोकेंना गंडविण्यासाठी आरामीच्या मध्यस्थीचा

उपयोग होईल ही तिची आशा व्यर्थ ठरली, पण त्याचबरोबर आपल्याशी अशा तुसडेपणाने वागणाऱ्या आरामीचाही तिला संताप आल्याशिवाय राहिला नाही. धर्मगुरूचा पेशा पत्करल्याचे सोंग करून हा प्राणी फ्रान्सच्या राजकारणातील एकूण एक हालचालींशी परिचित आहे याबद्दल तिची खात्री होती. आरामीचा निरोप घेऊन बाहेर पडताच फोकेंचा दुय्यम अधिकारी व अंतस्थ शत्रू मॉन्शर कोलबर्ट याच्या घराकडे तिने आपला मोर्चा वळविला.

■ ■ ■

''आज बाईसाहेबांनी इकडे कुणीकडे पायधूळ झाडली?'' शेव्हरूजचे स्वागत करून कोलबर्टने विचारले.

''आपणास एकमेकांचे साहाय्य पाहिजे आहे म्हणून मी आले आहे.'' एका खुर्चीवर बसकण मारून शेव्हरूजने प्रस्तावना केली.

''आपलं बोलणं मला उमगलं नाही बाईसाहेब!'' कोलबर्ट विनयाने म्हणाला.

''आपण फोकेंचे दुय्यम आहात, पण त्यांची जागा आपणास मिळावी असं तुम्हास वाटत नाही का?'' शेव्हरूजने उघड उघड सवाल केला.

''हॅड हॅड! आपला काहीतरी गैरसमज झाला आहे. मॉन्शर फोकेंचा मी नम्र सेवक आहे व त्यांच्या आज्ञा पाळण्यापलीकडे मला कोणतीच महत्वाकांक्षा नाही!''

''आपण वस्तुस्थिती छपवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहात अशी माझी समजूत आहे! फोकेंनी आपली जागा अनेक हिकमतींनी टिकवून धरली आहे, त्यांना तेथून उठवून लावण्याचा प्रयत्न फ्रान्समध्ये होत नसेलसं मला वाटत नाही, आणि तसे प्रयत्न चालू असतील तर त्यांना तुम्ही उत्तेजन देत नसाल असंही मला वाटत नाही. आपणाला ती जागा मिळावी असं तुम्हास वाटणं अगदी स्वाभाविक आहे.''

''मग मी आपणास खात्रीने सांगतो की, मला तशी इच्छा कधीच झालेली नाही. खुद्द फ्रान्सच्या राजेसाहेबांनीच त्यांना तेथून हलविण्याचं ठरविलं तरच ही गोष्ट शक्य होईल, दुसऱ्या कोणी ही गोष्ट करू म्हटल्यास शक्य नाही आणि मलाही त्याच्याशी कर्तव्य नाही!'' कार्डिनल रीशल्यूसारख्या कसलेल्या मुत्सद्द्याच्या तालमीत तयार झालेल्या एका इरसाल बुद्धीशी आपण बोलत आहोत याची संपूर्ण जाणीव ठेवून कोलबर्ट मोठ्या कौशल्याने बोलण्याचा प्रयत्न करीत होता.

''मग राजेसाहेबांनी हा बदल केल्यास तुमची ना नाही तर?''

''राजेसाहेबांनी एखादी गोष्ट करावयाची म्हटल्यास तिला विरोध करण्याचं सामर्थ्य निदान फ्रान्समध्ये तरी कुणाला असेलसं वाटत नाही!''

''पण राजेसाहेबांनी ही गोष्ट करावी म्हणून काही महत्वाचे कागदपत्र मिळाल्यास तुम्हाला बरं वाटेल नाही?''

या प्रश्नाने कोलबर्ट चांगलाच बुचकळ्यात पडला व मग म्हणाला, ''मला वाटतं गेल्या सात-आठ वर्षांत असे अनेक प्रयत्न झाले आहेत; पण मॉन्शर फोकेंना त्यांच्या जागेवरून हलविण्यात एकालाही यश मिळालेलं नाही!''

''मॉन्शर कोलबर्ट! हे प्रयत्न करणारी माणसं शेव्हरूजच्या तोडीची नव्हती आणि त्यांच्या हाती कार्डिनल माझारीनची पत्रंही पण नव्हती हे तुम्ही विसरता! मॉन्शर फोकेंना गोत्यात आणण्यास, त्यांची गुन्हेगारी सिद्ध करण्यास तसाच खंबीर पुरावा पाहिजे, नाही?''

''गुन्हेगारी?''

''चोरी म्हणा पाहिजे तर!''

''चोरी?''

''का, तुमचा चेहरा जरा खुललेला दिसतो. माझ्याजवळचा पुरावा फोकेंना हद्दपार करण्यास अगर बॅस्टाइलच्या तुरुंगात त्यांची रवानगी करण्यास पुरेसा आहे हे मी तुम्हाला निश्चयानं सांगू शकते.''

''म्हणजे आपण सर्व जुळणीच करून आलेल्या दिसता? बराच मौल्यवान दिसतो तुमच्याकडील पुरावा!''

''मौल्यवान! दहापाच लाख फ्रँक्स खर्च करूनही असला मौल्यवान पुरावा मिळणं शक्य नाही!''

''म्हणजे हा पुरावा मिळण्यासाठी मी काय द्यावं हेही तुम्ही ठरवून आलेल्या दिसता?''

''माझ्या मालाच्या किंमतीचा मी अंदाज दिला आहे, आता तो घेणाऱ्याच्या गरजेचा प्रश्न आहे!''

''मला वाटतं माल पाहिल्याशिवाय कोणतंच गिऱ्हाईक त्याची किंमत मान्य करणार नाही.''

''हे लक्षात घेऊनच, फोकेंची गुन्हेगारी सिद्ध करणारी माझारीनची पत्रं अपणास दाखविण्याची तयारी मी ठेवली आहे.''

''आपण ती इथं आणली आहेत काय?''

''त्यांच्या नकला आणल्या आहेत. सौदा पटल्यावर अस्सल पत्रांचा प्रश्न निर्माण होईल, नाही?''

मादाम शेव्हरूजने आपल्या छातीशी दडवून ठेविलेले कागदपत्र बाहेर काढताच कोलबर्टने जवळ जवळ झडप घालूनच ते हस्तगत केले व एखाद्या अधाश्याप्रमाणे भराभर वाचून काढले.

''ओऽ हो! उत्तम!!'' पत्रे वाचून होताच तो आनंदाने ओरडला.

''मग बोला आता पैशाची भाषा!''

''पण या नकला आहेत; अस्सल पत्रं?''

''किंमत पटली?''

''दोन लाख फ्रँक्स?''

''पाच लाख! आपण होय किंवा नाही म्हणू शकता, पण घासाघीस करू शकत नाही!'' उठण्याचा अभिनय करीत शेव्हरूज म्हणाली.

''ठीक आहे, आपली किंमत केव्हा व कुठे द्यायची? व अस्सल पत्रं आपण केव्हा व कशी देणार? या प्रश्नांचा विचार करण्यास आता हरकत नाही.'' कोलबर्ट आनंदाने म्हणाला.

थोडा वेळ उभयतांचे हलक्या आवाजात काही संभाषण झाले व नंतर कोलबर्टने आपल्या चपराशाला गाडी जोडून आणण्याचा हुकूम दिला.

अल्पावधीतच कोलबर्टच्या प्रासादातून एक गाडी त्या दोघांना घेऊन भरधाव बाहेर पडली.

●●●

## २. मॉन्शर फोके!

गेल्या प्रकरणातील हकीकतीनंतर तीन किंवा चार दिवसांनी एके काळची फ्रान्सची राणी पण आज नुसतीच राजमाता, ॲन हिला भेटण्यासाठी एक स्त्री आली. ॲन वृद्धापकाळाने व आजाराने बेजार असल्याने सहसा कोणास भेटत नसे; पण या स्त्रीने आपला चेहरा बुरख्याने आच्छादला होता, व शिवाय तिने कोलबर्टसारख्या अधिकाऱ्याचे ओळखपत्रही आणले होते, त्यामुळे ॲनने सदर स्त्रीला आत घेऊन येण्यास दाईला सांगितले.

आत येताच तिने राजमातेला अभिवादन केले.

''चौदाव्या लुईची माता ॲन, हिच्यापुढे आपण तोंड झाकून उभ्या आहात याची जाणीव आहे तुम्हाला?'' राणीने क्षीण पण करड्या आवाजात विचारले.

''होय राणीसाहेब, पण मला आपणाशी अत्यंत एकांतातच बोलावयाचं आहे.'' ती स्त्री उत्तरली व मग राणीने खूण करताच तिच्या सर्व परिचारिका तेथून निघून गेल्या.

''मी आपली जुनी मैत्रीण, राणीसाहेब!'' तोंडावरील बुरखा दूर करीत शेव्हरूज म्हणाली ''राणीसाहेब आनंदात आहेत ना?''

शेव्हरूजला पाहाताच राणी चांगलीच चमकली पण विशेष आश्चर्य न दाखविता ती म्हणाली, ''आनंदात! मला वाटतं माझ्याइतकी दु:खी स्त्री साऱ्या जगात नसेल! शारीरिक व मानसिक अशी दोन्ही स्वास्थ्ये मला नाहीत सध्या शेव्हरूज!'' एक दीर्घ उसासा सोडून राणी म्हणाली.

''मलाही वृद्धापकाळी वनवास सोसावा लागत आहे! राणीसाहेबांना माहीतच आहे की, मी जुन्या राजेसाहेबांच्या गैरमर्जीत होते, व तीच परंपरा हल्लीच्या राजेसाहेबांनी पुढे चालू ठेवली आहे. मी आपली गाठ घेण्यास उघडपणे आले

असते तर माझा इथंपर्यंत प्रवेश झाला असता की नाही याचीच शंका आहे.''

''शेव्हरूज, तू आलीस हे फार बरं झालं. कित्येक वर्षांनी तुझी भेट होत आहे, नाही? फार काय, एकदा तर तू वारल्याचीच बातमी मी ऐकली!''

''राणीसाहेबांचा या बातमीवर विश्वास बसला नाहीना पण?''

''कसा बसेल?''

''नाहीच बसणार! कारण मरणापूर्वी आपला सारा गुप्त पत्रव्यवहार राणीसाहेबांच्या हवाली करण्याचा माझा निश्चय होता. आपल्या पश्चात् हा गुप्त पत्रव्यवहार दुसऱ्या कुणाच्या हाती लागणं धोक्याचं आहे हे आपली विश्वासू मैत्रीण विसरणं शक्य नाही!''

शेव्हरूजच्या या बोलण्याने राणी चांगलीच बुचकळ्यात पडली. चिंतायुक्त स्वराने तिने विचारले, ''कसला पत्रव्यवहार?''

''आपल्या त्या दुसऱ्या दुर्दैवी मुलाबद्दलचा!''

''तो तर मरून गेला. आता काय त्याचं?''

''मरून गेला?'' शेव्हरूज आश्चर्याने ओरडली.

''होय, त्याला सांभाळण्यासाठी नेमलेल्या पालकाकडेच तो वारला!''

''राणीसरकारांची काहीतरी चूक होत आहे!''

'' तुझ्याप्रमाणेच तोही जिवंत आहे काय?''

''होय! मला तरी तसं वाटतं.''

''तो नाइसला असतानाच वारला ना?''

''नाइसला असताना, एके दिवशी अंधार पडण्याच्या सुमारास शिलेदारी पेशाचा कोणी एक उमदा मनुष्य तिथं आला व मुलाला गाडीत घालून गुप्तपणाने निघून गेला असा नाइसच्या लोकांचा समज आहे, आणि माझी खात्री आहे की, मुलगा कुठे तरी अज्ञात स्थळी सुरक्षित आहे.''

''तो मुलगा वारला या गोष्टीवर लोकांचा विश्वास नाही तर!'' राणीने चिंतातुरपणे विचारले.

''नाही!''

''तुझं हे म्हणणं तू आणखी कोणास सांगितलंस काय?''

''नाही! एकदा दिलेला शब्द मी मोडीत नसते. या मुलाच्या जन्माच्या वेळीच मी राणीसाहेबांना गुप्ततेचं आश्वासन दिलं आहे नाही का?''

''पण आज तुझे व माझे संबंध दुरावल्यामुळे जरा शंका येते. आपले मैत्रीचे संबंध पूर्वीप्रमाणे शाबूत आहेत असे मी मानू काय?''

''पुरुष लहरी असले तरी स्त्रिया बदलत नसतात, राणीसाहेब!''

''तुझ्या खंबीरपणाबद्दल मला आनंद वाटतो. मी तुझ्यासाठी काय करू?''

''मला म्हातारपणी दारिद्र्यात दिवस कंठावे लागतात! मला राणीसाहेबांनी तीन-चार लाख फ्रँक्स दिल्यास मी सुखानं राहीन!''

''मी फोकेंना कळविते तुला पैसे देण्याबद्दल!''

''पण फोके मला पैसे देताना आढेवेढे घेतील!''

''माझा हुकूम त्यांनी अद्यापि मोडलेला नाही!''

''मला गुप्तरितीने ही रक्कम मिळणं श्रेयस्कर आहे राणीसाहेब, नाहीतर ती माझ्या पदरी पडणं कठीण आहे.''

''ठीक आहे, तू जा! मी व्यवस्था करीत आहे. पण ही जुनी हकीकत गुप्त राहील याची दक्षता मात्र घे!''

''राणीसाहेबांनी याबद्दल निश्चिंत असावं!''

■ ■ ■

माझारीन नंतर फ्रान्सच्या राज्यकारभाराची सूत्रे मॉन्शर फोकेंच्या हाती आली होती. फ्रेंच लोकसभेचाही त्यांना पाठिंबा असल्याने फ्रान्सचा तरुण राजा लुई, मनात असो वा नसो फोकेंच्या मंत्रीपदाबद्दल अवाक्षरही काढीत नव्हता. फोकेंचा स्वभाव दिलदार व रसिक असल्यामुळे त्यांच्याभोवती सदैव अनेक मित्रमंडळींचा गराडा असे. आजही त्यांच्या प्रासादावर अशीच धम्माल चालली होती. दिवाणखान्यात अनेक मंडळी जमली असून एकमेकांस आग्रह करीत त्यांनी खाद्यपेयांची लूट चालविली होती. मधून मधून हास्यलहरी उठत होत्या.

''ओऽहो, यावं महाराज! आपणच कमी होता!!'' आत आलेल्या आरामीला उद्देशून मॉन्शर फोके हर्षाने ओरडले.

''आपली मजलीस आटोपली म्हणजे मला सांगा, मला काही खाजगी बोलावयाचं आहे.'' चेहेऱ्यावरील गांभीर्य किंचितही कमी होऊ न देता आरामी म्हणाला.

आरामीचा आजचा हा एकंदर नूर पाहून फोके जरा चमकले व मंडळींना उद्देशून म्हणाले, ''दोस्तहो, सावकाश चालूद्या तुमचं! मी आलोच जरा, काय आहे ते पाहून!'' त्यांनी आरामीचा हात धरून त्याला दुसऱ्या एका खोलीत नेले.

''मला आज मादाम शेव्हरूज भेटली!'' आरामी चिंतातुरपणाने म्हणाला.

''ती म्हातारडी डचेस?''

''होय!''

''तिचं भूत पाहिलं असेल तुम्ही!''

''नाही! नाही! तीच ती म्हातारी लांडगी!''

''पण तिचे सुळे आता पडले असतील नाही?''

''सुळे पडले आहेत पण नख्या शाबूत दिसतात.''

''असेनात. पण त्यात एवढं चिंता करण्याजोगं काय आहे?''

''तिचा तुमच्याकडून पैसे काढण्याचा विचार आहे.''

''मी दिले पाहिजेत ना?''

''द्यावे लागतील!''

''का?''

''त्या थेरडीकडे माझारीनची काही पत्रे असावीत असं दिसतं.''

''प्रेमपत्र?''

''ही थट्टेची वेळ नव्हे, पैशाची अफरातफर केल्याचा तुमच्यावर आरोप करणारी ती पत्रं असावीतसं दिसतं तिच्या एकंदर बोलण्यावरून!''

''एवढंच ना? तिची ही वटवट व्यर्थ आहे. तिला म्हणावं तुला करावयाचं असेल ते कर! अशा अनेक गप्पांना मी आता सरावलो आहे.'' असे म्हणून फोके मोठमोठ्याने हसू लागले.

''मला वाटतं ही गोष्ट हसण्यावारी नेण्याइतकी सोपी नाही. तीन कोटि फ्रँक्सचा प्रश्न आहे.''

''मग मीच सांगतो तुम्हाला सर्व काही. एक दिवस माझारीनने माझ्या नावे तीन कोटि फ्रँक्सची तसलमात खर्ची टाकली व नंतर मला पावती देऊन ती रक्कम युद्धखर्चासाठी म्हणून आपणाकडे घेतली! रक्कम आपणाकडे पोहोचती झाल्याची खुद्द माझारीन यांच्या सहीची पावती माझ्याकडे आहे. ही थेरडी काय सांगते?''

''ही पावती आपल्याकडे आहे याची खात्री आहे तुम्हाला!''

''अलबत! फार काय, मी ती तुम्हाला दाखवतोच म्हणजे झालं?'' असे म्हणून फोकेने अलमारीमधून एक दप्तर काढले व त्यातील कागदपत्रे चाळण्यास सुरुवात केली. बेताबेताने त्यांची मुद्रा चिंताग्रस्त होऊ लागली. साऱ्या कागदांची उलथापालथ करूनही ती पावती त्यांच्या हाती लागली नाही. ''घात झाला! पावती नाहीशी झालेली दिसते!'' कपाळावरून टप्टप् गळणारा घाम पुशीत ते घाबऱ्या घाबऱ्या म्हणाले.

''ती बया कोलबर्टला भेटली. मी तिच्यावर पाळतच ठेवली होती. आता ती नक्कीच तुमचा घात करणार!'' आरामी चिंताग्रस्त होऊन म्हणाला.

''मग मी आयुष्यातून उठलोच म्हणायचं?''

''कोलबोर्टला ती पत्रं तिने विकली असली पाहिजेत. तो आता राजेसाहेबांच्या कानी लागून तुमचा घात करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहाणार नाही!'' आणि मग बराच वेळ कोणी काहीच बोलले नाही.

''एकंदरीत माझ्याविरुद्ध काहीतरी कारस्थान शिजत होतं म्हणायचं?'' फोके हताशपणे म्हणाले.

''होय! पण त्याला आता तोंड दिल्याशिवाय इलाज नाही.'' आरामी उदासवाणे स्मित करून म्हणाला.

''ते तर झालंच पण यावर काय तोड काढावी हाच प्रश्न आहे!''

''मागे एकदा राजेसाहेबांनी तुमच्या वॉक्स येथील जहागिरीवर तुमच्या पाहुणचारास यावयाचं कबूल केलं आहे नाही?''

''होय, पण त्याचा आता काय उपयोग?''

''आपण त्यांना आमंत्रण द्या लगेच! मेजवान्या, नाचरंग यात त्यांना गुंतवून ठेवू काही दिवस!''

''राजेसाहेबांचा पाहुणचार म्हणजे काय थट्टा आहे आरामी? सहज दोन तीन लाख फ्रँक्सचा चुराडा करावा लागेल!''

''लाख दोन लाख? त्याने काय होणार? सहज दहा-पंधरा लाख फ्रँक्स उडवले पाहिजेत! राजकुटुंबियांना विसर

पडला नाही पाहिजे आपल्या पाहुणचाराचा!'' आरामी बेदरकारपणे म्हणाला.

''पण मी आता पाच-पन्नास हजार फ्रँक्सनाही महाग झालो आहे आरामी, याची जाणीव नाही तुम्हाला? ते तीन कोटि फ्रँक्स खरोखरीच मी गडप केले आहेत अशा भावनेने बोलत आहात तुम्ही!''

''पैशाचा प्रश्न नाही, ते माझं मी पाहून घेईन. वॉक्समधील समारंभाची सर्व व्यवस्था तुम्ही माझ्याकडे सोपवा म्हणजे झालं.''

''तेथील माझा प्रासादही राजकुटुंबियांना निवासस्थान म्हणून देण्याच्या स्थितीत राहिलेला नाही आरामी!''

''मी तिथे नवा प्रासाद उभा करीन, नाहीतर त्याची डागडुजी करून तो सर्वांगसुंदर सजवून घेईन. तुम्ही आमंत्रण द्या, बाकीचं माझं मी पाहून घेतो!''

''आरामी, धर्मगुरूचा पेशा पत्करण्यापूर्वी तुम्ही तर अगदी खंक होता, मग आताच ही श्रीमंती कोठून आणली तुम्ही?''

''हा प्रश्न माझा आहे. स्नेह्यासाठी मी काहीही करीन; पण हा बेत मात्र तुम्ही ठरवून टाका!''

''पण याचा उपयोग काय होणार तेच मला कळत नाही.''

''ते मी पाहातो. तुम्ही आमंत्रणाची यादी तयार करा आणि मी वॉक्सला जाऊन जातीने सर्व व्यवस्था पाहातो.''

''मी आमंत्रण तरी कुणाकुणाला करू?''

''राजाच्या निकटवर्ती सर्व लोकांना! व मी काही लोक सुचवीन त्यांना!''

''ठीक आहे!''

●●●

## ३.राऊल!

ऑथाचा मुलगा राऊल, कॅप्टन डॉर्टाच्या भेटीस आला तेव्हा डॉर्टा दोनही हातांच्या तळव्यांवर आपले गाल टेकून चिंतेत असल्याप्रमाणे काही तरी विचार करीत बसला होता. राऊलला पाहाताच तो मोठ्या अगत्याने म्हणाला, 'ये, ये पोरा, तू असा एकाएकी परत कसा आलास रे?''

तेथेच एका खुर्चीवर टेकत राऊल म्हणाला, ''मी परत आलो एवढं खरं! का आणि कसा ते माझं मलाच कळेनासं झालं आहे!''

राऊल चांगलाच वाळलेला दिसत होता, आणि त्याचा एकंदर नूरही साफ उतरून गेलेला होता.

''पण काय रे, तू इतका वाळलास कशानं?''

''मला तुमच्याशी खूप, खूप बोलायचं आहे मॉन्शर डॉर्टा!''

''तुझ्या बापाचं कुशल आहे ना?''

''मी तुम्हालाच ते विचारणार होतो. त्यांची आणि माझी अद्यापि गाठही पडलेली नाही!''

''तुला काहीतरी होतं आहे! माझ्यापासून तू काहीतरी लपवून ठेवीत आहेस, होय ना?''

''मी प्रेमात सापडलो आहे!'' राऊल शांतपणे म्हणाला.

''यंऽव् मग ऑथाला सांगतो तुझं लग्न उरकून टाकण्यास!''

''पण त्यात व्यत्यय आला आहे.''

''एवढंच ना? मग व्यत्यय आणणाऱ्याला द्वंद्वाचं आव्हान दे आणि त्याचा काटा काढून टाक म्हणजे झालं!''

''मी त्याचसाठी सल्ला विचारण्यास आलो आहे.''

''प्रकरण नाजूक असेल तर आरामीला भेट, दांडगाव्याचं असेल तर पार्थाला सांग आणि काही हिमकतीचं असेल तर मी उपयोगी पडेन!'' डॉर्टा टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने म्हणाला.

''मग मी पार्थाकडेच जातो. तुम्हाला यातील काहीएक समजणार नाही.'' राऊल त्राग्याने म्हणाला.

आणि मग डॉर्टानेही त्याला अधिक चौकशी न करता

जाऊ दिले. प्रेम प्रकरणे ज्याची त्यानेच हाताळावी या मताचा तो होता.

आरामी फोर्केच्या प्रकरणात गुंतला होता, डॉर्टा राजशिलेदारांचा प्रमुख असल्याने तो सदैव चौदाव्या लुईच्या कामगिरीत गुंतलेला असे आणि त्यामुळे ऐषआरामी पार्थाला त्यांची भेट क्वचितच होई. दुपारचे जेवण यथास्थित करून, आरामात डुलकी घेण्याच्या विचारात असताच पार्थाला त्याचा नोकर मास्क रा याने राऊल आल्याची वर्दी दिली. पार्थने एक भली मोठी जांभई दिली व त्याला आत घेऊन येण्यास आज्ञा दिली.

''माझं एक काम आहे तुमच्याकडे!'' आत येताच राऊल म्हणाला.

''कसलं रे पोरा? काही पैसे वगैरे हवे आहेत काय? थांब हं, देतो!''

''नाही! नाही! मला पैसे वगैरे काही नको आहेत!''

''मूर्खा, मग जेवायचं आहे म्हणून सांग की, तोंड वाळलेलं दिसतंच आहे.''

''नाही, मला भूक नाही!'' पार्थाच्या अगत्याने बावचळलेला राऊल गडबडीने म्हणाला.

''बेकार इंग्लंड! तिथूनच आलास ना तू? तिथं काय खायला मिळणार? त्यामुळंच भूक मेली पोरा तुझी!'' आपल्याच विनोदावर खूश होऊन पार्था मोठ्याने होऽहोऽ करून हसू लागला.

''मला एका विषयावर तुमचं मत हवं आहे, पार्थाकाका!'' राऊल काकुळतीने म्हणाला.

''माझं मत!'' पार्था आश्चर्याने ओरडला, ''कोणत्या विषयावर रे बाबा?''

''त्याचं म्हणजे असं आहे, तुमचा एखाद्या व्यक्तीशी मतभेद झाला, तर तुम्ही काय कराल?''

''मतभेद मुद्द्याने मिटले तर पाहीन, नाहीतर गुद्द्याने निकालात काढीन. त्यात काय विशेष?''

''कपाळ माझं,'' राऊल स्वत:शी म्हणाला, ''डॉर्टांना सारी थट्टा वाटते, पार्थांना मारामारीशिवाय दुसरं काही दिसत नाही!''

''पण शत्रू फार मोठा असला तर?''

''अरेऽ जा! आतापर्यंत आम्हाला सतराशे साठ शत्रू भेटले, पण त्यात एकही भारी ठरला नाही! जा तुझ्या बापाला विचार वाटलं तर. तो तरी खोटं बोलत नाही ना?''

''राऊल जागेवरून उठला व पार्थाला रेलून बसत म्हणाला, ''माझा शत्रू फ्रान्सचा राजा चौदावा लुई आहे प्रत्यक्ष. मग बोला!''

पार्था ताडकन् उठून उभा राहिला व आश्चर्याने ओरडला, ''म्हणजे?''

''ल्यूसीवर माझं प्रेम आहे हे माहीतच आहे तुम्हाला! अलीकडे ती राजाच्या विशेष सहवासात आल्याने राजाचं मन तिच्याकडे गेलं व माझा काटा मार्गातून दूर करण्यासाठी, राजानं मला इंग्लंडला रवाना केलं. राजाज्ञा म्हणून मी तिथे गेलो, पण तिथं गेल्यानंतर मला कळून आलं की तिथं माझं काहीच काम नाही. मला तिथं सर्व गोष्टींचा उलगडा झाला व मग मी तत्काळ परत आलो.'' राऊल भडाभडा सर्व बोलून गेला.

''मग गड्या, हे प्रकरण जरा विचार करण्याजोगं आहे. आम्ही चौघे जर एकत्र आलो तर राजाला सुद्धा भारी आहोत, पण काळच फिरला आहे. आमच्या गाठीभेटीही होत नाहीत कित्येक दिवसांत! धीर धर, ॲथाला सर्व काही सांगू, यातूनही काही मार्ग निघेल!'' प्रेमाने त्याला थोपटीत पण किंचित् चिंताग्रस्त होऊन पार्था म्हणाला.

■ ■ ■

ॲथा भेटण्यासाठी आला असल्याची वर्दी हुजऱ्याने आणताच फ्रान्सचा राजा चौदावा लुई जरा अस्वस्थ झाला. पण शक्यतो स्वत:ला सावरून व आपली मुद्रा निर्विकार करून तो ॲथाच्या आगमनाची तयारी करून बसला. ॲथाची भेट ही सहज घडणारी घटना नसून, तो विशेष हेतूने भेटण्यासाठी आला असावा याची लुईला पूर्ण कल्पना होती.

''यावं, यावं, काऊंट ॲथा!'' आत येणाऱ्या ॲथाचे स्वागत करून राजा म्हणाला, ''जुन्या पिढीतील कर्तबगार माणसं भेटणं म्हणजे मी एक अलभ्य लाभच समजला पाहिजे! आपली भेट झाली हे माझं भाग्यच समजतो!''

ॲथा नम्रपणाने अभिवादन करून म्हणाला, ''सरकारस्वारींच्या सहवासाचा लाभ नेहमीच मिळाला

तर मला आनंदच वाटेल!'' ऑथाच्या बोलण्याचा एकंदर स्वर मात्र असा होता की, आमच्यासारख्या जुन्या राजनिष्ठ सेवकांची आपण दखल घेतली तर अधिक बरे होईल.

''मला वाटतं, आपल्याला काही सांगावयाचे आहे!'' राजा विमनस्कपणे म्हणाला. ऑथाच्या आगमनाबद्दल आपल्याला विशेष आस्था नाही असे भासविण्याचा प्रयत्न करण्यास तो चुकला नाही.

''तसं नसतं तर मी इथंपर्यंत येण्याची तसदी घेतलीच नसती.'' ऑथाही निर्भीडपणे म्हणाला.

''मग बोला लवकर! आपलं संभाषण ऐकण्यास मी उत्सुक आहे.'' राजा सावरून बसत म्हणाला.

''माझं समाधान होईल अशा उत्तरांची मी अपेक्षा केल्यास चूक होणार नाही?''

''ते प्रश्नावर अवलंबून राहील! आपण काही तक्रार नोंदविण्यास आला आहात काय?''

''म्हटलं तर तक्रार, नाहीतर गाऱ्हाणं! महाराज कसा अर्थ करतील त्यावर अवलंबून आहे सारं!''

''करा सुरुवात! माझं लक्ष आहे.''

''माझा मुलगा राऊल याची ल्यूसीबरोबर विवाह करण्याची इच्छा आहे हे राजेसाहेबांना माहीत आहे.''

''मुद्द्याला आलं प्रकरण!'' राजा स्वगत म्हणाला व मग ऑथाला उद्देशून त्याने म्हटले, ''बरं मग?''

''राजेसाहेबांनी या विवाहाला संमती द्यावी! ल्यूसी राणीसाहेबांची दूरची आप्त असल्याने, आपणा उभयतांची या विवाहाला संमती असावी!''

राजाने रागाने हात चोळले व एकदम भडकून तो म्हणाला, ''माझा या गोष्टीला नकार आहे!''

''राऊलचं ल्यूसीवर नितांत प्रेम असून, तो याबाबत फारच भावनाप्रधान झाला आहे!''

''पण आपल्या चिरंजीवांच्या बरोबर ल्यूसीचाही विचार व्हावयास पाहिजे! तिला ही गोष्ट मान्य नसेल तर?''

''मला तसं वाटत नाही!''

''आपल्याला वाटण्याचा प्रश्न नाही, काऊंट ऑथा! ल्यूसीची मनीषा मी आपल्या कानी घालीत आहे.''

''आपली संमती असल्यास ल्यूसीला मी विचारीन!''

''माझी या गोष्टीस संमती नाही!''

''हाच महत्वाचा भाग आहे!''

''ऑथा!''

''आपला विरोध का आहे हे समजल्यास अधिक बरं होईल.''

''ऑथा, तुम्ही मला -फ्रान्सच्या राजाला प्रश्न विचारीत आहात!''

''ते खरंच! पण प्रश्न विचारून खुलासा करून घेतला नाही, तर माणसाला तर्क करण्याची इच्छा होते.''

''तर्क! कसला तर्क?''

''ज्या प्रश्नांची सरळ उत्तरं मिळत नाहीत, त्यासंबंधीचा तर्क!''

''ऑथा, तुम्ही मर्यादेचं अतिक्रमण करीत आहात!'' राजा बेभान होऊन ओरडला.

''महाराज, आपण खुलासा केला नाही तरी तर्काने सर्व समजून चुकलो आहे मी!''

''आपणास दिलेला वेळ संपला आहे.'' राजाने चिडून जाऊन ऑथाला जवळ जवळ निघून जाण्याचीच सूचना दिली.

''राजे मनाच्या थोरवीने शोभतात, मुकुटाने नाही!''

''काय? काय म्हणालात तुम्ही?''

''मी खुलासा करतो. या विवाहात मोडता घालण्याचा राजेसाहेबांचा उद्देश...''

''काऊंट ऑथा!''

''ही गोष्ट आता गुप्त राहिलेली नाही! राजेसाहेबांचा ल्यूसीकडे असलेला ओढा आता जगजाहीर झाला आहे.''

आपल्या हातातील हातमोजे खसकन उपसून टेबलावर आपटीत राजा मोठ्याने ओरडला, ''माझ्या खासगी व्यवहारात मन घालणाऱ्या लोकांच्या नशीबी काय असतं याची जाणीव असूद्या तुम्हाला ऑथा! माझ्या मार्गात कुणी व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केल्यास मला खपणार नाही!''

''व्यत्यय? कुणी, आणि कसला आणला?''

''ऑथा! काऊंट ऑथा!!'' राजा असाहायपणे ओरडला.

''राऊलला बुद्धिपुरस्सर लंडनला पाठवून आपण म्हणत असलेला अडथळा दूर करण्याचा प्रयत्न तर तुम्ही केलाच होता! आपल्या मार्गात त्याचाच अडथळा आहे ना

महाराज?'

''ऑथा! तुम्ही उद्धटपणाने वागत आहात पण याचा जाब द्यावा लागेल तुम्हाला! तुम्ही चालते व्हा इथून!''

''नाही! मला बोलावयाचं आहे ते सर्व बोलून झाल्याशिवाय मी जाणार नाही!'' ऑथा तितक्याच जोराने ठासून म्हणाला, ''फ्रान्सच्या राजघराण्यासाठी एकाकाळी आपलं रक्त सांडणारे आम्ही शिलेदार आहोत! हयातीची पंचवीस तीस वर्षं फ्रान्सच्या राजमुकुटासाठी, मृत्यूशीही सामना देण्यात आम्ही खर्च केली आहेत, पण आज आपल्या या अशा वागण्याने, आपण अत्यंत विश्वासू अशा दोन सेवकांना मुकत आहात! आज राजाच्या शब्दावरील आमचा विश्वास उडाला, आमची निष्ठाही मेली! नमस्ते!!''

एवढे बोलून ऑथाने खरकन् आपली तलवार काढली व ती गुडघ्यावर ठेवून काटकन् मोडून तिचे दोन तुकडे केले. ते तुकडे राजापुढे टाकून धिमेपणाने पावले टाकीत तो बाहेर पडला. फ्रान्सचा राजा चौदावा लुई या प्रकाराने दिङ्मूढ होऊन काही काळ स्वस्थ पडून होता. शेवटी टेबलावरील घंटा घणघण् वाजवून तो मोठ्याने ओरडला, ''मॉन्शर डॉर्टाला तत्काळ पाठवून द्या!''

●●●

## ४. ऑथाची अटक

ऑथा बिऱ्हाडी परत आला तेव्हा त्याचा चेहरा अगदीच उतरून  गेला होता. आजारातून नुकत्याच उठलेल्या एखाद्या माणसाची कळा त्याच्या सर्वांगावर आली होती. अंगावरचा झुब्बा काढून त्याने तो दूर भिरकावून दिला व तो राऊलच्या जवळ येऊन बसला.

''बाबा, मी म्हणत होतो त्याबद्दल आपली खात्री झाली ना?'' राऊलने विचारले.

''होय राऊल! राजाचे ल्यूसीवर प्रेम असून तो तिचा विवाह तुझ्याशी होऊ देईलसं दिसत नाही!''

''त्याने स्पष्ट कबुली दिली याची?''

''होय!''

''ल्यूसीची याला संमती आहे?''

''निदान राजाचं म्हणणं तरी तसं दिसतं!''

राऊलने कष्टी मुद्रेने एक दीर्घ उसासा सोडला.

''यापुढे तुझा काय मानस आहे राऊल? फ्रान्सच्या राजघराण्याशी आपला आता काडीमात्र संबंध राहिलेला नाही! राजनिष्ठेचे सर्व पाश मी आता तोडून आलो आहे! तुझ्या प्रेमभंगाचा सूड तुला घ्यावयाचा असल्यास माझी हरकत नाही.''

''नाही बाबा, माझा असला काहीच विचार नाही! माझ्या अंत:करणातील प्रेम माझ्या मृत्यूबरोबरच नष्ट होईल. सूडाच्या भावनेला  तिथं जागा नाही! परमेश्वरावर हवाला ठेवून मी स्वस्थ राहीन!''

''मग राजाशी वैर करण्याची तुला इच्छा नाही?''

''नाही!''

''ल्यूसीला दोष देण्याची तुझी इच्छा नाही?''

''नाही!''

''तुझ्या दुर्दैवाबद्दल कोणालाच बोल लावण्याची तुला इच्छा नाही?''

''नाही!''

''ठीक आहे! आपण ब्लाइला निघून जाऊ!'' ऑथा सखेद मुद्रेने आपल्या मुलाकडे पाहात म्हणाला. अगदी याच घटकेला डॉर्टा तेथे येऊन दाखल झाला. त्याने राऊलचा हात आपल्या हाती घेत, ऑथाकडे वळून म्हटले, ''या पोराची समजूत काढीत होतास तू ऑथा?''

''होय! या कामी तूही मला मदत कर!''

''छान! मी तर त्यासाठीच आलो आहे.''

''पण बाबा, मी तर केव्हाच शांत झालो आहे. माझी समजूत काढण्याचा प्रश्नच येत नाही आता!'' असे म्हणून राऊलने हसण्याचा प्रयत्न केला, पण त्यामुळे त्याची

मनोव्यथा अधिकच स्पष्ट झाली.

''तू राजाला भेटलास ऑथा?'' डॉर्टाने विचारले.

''होय!''

''डॉर्टा, तुम्ही इथे मॉन्शर डॉर्टा या नात्यानं आला आहात की राजशिलेदारांचे कप्तान म्हणून आला आहात?'' राऊलने भेदक नजरेने त्याच्याकडे पाहात विचारले.

''अरे वारे वा!'' खूप मोठ्याने हसून डॉर्टा म्हणाला, ''तुला खूळ लागलं आहे. मी मॉन्शर डॉर्टा काऊंट ऑथाचा स्नेही म्हणून त्याच्या पोराला चार शब्द सांगण्यास इथं आलो आहे!''

''मग ठीक आहे. मी आपला उपदेश ऐकण्यास केव्हाही उत्सुक आहेच!''

डॉर्टाने राऊलला आपल्याजवळ ओढून घेतले व प्रेमाने त्याच्या पाठीवर हात फिरवीत तो म्हणाला, ''गरीब बिचारा पोर!'' थोड्याच वेळात या दोन मित्रांना एकत्र सोडून राऊल काही कामासाठी बाहेर पडला.

▪ ▪ ▪

''बोल डॉर्टा काय बातमी आणली आहेस? तुझं येणं सहज असणार नाही! त्या पोरालाही ही शंका आली असावी असं वाटतं!'' राऊल जाताच ऑथा म्हणाला.

''काही विशेष नाही बुवा!''

''मला वाटतं राजा चांगलाच चिडला असेल माझ्यावर!''

''राजा खूश नाही तुझ्यावर, एवढंच फार तर मी म्हणेन!''

''ठीक आहे! मला तुझ्याबरोबर यावयाचं असेल नाही?''

''का, घाई का एवढी?''

''तुलाच उशीर होईल याची भीती वाटते मला!''

''मला खूप वेळ आहे रे, पण तुझं आणि राजाचं असं भांडण तरी काय झालं?''

''कशावरून म्हणतोस?''

''तू जाताच राजानं मला हाक मारली, व तू उद्धट असल्याचं जाहीर करून तुला पकडण्याचा हुकूम दिला!''

''मला वाटलंच होतं ते!''

''तुम्हाला तुमच्या स्नेह्याला पकडण्याचं जिवावर येत असेल तर संरक्षक दलाच्या प्रमुखाला या कामगिरीवर पाठवा, असंही तो मला म्हणाला.''

''मग पुढे काय झालं?''

''कर्तव्य म्हणजे कर्तव्य! राजेसाहेबांची आज्ञा असेल तर मीच ऑथाना कैद करतो, असं मी सांगितलं.''

''ठीक आहे आपण निघूया!'' ऑथा शांतपणाने म्हणाला.

''पण तुला काही निरवानिरव करावयाची असेल ना?''

''नाही!'' ऑथा मनाची काडीमात्र चलबिचल होऊ न देता म्हणाला, ''जगातील मी एक अत्यंत साधा प्रवासी आहे डॉर्टा! इथे माझं आवरावयाचं असं काहीच नाही! मी कोणत्याही क्षणी तुझ्याबरोबर निघू शकतो!''

''पण राऊल...?''

''तो माझ्याच तालमीत तयार झाला आहे! तुला पाहाताच त्याला ही शंका आली होती व त्याने ती बोलूनही दाखविली होती. या घटनेचा त्याच्या मनावर काडीमात्र परिणाम होणार नाही!''

''ठीक आहे, आपण निघूया!''

''माझी तरवार मोडून मी राजाच्या पायांवर केव्हाच फेकली आहे, तेव्हा ती तुझ्या स्वाधीन करण्याचा प्रश्न उरत नाही!''

''मला तरी ती घेऊन काय करावयाची आहे?''

''मी तुझ्या पुढे चालू की, मागून येऊ?''

''आपण हातात हात घालून चालू म्हणजे या गोष्टीची वाच्यता होणार नाही!''

''ऑथा व डॉर्टा दोघे बाहेर जावयास निघाले. वाटेत त्यांना ऑथाचा नोकर ग्रीमाँ भेटला. ''ग्रीमाँ, मी चाललो.'' ऑथा त्यास प्रेमाने म्हणाला.

''आम्ही जरा गाडीतून चक्कर मारून येत आहोत!'' डॉर्टा मध्येच म्हणाला. ग्रीमाँने सुहास्य मुद्रेने डॉर्टाचे आभार मानले, पण ते मानताना मात्र त्याने प्रकट केलेला भाव स्पष्ट होता. ''माझ्या धन्याला तुम्ही अटक करून नेत आहात हे समजू शकतो.''असेच जणू त्याने डॉर्टाला जाणवून दिले.

बाहेर येऊन गाडीत बसताच डॉर्टा ऑथाला म्हणाला, ''मी तुला कुठे सोडू बोल!''

''म्हणजे काय?'' ऑथा आश्चर्याने ओरडला.

''तुला पकडण्याची कामगिरी मी यासाठीच पत्करली आहे. तू सांगशील तिथे मी तुला नेऊन सोडतो. तिथून तू कुठेही सुरक्षित ठिकाणी निघून जा!''

''डॉर्टा, म्हातारपणीही तुझ्या हिकमती कमी झालेल्या नाहीत!'' ऑथा प्रेमाने त्याचा हात दाबून म्हणाला.

''मला वाटतं तू इंग्लंडला निघून जावंस! तुला योग्य त्या बंदरी नेऊन सोडण्याची व्यवस्था मी करतो!'' त्याच्याकडे दुर्लक्ष करून डॉर्टा म्हणाला.

''नाही! नाही!! मला तू बॅस्टाईल तुरुंगात घेऊन चल!''

''तू मोठा हटवादी मनुष्य आहेस! अजून थोडा विचार कर!''

''कसला विचार?''

तू आता पंचविशीतील तरुण नाहीस. आमच्या वयाच्या माणसाला बॅस्टाईलचा तुरुंग म्हणजे मरण! तू तुरुंगात खितपत मरावंस अशी माझी इच्छा नाही!''

''माझी सुटका करून तुला गोत्यात आणावं अशी माझीही इच्छा नाही!'' ऑथा शांतपणाने म्हणाला. आणि मग थोड्याच वेळात डॉर्टाची गाडी ऑथाला घेऊन बॅस्टाईलच्या दिशेने दौडू लागली.

''डॉर्टाला पाहाताच पहारेवाल्याने दरवाजा उघडून गाडी आत सोडली. अल्पावधीत ती तुरुंगाच्या चौकात येऊन उभी राहिली. गाडीतून बाहेर उडी टाकताच डॉर्टा एकदम चमकल्यागत झाला व पाठोपाठ उतरणाऱ्या ऑथाला उद्देशून हळूच म्हणाला, ''ओऽहो, ते पाहिलंस का?''

''काय बुवा?''

''ते पाहा तरी तिकडे!''

''ती गाडी उभी आहे तीच ना? माझ्यासारखा आणखी एखादा कैदी आला असेल झालं!''

''त्या गाडीतून उतरलेल्या इसमाकडे नीट पाहा तरी!''

''तो करड्या रंगाचा पोषाख घातलेला इसम उभा आहे तोच ना?''

''तो कोण असावा असं वाटतं तुला?''

''काही कळत नाही बुवा.''

''मी पैज मारतो तो तोच आहे!''

''अरे, पण तोच म्हणजे कोण?''

''आरामी!''

''आरामीला आणि अटक? छट्!''

''गाडीतून तो एकटाच आलेला दिसतो, कैदी म्हणून तो इथं खास आलेला नाही!''

''मग तो इकडं का आलेला आहे?''

''त्याची आणि तुरुंगाधिकारी बीमाँ यांची दोस्ती आहे. आपण वेळेवरच आलो म्हणायचे!''

''का?''

''आपल्याला जरा गंमत पाहावयास मिळेल!''

''पण माझी व आरामीची इथं गाठ पडणं ठीक नाही, मला इथं पाहून तो अस्वस्थ होईल.''

''मग आता असं करू, तुझ्या हातून खोटं बोलणं होणार नाही, तू गप्प बैस आणि आपणा दोघांच्याही वतीने खोटं बोलण्याचा मक्ता मी घेतो!''

''ऑथाने नुसतेच स्मित केले. थोड्याच वेळात ते दोघेही तुरुंगाधिकारी बीमाँ यांच्या निवासस्थानापाशी येऊन पोहोचले. आत जाताच बीमाँ व आरामी शेजारी शेजारी, खुर्चीवर बसल्याचे व टेबलावर खूपसे खाद्यपदार्थ मांडल्याचे त्यांना दिसून आले. उंची खाद्यपेयांचा मोहक व खमंग वास दिवाणखान्यात भरून राहिला होता.

बीमाँ व आरामी डॉर्टा ऑथाला पाहून चांगलेच बाचकले. आरामीने आपले आश्चर्य शब्दांनी प्रकट केले नाही, पण बीमाँ मात्र तत् प्प् करू लागला. पाहुण्यांचे स्वागत करण्याचे भानही त्याला राहिले नाही.

''विलक्षण योगायोगच म्हणावयाचा हा?'' तो शब्द कसेबसे पुटपुटला.

''मी पण चकीतच झालो तुम्हा दोघांना इथे पाहून!'' डॉर्टा एखादी अनपेक्षित घटना पाहिल्याचा बहाणा करीत म्हणाला.

''मला वाटतं आपण आजच्याप्रमाणेच कधीतरी खरोखरच बीमाँचा पाहुणचार घेण्यास येणार!'' आरामी मोठ्याने हसून विषयाला विनोदाची कलाटणी देण्याचा प्रयत्न करीत म्हणाला.

''वाऽ वाऽ! खासा न्याय! मॉन्शर बीमाँ, तुम्ही मला दोन दिवसांपूर्वी मेजवानीचं आमंत्रण दिलं होतं ना?''

''मी?''

''भले महाराज! आपण राजेसाहेबांना भेटण्यास आला होता राजवाड्यात तेव्हा मला आमंत्रण दिलंत ते अजिबात विसरलात वाटतं? तरी म्हटलं. मला पाहून तुम्ही इतके आश्चर्यात कसे पडला?''

''अरे, हो की, मी विसरलो होतो हे खरंच! तुम्ही आलात हे बरं झालं. म्हातारपणामुळं माझी स्मरणशक्तीच काम करीनाशी झाली आहे. विसराळूपणा वयपरत्वे येतोच म्हणा!'' स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करीत बीमाँ म्हणाला.

''भले! म्हणजे मी अनाहूतच आलो म्हणायचा?'' विचारात पडल्याचा अभिनय करीत डॉर्टा म्हणाला.

''छे ऽ छे ऽ'' बीमाँ उठून त्याच्याकडे जात म्हणाला, यात कसला शिष्टाचार? या, या, माझाच काही गैरसमज झाला. आमंत्रण मी दिलंच होतं पण धांदलीत स्मरणातच राहिलं नाही बघा!''

''हे माझे स्नेही ऑथा! सहज वाटेत भेटले. बऱ्याच दिवसांनी गाठ पडली. म्हटलं चलावं यांनाही घेऊन. तेवढाच तुमचा नि त्यांचा परिचय होईल!'' एक खुर्ची पकडीत डॉर्टा म्हणाला. ऑथाने सस्मित मुद्रेने बीमाँला अभिवादन केले व डॉर्टाच्या जवळच असलेल्या दुसऱ्या एका खुर्चीवर आसन ठोकले.

''छान! छान!!'' बीमाँ, गळ्यात पडलेल्या या दोन पाहुण्यांसाठी खाद्यपदार्थ आणण्यास नोकराला फर्मावून म्हणाला आणि मग थोड्याच वेळात मेजवानीस सुरुवात झाली; पण डॉर्टा मध्येच काहीतरी आठवण झाल्यागत करून ताडकन् उठून उभा राहिला व म्हणाला, ''दोस्त हो, तुमचं सावकाश चालूद्या.तुम्ही लोक मोठे सुखी आहात बुवा! माझी ही नोकरी म्हणजे नुसती कुतरओढ! बरी आठवण झाली, मी जरा जाऊन एक कामगिरी आटोपून येतो चट्दिशी!''

''आँऽ! तुम्ही जाणार तर!'' बीमाँ व आरामी एकदम आश्चर्याने ओरडले.

''जाणं भाग आहे.'' वाईट वाटत असल्यागत मुद्रा करून डॉर्टा म्हणाला, ''मी एक तासाभरात परत येतो!'' असे म्हणून डॉर्टा चालूही लागला.

''मग आम्ही तुमची वाट पाहातो!'' बीमाँ ओरडला.

''नको! नको!! चालूद्या तुमचं!'

''नक्की परत येत आहेस ना?'' ऑथाने मोठ्याने ओरडून विचारले.

''होय!'' एवढे उत्तर देऊन डॉर्टा तेथून सटकला.

• • •

डॉर्टा तेथून सटकला तो थेट राजापुढे येऊन उभा राहिला.

''कामगिरी बजावली?'' राजाने विचारले.

''होय सरकार!'' डॉर्टा उत्तरला.

''ऑथा त्याबद्दल काय म्हणाले?''

''काहीच नाही!''

''त्यांनी आपला उद्धटपणा, बंडखोरी सोडली काय?''

''बंडखोर माणसं पळून जाण्याची संधी गमावून कैद पत्करत नसतात, सरकार!''

''पळून जाण्याची संधी! आणि कोणी दिली त्यांना?''

''मी! ज्याच्यावर त्यांना कैद करण्याची जबाबदारी होती त्यानं!''

''मला दगा देण्याचा तुमचा विचार होता?'' राजा तावातावाने ओरडला.

''होय सरकार!'' डॉर्टाच्या थंडपणाने, राजा थोडासा थिजलाच.

''तुम्हाला ही कामगिरी अप्रिय वाटत होती तर ती तुम्ही पत्करली का?''

''मी ती पत्करली नसती तर ती दुसऱ्या कुणाकडे तरी गेलीच असती. माझ्या मित्राची अटक होणारच असेल तर ती मीच केलेली बरी असं मला वाटलं!''

''आणि मग ही निष्ठा दाखविलीत काय? तुमच्या शिपाईबाण्याचा तुम्हाला विसर पडला मॉन्शर डॉर्टा!''

''माझ्या बाण्याबद्दल राजेसाहेब शंका न घेतील तर आभार होतील!''

''मग तुम्ही इथं आलात तरी का?''

''ऑथा बॅस्टाईलमध्ये आहेत हे सांगण्यासाठी!''

''मग त्यात विशेष ते काय झालं? माझीच आज्ञा पाळली तुम्ही!''

''तेच तर आपल्या ध्यानी आणून देऊ इच्छितो मी!''

''पण ती ऑथांच्या सौजन्याने, चांगुलपणाने घडलेली गोष्ट आहे. तुमच्या प्रामाणिकपणाचा पुरावा तीत कुठे आहे?''

''माझा प्रामाणिकपणा एक वेळ संशयास्पद वाटला तरी चालेल, पण ऑथा चांगले आहेत हे पटलं ना राजेसाहेबांना?''

''डॉर्टा, तुम्ही राजांशी हुज्जत घालीत आहात!''

''राजेसाहेबांनी मलाही कैद करावं अशी माझी इच्छा आहे!''

''डॉर्टा!''

''माझ्या मित्रानं एकट्यानं कैदखान्यात पिचावं हे मला पसंत नाही. राजेसाहेबांनी माझीही रवानगी तिथे करावी!''

''राजाने खस्‌दिशी एक कागद पुढे ओढला व डॉर्टालाही कैदेत टाकण्याचा हुकूम लिहिण्याची तयारी केली. ''लक्षात ठेवा मॉन्शर डॉर्टा, हे तुम्हाला जड जाईल!'' तो म्हणाला.

''आहे त्याची कल्पना.''

''चालते व्हा इथून!'' राजा खेकसला.

''नाही महाराज!''

''तुमचा राजीनामा द्या आत्ताच्या आत्ता!''

''मला तुरुंगात पाठवा म्हणजे आपोआपच ते घडणार आहे!''

''डॉर्टा, मी राजा आहे. तुम्ही नाही! मी काय करावे ते तुम्ही, मला सांगता?''

''सरकार, मी जर राजा असतो...''

''तुम्ही जर राजे असता? डॉर्टा, तुम्ही बंडखोर बनत आहात!''

''माझी विवेक सोडण्याची इच्छा नव्हती व नाही, पण...''

''मॉन्शर डॉर्टा!''

''आपल्याला प्रामाणिक माणसं उद्धट व तोंडपुजी माणसं राजनिष्ठ वाटत आहेत, महाराज! हा कालमहिमा आहे! आपणास शिपाईबाण्यापेक्षा बाहुल्यांची मातब्बरी वाटू लागली आहे सरकार! अशा स्थितीत डॉर्टाला तुरुंग बरा वाटेल!'' या अनपेक्षित भडिमारामुळे राजा काही वेळ दिङ्‌मूढ झाल्यासारखा झाला. त्याचा चेहरा गोरामोरा झाला व असाहायपणे तो खुर्चीत मागे लवंडला.

राजा रागारागाने आपणास कैद करणार याची डॉर्टाला खात्री होती. ''शिलेदाराच्या निष्ठेचा अपमान म्हणजे त्याचं मरण होय सरकार!'' तो नम्रपणाने म्हणाला व त्याने खट्‌कन आपली तलवार उपसून ती राजाच्या पायापाशी ठेविली. राजाने शांतपणाने सावरून बसत टाक उचलला व सरसर काही मजकूर लिहून तो कागद डॉर्टाच्या हाती दिला.

''कसला हुकूम महाराज?'' डॉर्टाने विचारले.

''ऑथांना तत्काळ बंधमुक्त करण्याचा!'' राजा स्मित करून म्हणाला. डॉर्टा आवेगाने पुढे झाला व राजाचा हात आपल्या हाती घेऊन त्याने त्यावर चुंबनांचा वर्षाव केला. नंतर कागदाची नीट घडी करून ती कमरपट्ट्यांत जपून ठेवीत तो राजाला प्रणाम करून आनंदाने बाहेर पडला.

●●●

## ५. ऑथाची सुटका!

बीमाँला वचन दिल्याप्रमाणे डॉर्टा सुमारे तासाभरात त्याच्या निवासस्थानी येऊन दाखल झाला. मध्यंतरीच्या काळात ऑथा व आरामी यांनी खाद्यपदार्थांवर ताव मारता मारता, खूप गप्पागोष्टी केल्या होत्या पण आपल्या आगमनाचा थांगपत्ता लागू न देण्याची खबरदारी मात्र उभयतांनीही घेतली होती. मॉन्शर फोके वॉक्स मुक्कामी राजेसाहेबांना जंगी मेजवानी देणार असून, राजेसाहेबांनी मेजवानीचे आमंत्रणही स्वीकारले आहे, एवढी माहिती मात्र आरामीने या चर्चेत प्रकट केली होती. डॉर्टा येताच सर्वांनीच त्याचे स्वागत केले. डॉर्टा स्थानापन्न होताच ऑथा एकदम उठून उभा राहिला व सुहास्य मुद्रेने म्हणाला, ''मॉन्शर बीमाँ! आरामी! मी तुम्हाला आता फार वेळ बुचकळ्यात ठेवीत नाही. मी इथे फ्रान्सचा राजा चौदावा लुई याचा कैदी म्हणून आलो आहे! मॉन्शर बीमाँ, तुम्ही तुमच्या एका कैद्याला आपल्या पंगतीचा लाभ दिला आहे!''

ऑथाचे भाषण ऐकताच बीमाँच्या तोंडून एक आश्चर्योद्गार बाहेर पडला. पण त्याचबरोबर ऑथासारखा काऊंटच्या दर्जाचा मनुष्य आपल्या संरक्षणाखाली आला याचा त्यास आनंदही झाला. उच्च दर्जाच्या कैद्यांना सांभाळण्यासाठी मिळणाऱ्या पैशातून बीमाँला चांगलाच हात मारता येई.

''राऊलमुळे ही भानगड निर्माण झाली वाटतं?'' आरामीने विचारले.

''बरोबर आहे तुझी कल्पना!'' ऑथा उत्तरला.

इतक्यात डॉर्टाने बीमाँच्या हाती एक कागद दिला. ''काऊंट ऑथा यांना बॅस्टाइलमध्ये कैदेत ठेवण्यात यावे!'' बीमाँनी हुकूम वाचला.

'''दुर्दैव माझं म्हणून या हुकूमाची अंमलबजावणी करण्याची पाळी मजवर येत आहे.'' दु:खाचा आविर्भाव करीत बीमाँ म्हणाला.

''नाही मॉन्शर बीमाँ, इतकं वाईट वाटण्याचं कारण नाही. ऑथा आपला पाहुणचार घेऊ इच्छित नाहीत! हा घ्या दुसरा हुकूम!'' डॉर्टा त्याच्यापुढे दुसरा एक कागद धरीत म्हणाला. बीमाँने तो दुसरा कागद घेऊन वाचला. ऑथाला तत्काळ मुक्त करण्याचा हुकूम होता तो. या दुसऱ्या हुकूमाने हातची शिकार गेल्यामुळे खजील झालेला बीमाँ म्हणाला, ''आता एखादा तिसरा हुकूम नाही ना आपल्या हाती?''

''डॉर्टा, तुला माझ्यासाठी राजाकडे याचना करावी लागली काय?'' ऑथाने विचारले.

''मुळीच नाही! बाहेर गेल्यानंतर सांगेन तुला सर्व काही!'' डॉर्टा म्हणाला.

''आरामी, तू येणार आमच्याबरोबर?'' ऑथाने विचारले.

''नाही, माझं थोडं काम आहे इथं!'' आरामी उत्तरला.

आणि मग डार्टा व ऑथा त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडले.

बॅस्टाईलमध्ये ही भानगड चालू असता, तिकडे ऑथाच्या बिऱ्हाडी दुसरीच घटना घडत होती. ऑथा घरी नसून तो डॉर्टाबरोबर बाहेर पडून बराच वेळ झाल्याची चर्चा ग्रीमाँने राऊलला घरी येताच सांगितली. ''बाबांना अटक झाली असावी अशी मला दाट शंका येते.'' राऊल ग्रीमाँला उद्देशून म्हणाला, ''मलाही तसंच वाटतं!'' ग्रीमाँने दुजोरा दिला.

मग ते दोघे पार्थाच्या बिऱ्हाडी गेले व त्यांनी आपली शंका पार्थाला बोलून दाखविली; पण पार्थाचा या गोष्टीवर विश्वास बसेना. शेवटी सर्वजण डॉर्टाचे घराकडे वळले; पण डॉर्टाही घरी नव्हताच! स्वाभाविक तिघेही गाडी करून बॅस्टाईलकडे जाण्यास निघाले. तुरुंगाच्या प्रवेशद्वारापाशी त्यांची गाडी जाण्यास व तुरुंगातून एक गाडी भरधाव बाहेर पडण्यास एकच गाठ पडली. ही गाडी जवळून जात असताच ग्रीमाँने चाणाक्षपणाने तीत डोकावून घेतलेच.

''नक्की या गाडीत धनी आहेत!'' तो म्हणाला.

पार्थाने लगेच त्या गाडीचा पाठलाग करण्याची आज्ञा आपल्या गाडीवाल्याला दिली. थोड्याच वेळात पुढील गाडीला त्यांनी गाठीत आणले. आपला पाठलाग होत आहे हे लक्षात येताच डॉर्टाने आपली गाडी उभी केली व पाठलाग करणाऱ्यांची हजेरी घेण्याच्या तयारीने तो उभा

राहिला. पाठलाग करणाऱ्यांत राऊल व पार्था आहेत हे पाहून डॉर्टाची हसता, हसता पुरेवाट झाली. त्याने राऊलचा हात पकडून विचारले, ''काय रे पोरा, काय गडबड चालवली आहेस?''

''कोण, पार्था आणि तू इथं?'' ऑथा पार्थाला पाहून हर्षातिरेकाने ओरडला.

''हाऽत्तेच्या साराच गोंधळ! या तुझ्या पोराने मला सांगितलं की, तुला पकडण्यात आलं आहे म्हणून!''

''मूर्ख आहे तो! मी व डॉर्टा जरा फिरावयास बाहेर पडलो होतो!''

''लेको तुरुंगात फिरावयास जातात होय?'' ऑथाची थापेबाजी चालू न देण्याच्या इराद्याने पार्था ओरडला.

''येता येता तुरुंगाधिकारी बीमाँ यांच्याकडे मेजवानी झोडली आम्ही! लेकाने दोन दिवसांपूर्वी आमंत्रण दिलं होतं!'' चोरावर मोर होऊन डार्टा म्हणाला, ''बीमाँ म्हणजे एक वल्ली आहे. तू ओळखतोस नाही त्याला पार्था?''

''होऽ!''

''आणि तिथे आरामीही भेटला आम्हाला!''

''तोही फिरत फिरत मेजवानीस आला असेल तुमच्याप्रमाणे? पार्थालाही विनोदबुद्धी आहे हे पाहून सर्वजण मोठ्याने होऽहोऽ करून हसू लागले.

''दोस्तहो, आता गप्पा मारीत बसण्यास वेळ नाही!'' ऑथा मध्येच म्हणाला, ''ग्रीमाँ आपल्याला ब्लाइला जावयाचं आहे, तयारी कर चटदिशी!''

''का रे, इतकी घाई का?'' पार्थाने विचारले.

''पॅरिसमध्ये आता माझं काम असं काही राहिलं नाही! मग गावी जाऊन स्वस्थ विश्रांती घेतलेली काय वाईट? राऊल, तूही चल माझ्याबरोबर!'' ऑथाच्या डोक्यात एकदा एक विचार आला की, तो बदलणे शक्य नाही, याची प्रत्येकाला खात्री असल्याने, पुढे कोणीच काही बोलले नाही. ऑथाने तत्काळ ब्लाईला जाण्याची तयारी केली व डॉर्टा, पार्था पितापुत्रांचा निरोप घेऊन बाहेर पडले.

''ऑथा व डॉर्टा बॅस्टाईलमधून बाहेर पडताच डोक्यावरील मोठेच ओझे दूर झाल्याप्रमाणे, एक दीर्घ सुस्कारा सोडून आरामी समाधानाने खुर्चीत रेलून बसला व म्हणाला, ''मॉन्शर बीमाँ, आता माझ्या मुख्य मुद्द्याकडे वळण्यास हरकत नाही!''

''बोला!'' बीमाँही समाधानपूर्वक म्हणाला.

''आपण एका गुप्त संस्थेचे सभासद आहात नाही?'' आरामीने त्याच्याकडे चौकसपणाने पाहात विचारले.

''गुप्त संस्थेचा सभासद?'' बीमाँने आश्चर्याचा धक्का बसल्याचा अभिनय करीत म्हटले.

''का? ही गोष्ट नाकारण्याचा आपला मानस आहे काय?''

''ही गोष्ट माझ्या गळीच बांधण्याचा तुमचा विचार आहे काय?''

''तुम्ही ही गोष्ट नाकारण्यात मुळीच अर्थ नाही! मी म्हणतो त्या गुप्तसंस्थेशी आपला काहीच संबंध नाही काय?''

''जवळ जवळ तसंच!''

''माझ्याकडे जेजुईट धर्मगुरू या नात्याने आलेल्या माहितीप्रमाणे बहुतेक सर्व गव्हर्नर्स व तुरुंगाधिकारी या संस्थेचे सभासद आहेत म्हणून विचारतो!'' आरामीच्या या बोलण्याने बीमाँ पांढराफट्‌ पडला व खुर्चीत मागे रेलला. नंतर काही वेळाने तो थरथरत्या अंगाने उठला व म्हणाला, ''बोला, तुमचं काय म्हणणं आहे?''

''तुम्ही माझ्या बोलण्याचा भावार्थ विचारात घेतला काय?''

''तुम्ही बोला, मी समजलो काय ते!''

''या संघटनेचे एक सभासद म्हणून मी तुमच्याशी बोलू शकतो काय?''

''होय!''

''तुमच्या ताब्यात असलेल्या एका कैद्याशी मला बोलावयाचं आहे.''

''कोणता कैदी?''

''मार्चेली!''

''आपण त्याच्याशी बोलू शकता!''

''चला मग.''

बीमाँ उठला व किल्ल्या घेऊन पुढे झाला. आरामी त्याच्या मागून चालू लागला.

▪ ▪ ▪

एका कैद्याच्या कोठडीत प्रवेश करून आरामीने कोठडीचे दार लावून घेतले. बीमाँ सचिंत मुद्रेने बाहेर उभा राहिला. कैदी एक तरुण मनुष्य होता व तो आपल्या हाता-पायांची जुडी करून बिछान्यावर उठून बसला.

''बॅस्टाइलची हवा तुम्हास कशी काय वाटते?'' आरामीने त्याला खवचटपणाने विचारले.

''छान!'' कैदी खिन्नपणाने म्हणाला.

''तुम्हाला इथे काही यातना होत नाहीत?''

''नाहीत!''

''आपल्याला स्वातंत्र्य नाही याचं दु:ख वाटत नाही?''

''स्वातंत्र्य म्हणजे काय तेच मला माहीत नाही!'' दीनवाणे स्मित करीत कैदी म्हणाला.

''ही कोठडी सोडून बाहेर जगात यावं असं तुम्हाला वाटत नाही?''

''बाहेर काय आहे याचीच मला कल्पना नाही!'

''प्रत्येक कैद्याने काही ना काही गुन्हा केलेला असतो हे तरी माहीत आहे तुम्हाला?''

''नाही, त्याचीही कल्पना नाही. कोणता गुन्हा केल्यामुळे मी इथे आलो आहे हेच मला माहीत नाही!''

''इथे येण्यापूर्वी आपण कुठे होता हे आठवतं?''

''हो, नाइसला!''

''तुम्हाला तिथून आणून इथे गुपचुपपणे डांबण्यात आलं नाही?''

''होय!''

''कारण?''

''माझी कर्मदशा!''

''तुम्ही राजपुत्र आहात याची कल्पना आहे तुम्हास?''

''साधारण शंका आहे!''

''दुर्दैवी राजपुत्रा, ऐक!'' आरामी आपला आवाज वाढवून बोलू लागला, ''फ्रान्सची राणी ॲन, हिने एकाच वेळी दोन राजपुत्रांना जन्म दिला. प्रथम जन्मलेल्या राजपुत्राला दरबारात नेऊन त्याचा नामकरणविधी व फ्रान्सच्या गादीचा वारसा जाहीर करण्याचा समारंभ चालू असताच इकडे राणीने दुसऱ्या एका मुलाला जन्म दिला. यापैकी वडील कोण? व फ्रान्सच्या गादीचा खरा वारस कोण हा वाद माजून तंटेबखेडे निर्माण होऊ नयेत म्हणून कार्डिनल रीशल्यू व त्याची कारस्थानी हस्तक मादाम शेव्हरूज यांनी या दुसऱ्या मुलाच्या जन्माची हकीकत खुद्द राजेसाहेबांच्या पासूनही गुप्त ठेविली व जन्मताच त्याची रवानगी अज्ञातवासात केली. आजच्या फ्रान्सच्या राजाला -चौदाव्या लुईलाही आपल्याला जुळा भाऊ आहे याची कल्पना नाही. राजमाता ॲन, मादाम शेव्हरूज व तिसरा मी यांखेरीज हे रहस्य माहीत असलेली चौथी व्यक्ती आज हयात नाही! रीशल्यू, माझारीन मरून गेले! नाइसहून तुमची उचलबांगडी करून इथे एकांतवासात तुम्हाला मरेपर्यंत कैदी म्हणून डांबण्याने हे रहस्य जगाच्या अंतापर्यंत गुप्त राहील, अशी कल्पना करून तुम्हाला इथे आणण्यात आलं आहे!''

आरामीचे भाषण ऐकून कैद्याच्या तोंडून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली. थरथर कापत तो म्हणाला, ''आपण म्हणता ते खरं असावं. मलाही काही वेळ ही शंका येत होती नाइसला असताना!''

''तुम्हाला तुमच्या मातेच्या आज्ञेवरूनच इथे आणून सोडणारा एका वेळचा शिलेदार आज धर्मगुरूच्या पेशात तुमच्या पुढे उभा आहे!'' आरामी म्हणाला.

''हे करण्यात आईचा उद्देश?''

''वाढत्या वयाबरोबर लुईमधील व तुमच्यामधील साम्य जगाला दिसू लागले; व मादाम शेव्हरूजचा विश्वास वाटेनासा झाला राणीला. तुमच्या मृत्यूची अफवा उठवून तुम्हाला गुपचुपपणे इथे आणण्यात आलं!''

''मला ही हकीकत आता सुनावण्याचं कारण? जे काही सांगावयाचं ते स्पष्टपणाने सांगा!'' भावनांनी व्याकूळ झालेला कैदी म्हणाला.

''आपण तेराव्या लुईचे पुत्र व सध्या फ्रान्सचा राजा असलेल्या चौदाव्या लुईचे बंधू आहात, त्यामुळे त्याच्याइतकाच आपलाही फ्रान्सच्या गादीवर हक्क आहे!'' कैद्याच्या व्यथेने किंचितही विचलित न होता आरामी दृढपणाने म्हणाला, ''आणि तुमच्यात व त्यांच्यात इतकं साम्य आहे की, गुपचुपपणाने त्याची जागा तुम्ही व तुमची जागा त्याने घेतल्यास जगाला या अदलाबदलीची काडीमात्र कल्पना येणार नाही!''

''माझ्या भावाचं रक्त न सांडता हा बदल होणार आहे काय?''

''तुम्हीच त्याच्या दैवाचे धनी होणार असल्याने तुम्ही म्हणाल तसं होऊ शकेल!''

''एका गुप्त गोष्टीचा फायदा घेऊन मला इथे आणण्यात आलं आहे एकंदरीत!''

''तुम्ही हाच डाव तुमच्या प्रतिस्पर्ध्यावर उलटवू शकाल!''

''तुमच्याखेरीज आणखी दोघांना ही गोष्ट माहीत आहे ना?''

''होय!''

''त्यांचा दृष्टिकोण याबाबत काय राहील?''

''काहीच नाही! हा बदल त्यांना उमगूच शकणार नाही!''

''माझी सद्‌सद्विवेकबुद्धी मला सारखी टोचत राहील!'' राजपुत्र फिलीप कष्टाने म्हणाला.

''राजकारणात सद्‌सद्विवेकबुद्धी ही चीज असत नाही!''

आपल्या आवाजात शक्य तितका कठोरपणा आणून आरामी म्हणाला. आपल्या हातातील प्यादे कच खाते की काय, अशी शंका त्याच्या मनात डाचू लागली.

''तुम्हाला एखादा भाऊ आहे काय?'' राजपुत्राने आरामीला विचारले.

''नाही, मी या जगात एकटाच आहे!''

''पण तुम्ही प्रेम करीत आहात, अशी एखादी व्यक्ती जगात नाही का?''

''आहे! मी तुमच्यावरच मनापासून प्रेम करतो!'' आणि मग राजपुत्र बराच वेळ काहीच बोलला नाही, नंतर तो म्हणाला, ''आपल्या सांगण्याचा विचार करण्यास मला काही कालावधी लागेल.''

''ठीक आहे, मी फिरून आपणास भेटेन!'' एवढे बोलून आरामी कोठडीतून बाहेर पडला. बीमाँ त्याची वाट पाहात बाहेर उभा होताच. बीमाँच्या निवासस्थानी येताच आरामी त्याला म्हणाला, ''आपण आता आपल्या व्यवहाराकडे वळू!''

''हं!''

''तुम्ही माझ्या दीड लाख लीव्हर्स परत देणार आहात ना? मी पावती लिहून आणली आहे!''

''मी रक्कम आपणास देत आहे.'' असे म्हणून बीमाँ आपल्या तिजोरीकडे जाण्यास वळला.

''ही पावती घ्या मॉन्शर बीमाँ! पण मला रक्कमेची मात्र गरज नाही!'' बीमाँने आश्चर्याने आऽच वासला पण त्याच्याकडे लक्षही न देता आरामी त्याच्या अंगावर पावती फेकून चालता झाला.

●●●

## ६. पार्थाचे गुप्त बेत

ऑथा ब्लाइला निघून गेल्यानंतर डॉर्टा व पार्था यांची फारशी अशी भेट कधीच झाली नाही. डॉर्टा राजाच्या तैनातीत असल्याने त्याला रिकामा असा फारसा वेळ मिळत नसे; आणि त्यामुळे मनात असूनही त्याला पार्थाला भेटणे अशक्य होई. एके दिवशी दुपारी थोडीशी फुरसत मिळताच मात्र डॉर्टाने पार्थाकडे धाव घेतली. डॉर्टा पार्थाच्या बिऱ्हाडी आला तेव्हा पार्थाचा नोकर मास्क टाँ एक भला मोठा जांभळा, मखमालीचा कोट धन्याला दाखवीत त्याच्यापुढे उभा होता, व पार्था खिन्न मुद्रेने त्या कोटाचे निरीक्षण करीत होता. डॉर्टाला पाहताच पार्थाची कळी जरा खुलली. ''वाऽ वा ऽ दोस्त, तू अगदी वेळेवर आलास!'' तो समाधानाने उद्गारला. मास्क टाँ कोट घेऊन बाजूला झाला. इतस्तत: पडलेल्या कपड्यांच्या ढिगाऱ्याकडे पाहून डॉर्टा आश्चर्याने ओरडला, ''हे रे काय? कुठे गावाला वगैरे जाण्याचा विचार आहे की काय तुझा?''

''छेऽ, नाही बुवा!''

''मग ही काय गडबड चालली आहे?''

''अरे एक मेजवानीचे आमंत्रण आहे. त्यासाठी जरा

चांगल्या कपड्याची निवडानिवड करीत आहे!''

''मेजवानी! आणि कुठे?''

''बाबा, मॉन्शर फोके वॉक्सला आख्या राजघराण्याला मेजवानी देणार आहेत, पॅरिसमधील बहुतेक सर्व बड्या लोकांना आमंत्रण गेलं आहे, जाणार आहे. माहीत नाही तुला?''

''मला कल्पना नाही गड्या!''

''वाऽ रे शहाण्या, बडी मजा येणार आहे या समारंभाला! फ्रान्समधील प्रत्येक चांगल्या गोष्टींचं प्रदर्शन होणार आहे तिथं.''

''मला काहीच कल्पना नाही याची!''

''येईल! येईल!! राजा तुला आणल्याशिवाय थोडाच राहणार आहे तिथं! पण माझीच मोठी पंचाईत झाली आहे. मनासारखे कपडेच मिळेनात! दोन-तीन दिवस तिथे राहावं लागणार असल्याने कपडे झक्क पाहिजेत. मोठ्या लोकांत वावरायचं म्हणून जरा प्रश्न आहे!''

''शहाण्या, आख्या फ्रान्समधील मखमली आणि रेशमी कपड्यांचे ढीग इथे पसरून बसला आहेस, आणि म्हणे मनाजोगे कपडे नाहीत!''

''हा सारा जुना बाजार आहे डॉर्टा! त्यात नावीन्य असं काहीच नाही!''

''आमंत्रण केव्हाचं आहे?''

''बुधवारचं!''

''आज तर रविवार! बुधवारपर्यंत हवे तेवढे कपडे तुला तयार करून मिळतील. मग तुला एवढी चिंता का?''

''पण आरामीने मला मंगळवारीच वॉक्समध्ये हजर राहण्यास सांगितलं आहे. कमीत कमी चोवीस तास आधी, मी तिथं आलं पाहिजे असा त्याचा आग्रह आहे.''

''आरामीचा त्यात काय संबंध?''

''आरामीने तर मला आमंत्रण आणून दिलं आहे, फोकेंच्या वतीने!''

''हंऽ अस्सं होय! म्हणजे मॉन्शर फोकेंच्याकडून तुझं आमंत्रण आलं आहे तर?''

''आमंत्रण-पत्रिकेत तर असं म्हटलं आहे की, राजेसाहेबांच्या कृपेने आपणास हे आमंत्रण देण्यात येत आहे.''

''छाऽन! पण तू मॉन्शर फोकेंच्या सहवासात असणार नाही?''

''ते आता तिथे गेल्यानंतर ठरेल! पण कपडे मिळाले तर सर्व गोष्टी!''

''एवढेच ना? मी तुला हवे तसले कपडे शिवून एक दिवसात देण्याची व्यवस्था करतो मग तर झालं? चल माझ्याबरोबर!''

डॉर्टा पार्थोला घेऊन राज-दर्जी पर्सेरीन याच्या दुकानी येऊन हजर झाला. ''मॉन्शर पर्सेरीन, मी आज तुमच्याकडे एक बडं गिऱ्हाईक आणलं आहे!'' डॉर्टा शिंप्याला म्हणाला.

''असं का?'' पर्सेरीन थोड्याफार निष्काळजीपणाने म्हणाला.

''याचं नाव बॅरन पार्थो!''

''अस्से!'' किंचित् लवून पर्सेरीनने भीमकाय पार्थोला अभिवादन केल्याचा अभिनय केला.

''माझे ते स्नेही आहेत!''

''मी त्यांचं काम जरूर करीन कॅप्टनसाहेब, पण त्याला थोडा कालावधी लागेल.''

''कालावधी लागेल? केव्हा करणार तुम्ही यांचं काम?''

''मला पहिल्या कामांतून मोकळीक झाली म्हणजे!''

''मोकळीक मिळवावयाची म्हटल्यास, केव्हाही मिळू शकते, नाही?'' पार्थो मध्येच म्हणाला. त्या वाक्याने म्हातारा शिंपी चांगलाच लालीलाल झाला व म्हणाला, ''आपण काहीही तर्क करू शकता महाशय!'' पार्थो खवळला म्हणजे सारेच प्रकरण गोत्यात येईल या भीतीने डॉर्टा गडबडीने म्हणाला, ''आज आपली मनस्थिती ठीक दिसत नाही. अहो हे माझेच मित्र नाहीत; मॉ.फोकेंचेही निकटवर्ती स्नेही आहेत!''

''मला कोणाचा वशिला नको आहे, माझं काम होणार की नाही एवढंच मला पाहिजे आहे?'' पार्थो गरजला.

''कमीत कमी आठ दिवस लागतील मला आपलं काम करण्यास!'' दोघांच्या बोलण्याचा काडीमात्र परिणाम न झालेला पर्सेरीन म्हणाला.

''मग सरळ नाही म्हणाना? वॉक्स येथील समारंभ आटोपल्यानंतर मला तुमचे कपडे घेऊन काय करावयाचे

आहेत?''

''मॉन्शर पर्सेरीन, तुम्ही काम पत्करलं पाहिजे, माझाही तसा आग्रह आहे.'' दारावरील पडदा दूर करून आत येता येता एक व्यक्ती म्हणाली. आणि मग सर्वजण त्या आवाजाच्या दिशेने पाहू लागले. तो आरामी होता. पर्सेरीनवर आरामीचे बरेच वजन असावेसे दिसले. कारण, मग पर्सेरीनने विशेष खळखळ न करता पार्थाचे काम स्वीकारले; व डॉर्टा-पार्थाला वाटेला लावण्याच्या दृष्टीने त्याने हालचालींना सुरुवात केली. पार्थाला, मापे देण्यासाठी त्याने आरामी बाहेर पडलेल्या खोलीत जाण्यास सांगितले. ''तुलाही कपडे शिवावयाचे आहेत काय?'' डॉर्टाने आरामीला विचारले.

''नाही!''

''तुला वॉक्सला जावयाचं आहे ना?''

''पण त्यासाठी नवेच कपडे कशाला हवेत? मी आता जुना थाटमाट सोडून दिला आहे!'' आरामी हसून म्हणाला, ''मी दुसऱ्या काही कामासाठी आलो आहे!''

''तुझं काही गुपित असेल तर मी जातो आपला!''

''छेऽरे तसं काहीच नाही!'' आरामी हे बोलला पण अशा रीतीने बोलला की डॉर्टाने तेथे थांबू नये असाच आविर्भाव त्यात प्रकट झाला. डॉर्टा आरामीला सोडून शेजारच्या खोलीत गेला तेव्हा तेथे पार्थांची मापे घेण्याचे काम चालू होते. त्याच्या पाठोपाठ आरामीही पण तेथे आला.

''पार्था, तुझ्या मापाचा आरसा पॅरिसमध्ये मिळणं कठीणच दिसतं!'' आरशात पाहात उभ्या असलेल्या पार्थाला उद्देशून डॉर्टा म्हणाला.

हाऽहाऽ करून पार्था नुसताच मोठ्याने हसला. त्याच्या हसण्याने ती खोली चांगलीच हादरली. आपले अस्तित्व आरामीला नको आहे याची जाणीव डॉर्टाला असल्याने तो पार्थाला घेऊन थोड्याच वेळात बाहेर पडला. आरामीचे त्या शिंप्याकडे असलेले वळण, व त्याच्यावर त्याचे असलेले वजन, हे एक मोठे गूढ आहे याची जाणीव त्याला झाली होती व वाटभर त्या गूढाचाच विचार करीत तो चालला होता.

▪ ▪ ▪

बॅस्टाइल तुरुंगाच्या प्रवेशद्वारावर असलेल्या भल्या मोठ्या घड्याळाने घाण् घाऽण्ऽ करून सायंकाळच्या साताचे ठोके दिले; व आरामीची गाडी द्वारपालाने दार उघडून आत घेतली. तुरुंगाच्या आवारातील तुरुंगाधिकारी बीमाँ, यांच्या निवासस्थानापुढे गाडी उभी करून आरामीने बाहेर उडी टाकली व तो तडक आत शिरला. बीमाँ खाना घेण्याच्या तयारीने खुर्चीवर बसला होता. आरामीला पाहाताच त्याने त्याचे स्वागत करून त्याला आपल्याजवळ खुर्चीवर बसवून घेतले. ''भले, महाराज! आपण आज एकाएकी इकडे कुणीकडे?'' त्याने विचारले.

''आज तुमच्याकडील उंची मद्याचा आस्वाद घेण्याची जरा लहर आली!''

''जरूर! जरूर!!'' टेबलावरील एक भले मोठे काचपात्र आरामीकडे सरकवीत बीमाँ म्हणाला. इतक्यात एक पहारेवाला आत आला व म्हणाला, ''तातडीचा हुकूम घेऊन कोणी एक जासूद आला आहे.''

''एऽ जाऽसूद! बैस म्हणावं त्याला थोडा वेळ कचेरीत!'' बेपर्वाईने बीमाँ म्हणाला.

''पाहा, नाहीतर कसलं तरी महत्वाचं काम असावयाचं!'' आरामीने सुचविले.

''कसलं महत्वाचं काम आलं आहे? ही वेळ माझ्या विश्रांतीची आहे!'' मद्याने काचपात्र भरीत बीमाँ म्हणाला.

''कोणी सांगावं राजाचाही हुकूम असावयाचा एखादा! तुम्ही आपली भेट घ्या त्याची! मद्य काय मग पिऊ सावकाश!'' आरामीने नेट केल्यामुळे बीमाँचा नाइलाज झाला. त्याने पहारेवाल्याला त्या जासूदाला आत पाठवून देण्यास सांगितले. तो आत येताच बीमाँने त्याच्या हातातील कागद घेतला व नीट वाचून टेबलावर ठेवून दिला.

''काय भानगड आहे?'' आरामीने विचारले.

''एका कैद्याला सोडून देण्याचा हुकूम आहे.''

''छान! कुणाचं दैव उघडलं बुवा आज?''

''आताच्या आता रात्री आठाला सोडण्याचा हुकूम आहे!'' कपाळाला आठ्या घालून बीमाँ म्हणाला.

''वा ऽ मोठा आनंद होईल त्या दुर्दैवी प्राण्याला, ही अनपेक्षित वार्ता ऐकून!

''पाच फ्रँक्स मंजूर असलेला एक भिकारडा कैदी तो

काय आणि त्याच्यासाठी ही अवेळी जिकीर ती काय!''

''पण हुकूम तर तातडीचा दिसतो!''

''तातडीचा हुकूम ही आजकालची एक सामान्य बाब होऊन बसली आहे!'' असे म्हणत बीमाँने मद्याचा एक चषक घेऊन तोंडाला लावला व दरवाज्याकडे वळून पहारेवाल्याला हाक मारली. बीमाँची पाठ वळताच आरामीने टेबलावरील कागद उचलून चर्ट्दिशी खिशात घातला व दुसरा कागद तेथे ठेवून दिला.

''काय त्रास आहे शिंचा! यावेळी या कैद्याची मुक्तता करावयाची! तो जाणार कुठं? रात्री खाणार काय, वस्ती कुठं करणार? काहीतरी दखल!''

''मी नेईन त्याला. तेवढेच उपकार होतील त्याच्यावर! सकाळी त्याचं तो पाहील कुठं जावयाचं ते!'' आरामी सहानुभूतीने म्हणाला.

''तुमच्याकडे काय सर्व प्रश्नांची उत्तरं तयार आहेत!'' नंतर पहारेकऱ्याकडे वळून बीमाँ म्हणाला, ''चल बाबा! तीन नंबरच्या खोलीतील सेल्डन नावाच्या कैद्याची मुक्तता करावयाची आहे.''

''सेल्डन!'' आरामी आश्चर्याने ओरडला.

''का?''

''मला वाटतं तुमची काहीतरी चूक होत आहे!''

''ती कशी काय?''

''मघाशी सहज, हुकूमातील मजकुरावर मी नजर फिरविली त्यात तर दुसरंच नाव दिसतं!''

''आँऽ असं कसं होईल?'' असे म्हणून बीमाँने हुकुमाचा कागद डोळ्यापुढे धरला आणि त्याचा चेहेरा काळा ठिक्कर पडला. कपाळावर घामाचे थेंब उभे राहिले.

''का? काय झालं?'' आरामीने हलक्या आवाजात विचारले.

''या हुकुमात 'मार्चेली' असे नाव आहे! मला वाटतं मी सेल्डन हे नाव वाचलं होतं!'' चिंतातुरपणे बीमाँ चाचरत म्हणाला.

''मग आता मार्चेलीचं नाव कसं येईल त्यात?''

''मलाही हेच कोडं आहे! हुकुमाची अदलाबदल झाल्याशिवाय ही गोष्ट शक्य नाही!''

''काही झालं तरी या हुकुमाप्रमाणे मार्चेलीची मुक्तता तुम्ही करणार ना?''

''या हुकुमाच्या खरेपणाची मला शंका आहे! हा कागद बनावट दिसतो!''

''राजाची सही आहे ना त्यावर?''

''सही बनावट करता येते!''

''राजाची सही तुमच्या परिचयाची आहे ना?''

''आहे!''

''मग?''

''पण ही राजाची सही असल्याबद्दलची खातरजमा देणारी मंत्र्याची सही या हुकुमावर नसल्याने, राजाची सही बनावट असावी अशी शंका घेण्यास जागा आहे!''

''या हुकुमाप्रमाणे कैद्यास सोडण्याची तुमची तयारी नाही तर?''

''जरा विचार करणं भाग आहे!''

''आरामीने तत्काळ दौत टाक घेऊन टेबलावर पडलेल्या एका कागदावर काही मजकूर लिहिला व तो कागद बीमाँचे हाती दिला. त्या कागदावर एक क्रॉसचे चिन्ह काढले होते व खाली लिहिले होते-

''परमेश्वरी इच्छेने मॉन्शर बीमाँ यांना फर्माविण्यात येते की, हाती येणाऱ्या हुकुमाबद्दल कोणतीही शंका कुशंका न काढता त्याप्रमाणे कैद्याची मुक्तता करण्यात यावी!''

डी हर्बले
परमेश्वरी आज्ञेने गुप्तसंस्था प्रमुख.

बीमाँने हा मजकूर वाचला मात्र, त्याची दातखीळ बसल्याप्रमाणे झाली. कपाळावरून ओघळणारा घाम टिपीत त्याने किल्ल्या घेतल्या व कंदील घेऊन पहारेकऱ्याला पुढे चलण्यास सांगून तो कैद्याची मुक्तता करण्यासाठी निघाला. आरामीही त्याच्या पाठोपाठ बाहेर पडला.

सुमारे अर्ध्या तासात आरामी मुक्त झालेल्या कैद्यासह गाडीत येऊन बसला, ''चलो!'' त्याने गाडीवाल्याला फर्मावले. मशाल धारण करणारा एक संत्री गाडीबरोबर धावत होता व प्रत्येक नाक्यावर गाडी न अडविण्याची सूचना देत होता. तुरुंगाच्या बाहेर पडताच गाडीचा वेग

वाढविण्यात आला. थोड्याच वेळात गाडी भर वेगाने पॅरिसच्या बाहेर पडली. पॅरिसपासून बऱ्याच अंतरावर असलेल्या एका जंगलात येताच गाडी उभी करण्यात आली. गाडीवानाला आरामीने खूण करताच तो दूर निघून गेला व एका झाडाखाली जाऊन उभा राहिला.

''राजकुमार, आपण आता जरा खुलासेवार बोलू!'' आरामी आपल्या बरोबर आणलेल्या कैद्याला उद्देशून म्हणाला.

''बोला!'' राजपुत्र फिलीप म्हणाला.

''आपल्याला प्रचलित फ्रेंच राजकारणाची कल्पना असणं शक्य नाही! सध्या दिव्याखाली अंधार आहे इथं! स्वार्थी आणि तोंडपुजे लोकांनी राजा वेढला गेला आहे!''

''बरं मग?''

''आपण लुईइतकेच फ्रेंच गादीचे वारसदार आहात! आपणाला गादीवर बसवून, सध्याच्या राजाला, तुमच्या जागी तुरुंगात पाठविणे हाच यावर उपाय दिसतो!''

''मी समजलो!''

''रीशल्यू, माझारीन आणि राजमाता ॲन यांचे हे कारस्थान उलथून टाकावयाचं आहे आपल्याला!''

''आईच्या आणि शेव्हरूजच्या नजरेतून ही गोष्ट सुटेल असं वाटतं तुम्हाला?''

''तुम्ही लुईचं नाटक हुबेहूब वठविण्याने ही गोष्ट सहज शक्य आहे. कारण आजारीपणामुळे व काही बेबनावामुळे लुईचा व राजमातेचा संबंध क्वचितच येतो!''

''लुईचं लग्न झालं आहे ही गोष्ट विसरता तुम्ही! तिच्या बाबत मी काय करावं?''

''लुईने ल्यूसी नावाच्या तरुणीशी हल्ली लगट चालू केली असल्याने ती जरा नाखूश आहे. स्पेनच्या राजेसाहेबांना सांगून मी घटस्फोट मिळवून देण्याची व्यवस्था करीत आहे; नंतर दुसरा विवाह करण्यास माझी काहीच हरकत नाही! तोपर्यंत तुमचं ल्यूसीवरील प्रेमाचं नाटक चालू ठेवणं भाग आहे.''

''पण कैदेत पाठविला जाणारा माझा भाऊ बोलेल की?''

''कोणाशी? भिंतीशी?''

''ठीक आहे! फ्रान्सचा राजमुकुट मला जिथं मिळेल तिथं येण्यास मी तयार आहे!''

''हा निर्णय तुम्ही खंबीरपणाने करीत आहात असं मानतो मी!''

''जरूर!''

''आता फक्त ल्यूसीला जपा! निळ्या डोळ्यांची ती एक सुंदर तरुणी आहे. प्रियकराच्या बारीक खाचाखोचा तरुणींच्या तीक्ष्ण नजरेतून सुटणं कठीण असतं! तिच्याशी वागताना जरा काळजीपूर्वक वागा म्हणजे झालं!

''ठीक आहे! या घटकेपासून तुम्ही माझे गुरू आहात. तुम्ही पढवाल त्याप्रमाणे मी वागेन! मला काहीच माहिती नाही.''

''आता एकच व्यक्ती महत्वाची अशी राहिली, ती म्हणजे राजशिलेदारांचा कप्तान मॉन्शर डॉर्टा!''

''ठीक आहे!''

''त्याला चकविणं कठीण आहे!''

''मग आपण परतूया!''

''नाही! तो माझा मित्र आहे. आणि आज ना उद्या ही हकिकत मी त्याला सांगणारच आहे! पण तोपर्यंत मात्र त्याच्याशी अत्यंत सावधगिरीने वागलं पाहिजे!''

''ठीक आहे!''

''पार्था नावाचे माझे आणखी एक स्नेही आहेत. फ्रान्समध्ये त्यांच्या इतका सामर्थ्यवान दुसरा मनुष्य नाही! दुसरे म्हणजे काऊंट ऑथा आणि त्यांचा मुलगा राऊल! आम्हा चौघांचंही त्याच्यावर पुत्रवत् प्रेम आहे!''

''छान! छान!!'' राजपुत्र फिलीप उदासवाणेपणाने म्हणाला.

''आता माझं असं एक मागणं आहे!''

''बोला!''

''मॉन्शर फोकेंना तुम्ही आपले मंत्री म्हणून कायम ठेवलं पाहिजे! त्यांच्यासारखा दिलदार व चांगला मनुष्य सर्व फ्रान्समध्ये मिळणार नाही!''

''सोपी गोष्ट आहे ही!''

''मला कार्डिनलचा हुद्दा दिला तरी चालेल!''

''बस्स!''

''सध्या पुरे! फोकेंना त्यांचं मंत्रीपद वृद्धापकाळामुळे सोडावं लागलं तर पुढे मला मिळावं!''

''अगदी स्वाभाविक मागण्या आहेत तुमच्या या!'' असे म्हणून फिलीपने आरामीचा हात प्रेमाने दाबला. अगदी याच वेळी दूरवर कोठे तरी घुबडाने केलेला घूत्कार त्यांच्या कानी आला व दोघेही थोडेफार दचकले.

आणि मग थोड्याच वेळात गाडी वॉक्सच्या दिशेने तुफान दौडत निघाली.

●●●

## ७. वॉक्सला

वॉक्स येथील मॉन्शर फोकेंचा प्रासाद राजाला देण्यात येणाऱ्या मेजवानीच्या निमित्ताने फार मोठ्या प्रमाणात शृंगारण्यात आला होता. तत्कालीन युरोपमध्ये फ्रान्सचा राजा हे एक बडे प्रस्थ असल्यामुळे त्याच्या कोणत्याही सुखसोयीत न्यून पडू नये म्हणून संपूर्ण दक्षता घेण्यात आरामीने किंचितही कसूर होऊ दिली नव्हती. फोकेंच्या या वसाहतीवर अनेक कौशल्यसंपन्न कारागीर रात्रंदिवस राबून राज-रंजनाची तयारी करीत होते.

येणाऱ्या असंख्य पाहुण्यांची सोय करण्यासाठी खुद्द प्रासादात व आजूबाजूस अनेक लहान मोठी शृंगारलेली दालने तयार करण्यात आली होती. चौदाव्या लुईचे एक प्रचंड तैलचित्र मधील मोठ्या दिवाणखान्यात लावण्यात आले होते. आत येणाऱ्या प्रत्येकाला आपल्यासमोर प्रत्यक्ष राजाच उभा आहे की काय असा भास निर्माण व्हावा इतके हुबेहूब चित्र, चित्रकाराकडून परिश्रमपूर्वक काढून घेण्यात आले होते. दिवाणखान्यावरील घुमटाची रचना मोठी सुबक करण्यात आली असून त्याला लावलेल्या निळ्या रंगामुळे आपण नीलवर्ण निरभ्र आकाशाखाली उभे आहोत की काय असा भास निर्माण होत होता.

अनेक कलावंतांचे ताफे आधीच येऊन हजर झाले होते. कवी, नट. नर्तिका, तमासगीर, दारूकाम सोडणारे कारागीर एक ना दोन, अनेक माणसांनी वॉक्सची वसाहत नुसती फुलून गेली होती. आख्या फ्रान्समधील कला व सौंदर्य, या कार्यक्रमाच्या निमित्ताने तेथे एकवटले होते.

आज राजाचे आगमन वॉक्समध्ये होणार होते. मॉन्शर फोके व आरामी सरकार-स्वारीच्या आगमनाची वाटच पाहात होते. राजाच्या स्वागताची सर्व तयारी त्यांनी जय्यत ठेविली होती. ''मला वाटतं आणखी एक तासाभरात राजेसाहेबांचे आगमन होईल!'' फोके म्हणाले.

''हांऽ तासाभरात यावीत मंडळी असं वाटतं!'' आपले नेहमीचे स्मित करीत आरामी म्हणाला.

''आज राजा आपला पाहुणचार घेणार!'' हा पोऱ्या मला अतिशय आवडतो! तो येथे येत असल्याने तर मला त्याच्याबद्दल फारच आदर वाटू लागला आहे!''

''छाऽन् कोलबर्टने अद्यापि त्याचे कान भरलेले नसतील अशी तुमची कल्पना दिसते. येथील मेजवानी संपताच त्याची अवकृपा तुमच्यावर झाली नाही म्हणजे मिळविली! आरामीच्या या भाषणाने फोकेंचा चेहेरा एकदम पडला. आरामी जाण्यास निघाल्याचे पाहून त्यांनी विचारले, ''आरामी, तुम्ही कुठे चालला?''

''खोलीवर जाऊन जरा कपडे बदलतो!''

''तुम्ही कोणती खोली आपल्याकडे ठेवली आहे!''

''राजाला उतरण्यासाठी राखून ठेवलेल्या दिवाणखान्यावरील!''

''ती खोली तुम्ही उगीच घेतली! राजा खालीच असल्याने तुम्हाला अगदी जपून वावरावं लागणार! जराही गडबड, धांदल करणं शक्य होणार नाही तिथं!''

''माझ्याजवळ माणसंच नाहीत कोणी. अवघा एक नोकर आणि तोही माझ्याच शिस्तीत तयार झालेला, त्यामुळे गोंगाट होण्याचा प्रश्नच नाही.'' असे म्हणून फोकेंना अभिवादन करून आरामी चालू लागला.

■ ■ ■

राजा वॉक्सला जाण्यासाठी निघाला, आणि आपल्या सर्व लवाजम्यानिशी त्याने मेलून शहरी प्रवेश केला. या

शहराला भेट देण्याचा त्याचा उद्देश एवढाच होता की, थोडी वाकडी वाट झाली तरी मेलूनच्या नागरिकांची मनीषा पूर्ण केल्याचे श्रेय अनायासे मिळणार होते. हे शहर उंची मद्याबद्दल प्रसिद्ध असल्याने, तेथील जनतेला आपल्या राजाला त्याची लज्जत देण्याची फार तीव्र इच्छा होती. मेलूनच्या नागरिकांचा पाहुणचार स्वीकारून राजा पुढे वॉक्सला जाण्यास निघणार होता. डॉर्टाला पुढे धाडून त्याने आपण लवकरच येत असल्याची वर्दी मॉन्शर फोकेंना देण्याची व्यवस्था केली.

डॉर्टाने आपली कामगिरी बजावली व तो आरामीच्या शोधास लागला. आरामी आपल्या खोलीत बसून राजाच्या करमणुकीसाठी काय काय कार्यक्रम आखावे त्याची योजना ठरवीत होता. त्याला मदत करण्याचे काम पार्थो करीत होता. डार्टाला फोकेंच्या नोकराने तेथे आणून सोडताच आरामी उठून पुढे झाला व त्याने अपाल्या मित्रांचे मन:पूर्वक स्वागत केले.

''छान! वॉक्सला येऊन तर पोहोचलो आम्ही!'' डॉर्टा त्याला म्हणाला.

''तुला कशी काय आवडली ही जागा?'' आरामीने विचारले.

''उत्तम! मॉन्शर फोकेंची निवड, मग काय विचारतोस?'

''फोके म्हणजे एक नामांकित प्राणी आहे असे नाही वाटत तुला?''

''जरूर! मध्यंतरी राजेसाहेब त्यांच्यावर जरा बिघडले असावेतसं वाटलं होतं मला! पण आता त्यांचा दृष्टिकोण बदललेला दिसतो!''

''कोणीतरी त्यांचे कान भरले असतील! सध्याचं फ्रान्सचं राजकारण हे असंच आहे!''

''पण तू आहेस फोकेंचा सल्लागार! बेत तर मोठा नामी आखलेला दिसतोस आरामी! मेजवानीची सर्व जबाबदारी तुझ्यावर टाकण्यात माँ. फोकेंनी नि:संशय मार्मिकता दाखविली आहे!''

डॉर्टा खोचून बोलत असावा अशी शंका निष्कारणच आरामीच्या मनात डोकावून गेली. पण त्याने तसे काही दाखवून दिले नाही.

''मला तर इथला थाटमाट पाहून निराळीच शंका आली!''

''कोणती शंका?''

''फ्रान्सचा राजा चौदावा लुई नसून.....

''काय?'' आरामी मध्येच ओरडला; व डॉर्टाच्या अंत:करणाचा ठाव घेण्यासाठी त्याने त्याच्याकडे निरखून पाहिले.

''नाही म्हटलं फ्रान्सचे राजे चौदावे लुई नसून मॉन्शर फोकेच आहेत, असं मला वाटलं!''

''अस्सं होय!'' समाधानाचा एक सुस्कारा सोडून आरामी म्हणाला, ''फोकेंच्या वैभवाचा हेवा करणारे अनेक लोक फ्रान्समध्ये आहेत, त्यात तूही एक आहेस म्हणायचा! हा शोध मॉन्शर कोलबर्टचा असेल नाही?''

''कोलबर्टने हा शोध लावण्याचं कारण? लोकांना हे दिसत नाही काय?''

''दिसत असेल ना! पण त्यांना चिथावणी देण्याचं सत्कृत्य या पागल माणसाखेरीज कोण करणार? अती क्षुद्र बुद्धीचा माणूस आहे तो!''

''पण आता तर तो मंत्री होणार म्हणून वदंता आहे!''

''मग रीशल्यू, माझारीन, यांच्याप्रमाणे तुला कोलबर्टची नोकरी करावी लागणार डॉर्टा!''

''तू मॉन्शर फोकेंची करीत आहेसच की,!'' डॉर्टा हसत म्हणाला.

''पण मॉन्शर फोके म्हणजे कोलबर्ट नव्हे!''

''पण ही वदंता खोटी ठरली तर मीसुद्धा त्यांच्याच चाकरीत राहीन, आरामी!''

''पण तसं झालं तर!''

''म्हणजे फोकेंचा अध:पात होईल अशी दाट शंका वाटते तुला आरामी?''

''हो! राजाच्या कानाला कोण कुठं, कसे लागतील याचा नेम राहिलेला नाही डॉर्टा सध्या!''

''मग मेजवानीचा हा अवाढव्य खर्च फोकेंना सावरण्यासाठी आहे, असं म्हण की!''

''हा एक प्रयत्न आहे. यशस्वी झाला तर ठीक, नाहीतर सर्वनाश ठेवलेलाच आहे!''

''मग हा जुगार खेळण्याचा सल्ला तू का दिलास?

अनर्थ पैसा खर्च करण्यास लावला असशील तू त्या कामी! अशाने कोलबर्टचं वाढतं प्रस्थ कमी होईलसं वाटतं तुला?''

''काही तरी धडपड तरी करायला पाहिजे!''

''मॉन्शर फोकेंच्या विरुद्ध नवं मंत्रीमंडळ तयार होत आलं आहे अशी शंका मला येते. तशात या खर्चाने त्याचं कंबरडं संपूर्ण मोडून जाईल अशी भीती मला वाटते, आरामी!''

''राजाला खूश करण्यासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या माणसाविरुद्ध कारस्थानं करणाऱ्या लोकांशी राजेसाहेबांना सहमत व्हायचं असेल तर त्याला आम्ही तरी काय करणार?''

''सारा मूर्खांचा बाजार आहेच, पण त्यात तूही सामील होत आहेस असलं पोरकट तर्कशास्त्र लढवून, आरामी!''

''म्हणजे काय?''

''हा थाटमाट फोकेंची अब्रू बचावण्यास उपयोगी पडेल असं वाटतं तुला?''

''तसं नसेल तर मी या भरीलाच पडलो नसतो, डॉर्टा!''

''ही उधळपट्टी आहे! तुम्ही त्या समारंभासाठी पर्सेरीनकडे शिवलेल्या कपड्यांचीही दखल आहे मला! राजेसाहेबांना देण्यासाठी म्हणून त्यांच्या मापाचे कित्येक कपडे शिवून घेण्यात लाखो फ्रँक्स उडवलेस ना तू?''

डॉर्टाच्या या भाषणाने आरामी चांगलाच गोंधळला; पण तोही पुरता बनेल असल्याने अगदी शांतपणाने म्हणाला, ''एकदा एखादा कार्यक्रम हाती घेतला की, तो शक्य तितका चित्तवेधक आणि उठावदार होण्यासाठी झटणं एवढंच मी जाणतो. त्यामध्ये मला पैसा व्यत्यय आणू शकत नाही, हे तुला माहीत आहे डॉर्टा!''

''राजाला मेजवानी द्यायची, त्याचा सत्कार करायचा म्हटल्यावर पैशाची पर्वा कोण करतो?'' बेफिकिरपणाचे संपूर्ण प्रदर्शन करीत आरामी म्हणाला.

डॉर्टा आरामीचे दोनही हात आपल्या हाती घेऊन म्हणाला, ''आरामी, तू मला अद्यापि मानतोस? आपल्या प्रेमाचे धागेदोरे अद्यापि शाबूत आहेत पूर्वीप्रमाणे?''

''मग तुला शंका का येते?'' आरामी सौम्यपणाने हसून म्हणाला.

''मग मला सांग, पर्सेरीनकडे राजाच्या मापाचे अनेक पोषाख तू का शिवून घेतले आहेस?''

''भेट देण्यासाठी!''

''मी त्यावर विश्वास ठेवू?''

''डॉर्टा, तू मूर्खासारखा काहीतरी शंकेने पछाडला गेला आहेस!''

''तुझा दुसरा काहीही उद्देश नाही?''

''नाही.''

''ठीक आहे!'' असे म्हणून डॉर्टा बाहेर पडला. आपणा चौघांपैकी तिघे येथे आहोत, पण पार्था आरामी आपणापासून दूर जात आहेत असा विचार डॉर्टाच्या मनात चमकून गेला. पूर्वी आपण सर्वजण एक मताने, एक दिलाने वावरत होतो, पण ते दिवस आता मागे पडले, आज कोठे तरी, काहीतरी आपणामध्ये खटकते आहे ही जाणीवही त्याला झाली. आरामीला फिरून एकदा गाठून नीट खुलासा करून घेण्याचे त्याने ठरविले व मग झपाझप पावले उचलून तो राजाच्या स्वागतात सामील होण्यासाठी निघाला.

राजाचे आगमन होताच, वॉक्समध्ये आनंदाला व उत्साहाला एकच भरती आली. मेजवान्या झडू लागल्या. नृत्यगायनादि करमणुकीच्या कार्यक्रमांची एकच झिम्मड उठली. परंतु या कार्यक्रमांचा सूत्रधार आरामी मात्र फारसा कोठे वावरताना दिसत नव्हता, व त्यामुळे डॉर्टाचे मन संशयाने ग्रासले गेले. शेवटी सायंकाळी डॉर्टाने आरामीला त्याच्या निवासस्थानी गाठलेच व विचारले, ''आरामी, तू काहीतरी भानगडीत गुंतला आहेस. मला स्पष्ट काय ते सांग पाहू!''

''तुझा संशय अद्यापि फिटला नाही, असं दिसतं डॉर्टा?''

''खरं आहे!''

''मित्राच्या शब्दावर तुझा विश्वास नाही काय?''

''तू मित्र या नात्याने मला सांगत असशील तर मी विश्वास ठेवीन, पण राजाच्या शरीरसंरक्षकाला उद्देशून बोलत असशील तर मात्र विश्वास ठेवणं कठीण आहे!''

''मी दोघांनाही उद्देशून सांगतो डॉर्टा! फ्रान्सच्या खऱ्या राजाला या प्रासादामध्ये नि:संकोचपणे वावरण्यास काहीच हरकत नाही. त्याच्या विरुद्ध कोणतीही कारवाई करण्याचं माझ्या मनात नाही!'' आरामी शांत व निश्चयी आवाजात

म्हणाला. डॉर्टाने प्रेमाने आरामीचे हात दाबले व तो जावयास निघाला.

''तू निघालास?''

''होय! मला कामावर हजर झालंच पाहिजे! पार्थाचे निवासस्थान कुठं आहे रे?''

''त्याच्या सहवासात झोपणं म्हणजे तोफांच्या गडगडाटात झोपण्याचा प्रयत्न करणं! फार घोरतो तो. त्याला नेणार का, म्हणजे राजाला शांत झोप लागेल त्याच्या सान्निध्यात.''

''ठीक आहे! मला वाटलं त्याला स्वतंत्र खोली दिली असशील! तो इथंच तुझ्याजवळ असतो तर?'' असे म्हणून डॉर्टाने तेथेच घोरत पडलेल्या पार्थाला उठविले व तो त्याला घेऊन बाहेर पडला. ते दोघे बाहेर पडताच आरामीने गडबडीने दार लावून घेतले; व एक कळ दाबून तेथील चोरदरवाजा उघडला. राजपुत्र फिलिप तत्काळ बाहेर आला व म्हणाला, ''डॉर्टाना काहीतरी शंका आलेली दिसते!''

''तुम्ही डॉर्टाला ओळखलं काय?''

''होय! तुम्ही केलेल्या वर्णनाप्रमाणे मोठी चाणाक्ष व्यक्ती दिसते!''

''राजाच्या दिमतीला असलेल्या शिलेदारांचा तो प्रमुख असून शरीरसंरक्षक म्हणूनही त्याची नेमणूक झालेली आहे!''

''खरा विश्वासू प्राणी दिसतो!''

''आपलं कारस्थान संपूर्ण पार पडेपर्यंत त्याची व तुमची नजरानजर होता उपयोगी नाही. आपलं नाटक पार पडल्यानंतर त्याच्या लक्षात हा अदलाबदल आला तर मग भीती नाही! कारण तो गॅस्कन आहे. आपली फसवणूक झाली आहे हे तो कधीच मान्य करणार नाही व चौदाव्या लुईच्या जागी तुमच्या जिवाला जीव देईल!''

''ठीक आहे!'' फिलिप थोडाफार अस्वस्थ होऊन म्हणाला. नंतर आरामीने त्याच्यासह त्या गुप्त जागेत प्रवेश केला व दार लावून घेतले. या गुप्त ठिकाणामधून चौदाव्या लुईची सर्व हालचाल पाहता येईल व तेथे होणारे प्रत्येक संभाषण ऐकता येईल अशी व्यवस्था करण्यात आली होती. आरामी व फिलिप यांनी राजाच्या बैठकीच्या जागेकडे नजर टाकली तो राजदर्शनासाठी तेथे आलेला कोलबर्ट त्यांना दिसला. मुकाट्याने तेथे बसून ते राजा व कोलबर्ट यांचे भाषण ऐकू लागले.

''छेऽछे! मॉन्शर फोकेंनी मेजवानीचा थाट अगदी अजब करून टाकला आहे! मला सुद्धा असला समारंभ करणं शक्य होणार नाही. फोकेंची आसामी मोठी जबरदस्तच असली पाहिजे!'' राजा कोलबर्टला उद्देशून म्हणाला.

''थाट न उडवायला काय झालं? आहेच असामी तशी! त्यांच्या इतका सधन मनुष्य उभ्या फ्रान्समध्ये नसेल!''

''असेल बुवा! पण असा हा बेहिशेबी खर्च करण्याइतका पैसा आणला कुठून त्यांनी?''

''मागे मी सरकारस्वारीला अर्धवट बोललोच आहे. हा पैसा अशाच बेहिशेबी मार्गांनी आला असला पाहिजे!''

''म्हणजे?'' राजा आश्चर्याने ओरडला.

''हा पैसा कदाचित् आपलाही असेल सरकार!''

''माझा! ते कसं काय बुवा?''

''सरकारी खजिन्यातील पैसा हा राजेसाहेबांचा पैसा असे मी मानतो!''

''कोलबर्ट, आपण आरोप करीत आहात फोकेंच्यावर! तुम्हाला सिद्ध करता आला नाही तर तुम्हाला जड जाईल ते!''

''मला वाटतं प्रत्येक फ्रँकचा हिशेब मी देऊ शकेन!''

''तुम्हाला काहीतरी निश्चित आरोप करावयाचा आहे, असंच ना?''

''होय सरकार!'

''मग बोला तर!''

''फोकेंनी सरकारी खजिन्यातून तीन कोटि फ्रँक्सची उचल केली आहे!''

''हे म्हणणं सोपं आहे, ते सिद्ध करावं लागेल!''

'हा पुरावा मी सरकारस्वारीच्या हाती देत आहे!'' असे म्हणून कोलबर्टने काही कागद राजाच्या हाती दिले. गुप्तपणे हा प्रकार पाहाणाऱ्या व ऐकणाऱ्या आरामीच्या अंगातून एक चमक निघून गेली व त्याचा चेहेरा घामाने डबडबला. राजाने त्या कागदावरून एकदा नजर फिरविली व म्हटले, ''हे अक्षर व सही माझारीनची दिसते!''

''सरकारांची स्मरणशक्ती मोठी तीव्र आहे! इतकं जुनं

हस्ताक्षर सरकारनी तत्काळ ओळखलं!'' कोलबर्ट अंतर्यामी खूश होऊन विनयाने म्हणाला.

नंतर राजाने ती पत्रे काळजीपूर्वक वाचली. मादाम शेव्हरूजच्या ताब्यात असलेली व कोलबर्टने तिच्याकडून विकत घेतलेली ती हीच पत्रे असल्याने, आरामीने त्यांचा मथितार्थ तत्काळ ओळखला.

''मोठा अजब प्रकार आहे! पण ही गोष्ट इतके दिवस उघडकीस कशी आली नाही?'' राजा म्हणाला.

''कोण आणणार? कागदपत्र बोलू शकत नाहीत! त्यांना बोलके करू शकणाऱ्या व्यक्तींना फोकेंना तोंड देण्याचं सामर्थ्य नसल्यानं गप्प बसणं भाग होतं!''

''तीन कोटि फ्रँक्स म्हणजे काही लहान सहान रक्कम नाही!''

''पत्रात रक्कम कुठं व कुणाकडे आहे याचा स्पष्ट उल्लेखच असल्यानं, फोकेंच्या वैभवाचं कोडं आता राजेसाहेबांना पडण्याचं कारण नाही!'' कोलबर्टने अंदाज पाहून चढाई चालू केली.

''याचा परिणाम काय होईल, माहीत आहे कोलबर्ट तुम्हाला?''

''नाही सरकार!''

''ही गोष्ट सिद्ध झाली, तिच्यावर खरेपणाचं शिक्कामोर्तब झालं...

''सिद्ध झालीच आहे सरकार! खजिन्यात ही रक्कम खर्च पडलेली आहे!''

''आपण सध्या फोकेंच्या प्रासादात आहोत, नाही?''

''हा प्रासाद सरकारी शिलकेतून तयार झाला असल्याने आपण आपल्याच प्रासादात आहात सरकार!''

''हा मजला असाच्या असाच कोलबर्टच्या बोडक्यावर कोसळून पडण्याची काही योजना नाही का मॉन्शर आरामी?'' राजपुत्र फिलिप आरामीच्या कानात कुजबुजला.

''तसं करता आलं असतं तर बरं झालं असतं, पण कोलबर्ट राजाच्या इतका जवळ उभा आहे की, त्यात राजाही गायब होण्याचा संभव जास्त! आपल्याला तर ते नको आहे!'' आरामी हलक्या आवाजात उत्तरला.

''खरं आहे. आपली योजना या मार्गाने साध्य होणार नाही!''

इतक्यात राजा कोलबर्टला म्हणाला. ''ठीक आहे मॉन्शर कोलबर्ट! आता बरीच रात्र झाली आहे. तुम्ही जा. उद्या सकाळपर्यंत मी या प्रकरणाचा विचार करून काय करायचं ते ठरवतो.''

''ठीक आहे सरकार!'' कोलबर्ट म्हणाला. इतक्या झटपट राजाने आपणास निरोप द्यावयास नको होता, असे त्यास वाटत असल्याचे स्पष्ट दिसून आले.

राजाने त्याला निरोप दिल्याची खूण करताच, अभिवादन करून कोलबर्ट बाहेर पडला व आरामी आणि फिलिपही आपली बैठकीची गुप्त जागा सोडून, आरामीच्या खोलीत येऊन दाखल झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी जाग येताच राजाने डॉर्टाला बोलावून घेतले. आरामी व फिलिप आपल्या गुप्त जागी येऊन राजाची हालचाल पाहात बसले होते. डॉर्टा येताच राजाने त्याला कोणालाही आत न येण्याची दक्षता घेण्यास सांगितले. डॉर्टाने पहारेवाल्याला तत्काळ तशा सूचना दिल्या व तो राजापुढे येऊन दाखल झाला.

''मॉन्शर डॉर्टा, सध्या इथं तुमच्याकडे किती लोक आहेत?''

''कशासाठी सरकार?''

''आपणाकडे किती माणसं आहेत असा प्रश्न आहे मॉन्शर डॉर्टा!'' पाय जमिनीवर आपटून राजा ओरडला.

''माझ्या ताब्यातील शिलेदारपथक हजर आहे!''

'आणखी त्याशिवाय?''

''वीस पहारेवाले व सुमारे तितकेच स्विस शिपाई!''

''किती शिपाई लागतील हे करायचं झाल्यास....?''

''काय करायचं झाल्यास?''

''मॉन्शर फोकेंची अटक!''

''मॉन्शर फोकेंची अटक!'' डॉर्टा आश्चर्याने ओरडला.

''ही गोष्ट अशक्य आहे असं तुम्हास सुचवायचं आहे काय?''

''डॉर्टाला कोणतीच गोष्ट अशक्य वाटत नाही, सरकार!'' डॉर्टा किंचित् अस्वस्थ होऊन म्हणाला.

''ठीक आहे, मग पार पाडा ही कामगिरी!''

डॉर्टा लष्करी थाटाची सलामी ठोकून बाहेर

पडण्यासाठी दहापाच पावले चालून गेला व मग एकदम वळून म्हणाला, ''मला तसा लेखी हुकूम मिळाल्यास बरं होईल सरकार!''

''का, राजाचा शब्द तुम्हाला अपुरा वाटतो?''

''नाही! पण संतापाच्या भरात गेलेला शब्द, विचारांती बदलला जाण्याची शक्यता असते!''

''मला वाटतं याहीपेक्षा काही निराळं कारण असावं, तुमची ही मागणी म्हणजे टाळाटाळी करण्याचा दुसरा मार्ग नव्हे ना?''

''नाही महाराज! पण सामान्यत: इतरांच्या डोक्यात न येणारे विचार माझ्या डोक्यात येतात ही गोष्ट खरी आहे!'' डॉर्टा उद्धटपणा पत्करूनही पुढे म्हणाला, ''ज्यांच्या घरी आपण पाहुणचार घेत आहात, त्यांनाच कैद करण्याचा हुकूम आपण भावनेच्या आहारी जाऊन देत आहात. पुढेमागे या निर्णयात काही चूक आढळल्यास यासारखी सरकारस्वारीची दुसरी बेअदबी नाही असं मला वाटतं!''

''भावनेच्या भरात! फ्रान्सच्या राजघराण्यात आजपर्यंत कोणी भावनेच्या आहारी गेले नाहीतच काय?''

''सरकार, मी आपल्या वडिलांची चाकरी केली आहे. तेही भावनाप्रधान होऊन काही गोष्टी करीत, पण त्या स्वत:च्या प्रासादात असताना! इतरत्र ते भावनेच्या आहारी जात नसत!''

''ठीक आहे, मग या गोष्टींची वाच्यता होऊ न देता त्यांना गुपचुप अटक करा!''

''ते तर अधिकच कठीण! नाही, अशक्यप्राय आहे सरकार!''

''का?''

मॉन्शर फोकेंच्या अवतीभोवती, सदैव हजारो रसिक पाहुण्यांचा गराडा असल्याने, ही अटक गुप्त राहणं कठीण आहे!''

''मी एखादी गोष्ट करायची म्हटल्यास, तिला विरोध करणाऱ्या लोकांनीच मी वेढला गेलो आहे हाच याचा अर्थ आहे मॉन्शर डॉर्टा?''

''मी ही गोष्ट हां, हां, म्हणता उरकीत आहे सरकार!'' असे म्हणून डॉर्टा फिरून बाहेर जाण्यासाठी वळला.

''मॉन्शर फोकेंच्यावर फक्त सक्त नजर ठेवा! पुढे काय करायचे ते मी उद्या सकाळी सांगेन!'' राजा किंचित् नमते घेऊन म्हणाला.

●●●

## ८. आरामीची करामत

फ्रान्सचा राजा कसल्या तरी शीत स्पर्शाने व हालचालीने जागा झाला, आणि त्याने इकडे तिकडे पाहिले. मध्यरात्रीचा सुमार असावा. त्याच्या दोन बाजूस दोन व्यक्ती उभ्या होत्या, पण त्यांनी आपले सर्वांग बुरख्यांनी आच्छादून घेतले होते. राजाला वाटले आपण स्वप्नातच आहोत; पण पायाखालची दमट जमीन व आजूबाजूचा गारवा यांची जाणीव होताच त्याचा हा भ्रम दूर झाला. ''ही काय भानगड आहे? तुम्ही कोण आहात? बस्स झाली ही थट्टा!'' तो त्या व्यक्तींना उद्देशून जोराने म्हणाला.

''ही थट्टा नाही!'' हातात कंदील घेऊन उभी असलेली बुरखेवाली व्यक्ती खोल आवाजात म्हणाली. या घटनेने आश्चर्यचकित झालेला राजा ओरडला, ''मॉन्शर फोकेंचे लोक आहात काय तुम्ही?''

''आम्ही कोणाचे लोक आहोत हा मुद्दा मुळीच महत्वाचा नाही! आम्ही आता तुमचे धनी आहोत एवढी गोष्ट खरी!'' त्या दोघांतील धिप्पाड व राक्षसी व्यक्ती म्हणाली.

''थट्टेचा हा अतिरेक झाला! मॉन्शर फोकेंना म्हणावं, मी असली थट्टा कधीच सहन करणार नाही!'' राजा दाणकन् जमिनीवर पाय आपटून जोराने ओरडला.

''असल्या दमदाटीचा काही एक उपयोग नाही महाशय! आपण कुठं आहात माहीत आहे?'' हातातील

कंदील उंच करून ती कंदीलवाली व्यक्ती म्हणाली. कंदिलाच्या अंधुक प्रकाशात राजाला कळून आले की, आपण कोणत्या तरी अंधेऱ्या भुयारातील मार्गांत उभे आहोत. भुयार दमट असून भिंतीवरून गोगलगाय सरपटल्याचे पांढरे पट्टे उठलेले दिसत होते. जमिनीखालून जाणारा हा एखादा गुप्त मार्ग आहे व त्यामध्ये आपण उभे आहोत याची जाणीव राजाला होताच तो भीतीने गळाठल्यागत झाला. तो अजीजीने म्हणाला, ''तुम्हाला काय हवं आहे ते तरी मला सांगा!''

''समजेल आपोआप!'' कंदिलवाला बेदरकारपणे म्हणाला, ''चला आमच्या मागोमाग!'' त्याने फर्मावले व तो पुढे चालू लागला!

''मी इथून एक इंचभरही हलणार नाही!'' राजा उसने अवसान आणून म्हणाला.

''आपण जर असा हट्ट करणार असाल, तर मला आपली गठडी बांधून आपल्याला न्यावं लागेल!'' असे म्हणून दुसऱ्या धटिंगण व्यक्तीने बुरख्याखालून आपला हात बाहेर काढला. त्या हाताचा तो जबरदस्त आकार पाहाताच राजाची बोबडीच वळली. ज्यांच्या तावडीत आपण आहोत, त्या व्यक्ती वेळप्रसंगी आपल्या अंगावर हात टाकण्यास मागेपुढे पाहाणार नाहीत याची खात्री पटल्याने राजा मुकाट्याने त्या कंदिलवाल्याच्या मागोमाग चालू लागला व दुसरा धटिंगण त्याच्या पाठोपाठ येऊ लागला.

थोडा वेळ अनेक वेडीवाकडी वळणे घेतल्यानंतर त्या तीनही व्यक्ती मोकळ्या जागेत येऊन पोहोचल्या. गार वारा, झाडांची सळसळ व फुलांचा मंद वास, यामुळे आपण कोठेतरी जंगलात येऊन पोहोचलो आहोत एवढा अंदाज राजाला आला. ''फ्रान्सच्या राजाशी आपण कोणता खेळ खेळत आहात याची जाणीव आहे तुम्हाला?'' राजाने धीटपणा करून विचारले, ''आपण आता आपलं राजेपण विसरावं!'' कंदीलवाली व्यक्ती म्हणाली. त्याच्या पाठोपाठ असणारा तो राक्षस म्हणाला, ''स्वत:ला हे विशेषण लावून घेतल्याबद्दल गाडीच्या चाकाला बांधून तुम्हाला रगडलं पाहिजे!'' या धमकीने राजा चांगलाच चरकला व चुळबुळ करू लागला. पण त्या राक्षसी व्यक्तीने आपला पोलादी हात त्याच्या खांद्यावर ठेवताच, त्याच्या हातापायाला चांगल्याच मुंग्या आल्याप्रमाणे झाले.

त्यांनी राजाला झाडीत दडवून ठेविलेल्या एका गाडीपाशी आणले. राजाला गाडीत डांबून दारांना कुलपे ठोकण्यात आली. एकजण पाठीमागे बसला व दुसऱ्या धटिंगणाने गाडीला घोडे जुंपून स्वत:च गाडी भरधाव हाकण्यास सुरुवात केली.

गाडी बॅस्टाइल तुरुंगाच्या प्रवेशद्वारापाशी आली, तेव्हा घोडे घामाने निथळत होते व त्यांच्या तोंडातून फेसाचे पुंजके येत होते. दारावरील पहारेवाल्याला, गाडी हाकणाऱ्या त्या राक्षसाने खडसावले, ''जा! तुरुंगाधिकारी बीमाँ यांना आत्ताच्या आता घेऊन ये!'' पाच-दहा मिनिटांत बीमाँ तेथे येऊन दाखल झाला.

'काय भानगड आहे?'' बीमाँने विचारले. मागे बसलेली व्यक्ती पुढे आली व ती गाडी हाकणाऱ्या राक्षसाच्या कानात काहीतरी पुटपुटली. तत्काळ तो राक्षस खाली आला व त्याने आपल्या बुरख्याखालून एक बंदूक बाहेर काढली व गाडीचे दार उघडून राजाच्या छातीला भिडविली.

''कैद्यानं आवाज काढताच झाड गोळी!'' ती दुसरी व्यक्ती मोठ्याने म्हणाली.

''जरूर!'' तो राक्षस शक्यतो हलक्या आवाजात म्हणाला.

''कोण आरामी?'' बीमाँ आरामीला ओळखून म्हणाला.

''चुप! तुमच्या कचेरीत चला जरा!''

''पण तुम्ही अशा मध्यरात्री इकडे कुणीकडे आणि ही काय भानगड आणली आहे?''

''भयंकर चूक झाली! त्या दिवशी तुमचंच म्हणणं खरं होतं!'' आरामी हळूच म्हणाला.

''कशासंबंधी?''

''त्या सुटकेच्या हुकुमासंबंधी!''

''म्हणजे?''

''तो हुकूम सेल्डनच्याच सुटकेचा होता, पण मला वाटलं त्यात मार्चेलीचं नाव होतं!''

''तुमच्या म्हणण्याचा अर्थच मला समजला नाही,

आरामी!''

''अगदी सोपा आहे! मार्चेलीला मी परत आणला आहे. त्याला पहिल्याप्रमाणे त्याच्या कोठडीत डांबा, व सेल्डनला माझ्या स्वाधीन करा!''

''पण त्या हुकुमात तर मार्चेलीचंच नाव होतं!''

''हा पाहा हुकूम! त्यात सेल्डनचं नाव आहे! तो हुकूम कदाचित् बनावट असेल!'' आरामी कठोर आवाजात म्हणाला.

''या खेपेस तरी काही चूक नाही ना?''

''नाही! खास राजेसाहेबांच्या सहीचा हा हुकूम आहे!''

''माझा घात होणार एक दिवस!'' कपाळावरून निथळणारा घाम निपटीत बीमाँ विवळला.

''चला! आटपा!! वेळ होत आहे! आणि हे पाहा मार्चेलीला आपण राजे आहोत असा भ्रम झाला आहे. बरेच दिवस एकांतवासात काढावे लागल्याचा हा परिणाम आहे. सर्व पहारेवाल्यांना ताकीद देऊन त्याला या वेडाची लहर आल्यास ती उतरविण्याची खटपट करण्यास सांगा!''

''अच्छा!''

थोड्याच वेळात फ्रान्सचा राजा चौदावा लुई, मार्चेली ऊर्फ राजपुत्र फिलिप याच्या खोलीत डांबण्यात आला. दार बंद होताच कैद्याने केलेला आरडाओरडा व कोठडीच्या भक्कम दरवाज्यावर घेतलेल्या धडका ऐकून त्याला वेड लागल्याची बीमाँची खात्रीच झाली; व त्याबाबत पहारेकऱ्याला त्याने योग्य त्या सूचना दिल्या.

पण एकंदरीत काहीतरी भयंकर उलथापालथ चालू आहे, व तीमध्ये आपण निष्कारण गोवले जात आहोत याची जाणीव मात्र तीव्रतेने झाली त्याला! आरामी थोड्याच वेळात सेल्डनला घेऊन बाहेर पडला. पॅरिसच्या रस्त्यात त्याला सोडून त्याने गाडी वॉक्सच्या दिशेने भरधाव काढली.

■ ■ ■

चौदाव्या लुईच्या शय्येवर तळमळत पडलेला फिलिप एवढ्या तेवढ्या आवाजानेही खडबडून उठे! आपल्या आईने राजकारणी मुत्सद्यांच्या हातातील बाहुलं बनून आपल्याला अत्यंत क्रूर वागणूक दिली, पण त्यात आपल्या भावाचा काडीमात्र दोष नाही; असाही एक विचार त्याच्या मनात आला. आपण राजवैभव कधीच उपभोगले नसल्याने, कैदखान्याची हवा आपणास जाणवली नाही, पण राजपदाचा उपभोग घेतलेल्या आपल्या भावाची बॅस्टाइलमध्ये किती केविलवाणी अवस्था होईल या कल्पनेने त्याचे अंत:करण कळवळले. त्याची अशी तळमळ चालू असताना पहाटेच्या सुमाराला चोरदरवाजा उघडून आरामी आत आला.

''कोण आरामी?'' राजपुत्राने विचारले.

''होय महाराज! सर्व ठीक झालं.''

''त्याने काही गडबड केली नाही?''

''पुष्कळ! पण तिचा उपयोग काय? दमदाटी, आदळआपट, आरडाओरड हे सर्व उपाय त्याने करून पाहिले!''

''शेवटी काय झालं?''

''आपला विजय! बॅस्टाइलमधील आपली जागा घेतली आहे त्यानं! आपणा उभयतांमध्ये असलेल्या विलक्षण साम्यामुळे तिथं कुणालाच काही शंका आली नाही!''

''पार्था कुठं आहेत?''

''ते झोपले आहेत माझ्या खोलीत!''

''त्यांची वाट काय? त्यांना हे रहस्य ठाऊक आहे ना?''

''त्यांना आपण ड्यूकचा किताब द्यावा!''

''पण त्यांच्याकडून गुप्तता राहील ना?''

''आपण ड्यूकचा किताब देताच तो त्या आनंदानेच मरून जाईल! त्याची काळजी नको आपणास! मी मात्र एका सन्मित्राला मुकेन एवढंच वाईट वाटतं!'' राजपुत्र फिलिप व आरामी आता मोठ्या खुशीत होते. त्यांनी आखल्याप्रमाणे सर्व योजना सुरळीत पार पडली होती. इतक्यात आरामीला काहीतरी आठवण झाली. तो हलक्या आवाजात राजाला म्हणाला, ''आज सकाळी काय घडणार आहे? किंवा रात्री झोपी जाताना तुम्ही कुणाला काय सांगितलं आहे याची आठवण आहे ना तुम्हाला?''

''होय! मी डॉर्टाना बोलावलं आहे व ते उजाडताच माझ्या भेटीला येतील!''

''तो फार वक्तशीर माणूस आहे! नेमक्या वेळी तो हजर झाल्याशिवाय राहाणार नाही!'' इतक्यात बाहेर कुणाची तरी पावले ऐकू आली.

''हा आलाच वाटतं!'' आरामी पुटपुटला.

''मग आपल्याला तयार राहिलंच पाहिजे!'' फिलिप कावराबावरा होऊन म्हणाला. इतक्यात दारावर थाप पडली. तत्काळ आरामीने दार उघडून डॉर्टाचे स्वागत केले. ''नमस्ते मॉन्शर डॉर्टा!'' तो म्हणाला.

''कोण, आरामी, आणि तू इथं?''

''राजेसाहेबांचा तुला निरोप आहे! आणखी थोडा वेळ डुलकी घेण्याची त्यांना लहर आली आहे आज! काल रात्री बराच वेळ जागरण झालेलं दिसतं त्यांना!''

''अस्सं!'' आरामीच्या भाषणाबद्दल संपूर्ण अविश्वास दाखविणारा आवाज काढून डॉर्टा उद्‌गारला. राजाच्या हारीमोरीही उभ्या न राहाणाऱ्या आरामीचे दैव एका रात्रीत उघडावे व त्याने राजाशी एवढे सूत जमवावे ही घटनाच त्याला मोठी चमत्कारिक वाटली. रीशल्यू, माझारीन यांच्यावरही आपल्या दोस्ताने कडी केल्याचे पाहून डॉर्टाला विस्मयाचा झटकाच बसला.

''आणि हे पाहा, आज राजेसाहेबांच्या खास परवानगीशिवाय इतर कोणाही फालतू माणसाला आत भेटीसाठी सोडू नका! आज राजेसाहेबांना थोडी विश्रांतीची आवश्यकता आहे.'' आरामीच्या या टुरटुरण्याला आपण कवडीचीही किंमत देण्यास तयार नाही हे दर्शविण्यासाठी डॉर्टा बेदरकारपणाने म्हणाला, ''पण पाद्रीसाहेब, मला राजेसाहेबांनी भेटण्यासाठी आधीच हुकूम दिला आहे त्याची वाट काय?''

''नंतर! नंतर!! आताच घाई नाही!!'' बिछान्यावर पडून असलेला राजा, आजारी असल्याप्रमाणे खोल आवाजात म्हणाला. राजाचा आवाज ऐकताच डॉर्टा चांगलाच चमकला. तरी पण त्याने उभा असलेल्या जागेवरूनच राजाला अभिवादन केले व परत फिरण्याची तयारी केली; इतक्यात आरामीने त्याला थोपवून म्हटले, ''हा हुकूम घेऊन त्याप्रमाणे व्यवस्था करा मॉन्शर डॉर्टा!'' आरामीने पुढे केलेला कागद डॉर्टाने हाती घेतला, व उलगडून वाचला.

''मॉन्शर फोकेंच्यावर नजर ठेवण्याची आवश्यकता नाही, त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य आहे!'' ''आऽ हा!'' डॉर्टा उद्‌गारला. फोकेंच्यासाठी रदबदली करण्यासाठी आरामी राजाला भेटला असावा, व त्याने राजावर वजन मारून आपले आसन राज-सान्निध्यात स्थिर करून घेतले असावे, असा अंदाज डॉर्टाने बांधला व तो बाहेर जाण्याच्या तयारीने निघाला.

''थांबा डॉर्टा, मी तुमच्याबरोबर बाहेर येणार आहे.'' आरामी त्याला म्हणाला. ''कुठे?'' डॉर्टाने विचारले.

''मॉन्शर फोकेंना भेटण्यास!''

''ठीक! ठीक!!'' डॉर्टा म्हणाला, ''मी आपणास मार्ग दाखविण्यास येत आहे!''

डॉर्टा व आरामी एकदम येताच मॉन्शर फोकेंना जरा आश्चर्य वाटले व त्यांनी उभयतांचे स्वागत केले. ''काल मी आपणास राजेसाहेबांची आपणावर गैरमर्जी झाली असून, आपणावर नजर ठेवण्याचा मला हुकूम आहे असं बोललो होतो, नाही?'' डॉर्टा फोकेंना म्हणाला.

''पण रात्री तुम्हाला वचन दिल्याप्रमाणे मी घर सोडून कुठं बाहेर गेलोच नाही!'' फोके म्हणाले.

''आज तुमचे ग्रह बदलले! तुम्ही संपूर्ण स्वतंत्र आहात आता! आपले व माझे स्नेही मॉन्शर आरामी यांनी आपणासाठी नवा हुकूम पैदा केला आहे!''

फोके आश्चर्याने थक्क झाले. आरामीचे राजेसाहेबांपाशी एवढे वजन आहे याची त्यांनाही कल्पना नव्हती.

''पण काय रे आरामी, तू ही हिकमत केलीस तरी कशी?'' डॉर्टाने विचारले.

''त्यात काय विशेष? समारंभाने राजेसाहेबांची तबियत जरा खूश आहे एवढा अंदाज मला येताच मी त्यांना सरळ सरळ जाऊन भेटलो, व फोकेंच्याबद्दल त्यांचा काहीतरी गैरसमज झाला असल्याचं त्यांना पटवून दिले!''

''पण फोकेंच्याबद्दल राजेसाहेबांचा काहीतरी गैरसमज झाला आहे हेच मुळी तुला कळलं कसं?'' डॉर्टा आपली नजर त्याच्यावर रोखून म्हणाला. या अनपेक्षित प्रश्नाने आरामी चांगलाच गडबडला व तो आवंढे गिळू लागला. ''मॉन्शर फोके माझे जिवलग स्नेही आहेत हे मी सांगावयास पाहिजे असं नाही. त्यांच्याबद्दल मला काहीही अज्ञात

राहू शकत नाही!'' तो कसेबसे बळ आणून म्हणाला. त्याची ही तारांबळ डॉर्टाच्या नजरेतून सुटू शकली नाही. डॉर्टाने फोकेंच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले, कारण ही गोष्ट गुप्त ठेवण्याचे अभिवचन त्यांनी डॉर्टाला दिले होते; आणि असे असता आरामीला ते सर्व हकीकत सांगतील हे त्याला पटेना. फोकेंचा चेहेरा निर्विकार होता. संशयग्रस्त स्थितीत डॉर्टा त्या उभयतांचा निरोप घेऊन बाहेर पडला.

डॉर्टा बाहेर जाताच, आश्चर्याने वेड लागण्याची पाळी आलेल्या फोकेंनी आरामीला विचारले, ''आरामी, ही काय भानगड आहे? खरं काय असेल ते सर्व सांगा!''

''राजाने तुम्हाला नजरकैद का केली होती माहीत आहे तुम्हाला?''

''नाही! डॉर्टानी मला सांगितल्यापासून मी त्याचाच विचार करीत आहे! बेल बेटावर मी केलेल्या डागडुजीचा व उभारलेल्या शिबंदीचा राजेसाहेबांनी भलताच अर्थ केला असावा अशी एक शंका आली.''

''छेऽ मुळीच नाही! कोलबर्ट त्यांच्या कानाला लागला! माझारीनच्या पत्राचं भांडवल केलं त्याने!''

''हाय रे दैवा!'' फोके खिन्नपणाने उद्‌गारले.

''राजेसाहेबांच्या दृष्टीने तुम्ही सरकारी पैशांची अफरातफर केली आहे.

''मग कठीण आहे!''

''आहे नाही, होतं!'' आरामी मंद स्मित करीत म्हणाला.

''मग आता हा बदल कसा झाला? आणि तुम्ही तो कसा घडवून आणला?'''

''राजाच्या जन्माची स्मृती तुम्हाला आहे?''

''संपूर्ण! कालचीच गोष्ट असल्याप्रमाणं!''

''त्यासंबंधी तुम्ही, कधी कधी काही विशेष ऐकलं आहे!''

''तेराव्या लुईचा हा मुलगा नाही, एवढी एक बाजारगप्प!''

''त्याला फारसं महत्व नाही!, दुसरं काही विशेष?''

''काहीच नाही!''

''मग इथून माझ्या रहस्याला सुरुवात होते! ॲनला एकाच वेळी दोन मुलगे झाले. चौदाव्या लुईला दुसरा एक जुळा भाऊ आहे!''

''पण तो दुसरा वारला!''

''तो वारला तर नाहीच, पण त्याने आज लुईची - आपल्या भावाची जागा घेतली आहे! तुमचं मंत्रीपद आता बिनधोक झालं असून कोलबर्टला काय शिक्षा करायची हे आता तुम्ही ठरवायचं आहे.'' आरामी प्रौढीने छाती फुगवून म्हणाला.

फोकेंना जबरदस्त धक्काच बसला. त्यांनी आपले मस्तक दोनही हातांनी गच्च दाबून धरले. आपल्या भोवतालचे सर्व जग आपणाभोवती गरगर फिरत आहे असे त्यांना वाटू लागले. त्यांच्या तोंडातून धड शब्दही बाहेर पडेना. ''कारस्थान! राजाविरुद्ध कारस्थान!'' ते कसेबसे ओरडले. आरामी आपले हास्य कायम ठेवून बेडरपणे म्हणाला.

''राजा चौदावा लुई आता पदच्युत झाला आहे! आणि त्याची जागा आता राजपुत्र फिलिपने घेतली आहे! या नव्या चौदाव्या लुईविरुद्ध आपण कारस्थान केलेलं नाही, मॉन्शर फोके!

''माझ्या घरात बसून माझ्या पाहुण्याविरुद्ध तुम्ही कारवाया केल्या, मॉन्शर आरामी?'' रागाने थरथर कापत फोके किंचाळले.

''म्हणजे आपल्या बोलण्याचा अर्थ काय?''

''याचा अर्थ काय?'' कपाळावरून निथळणारा घाम पुशीत फोके पुटपुटले, ''तुम्ही राजाला पदच्युत केलं? कैदेत टाकलं?''

''होय! ही गोष्ट होऊन गेली आहे!''

''आणि ती इथं माझ्या घरात घडली?''

''होय!''

''तुमचा हा गुन्हा मी चालू देणार नाही!''

''गुन्हा?''

''हो! हो!! गुन्हा, राजद्रोहाचा गुन्हा!!! आरामी, मी ही गोष्ट होऊ देणार नाही! राजाच्या हाती लागलात तर फाशी जाल म्हणून मी तुम्हाला सवड देतो. जा! काळं करा इथून! कुठं तरी दूरदेशी निघून जा!''

''आपण जरा हळू बोललात तर ठीक होईल! नाहीतर ऐकेल कुणीतरी.''

''मी साऱ्या जगाला हे सांगणारच आहे! ओरडून सांगणार आहे. मला त्याची पर्वा नाही! तुम्हाला चार तासांचा अवधी देत आहे, तेवढ्या वेळात तुम्ही स्पेनची सरहद्द गाठा! नाहीतर तुम्ही आणि तुमचं नशीब!''

एवढे बोलून फोके उठले. काळठिक्कर पडलेला आरामी, खाली मान घालून तेथून लगबगीने बाहेर पडला. फोकेंच्या वागण्याने त्याच्या कारस्थानाचा, व त्याच्या महत्वाकांक्षेचा चक्काचूर झाला होता.

''आपल्या या वागण्याने आपणही संकटात येणार आहात!'' जाता जाता त्याने फोकेंना इशारा देण्याचा प्रयत्न करून पाहिला.

''काही झालं तरी, माझ्याकडे पाहुणा म्हणून आलेल्या राजावर मी अन्याय होऊ देणार नाही!'' फोके निश्चयाने गरजले. कोणाच्या दृष्टीस पडू नये अशा बेताने आरामी पसार झाला, व आपल्या खोलीत आला. पार्थो तेथे घोरत पडला होता. कापऱ्या हाताने त्याने पार्थोला जागे केले ''पार्थो ऊठ! आपल्याला जायचं आहे!'' आरामी त्याला गडबडीने म्हणाला, ''आऽ!'' करून पार्थोने एक भली मोठी जांभई दिली; व विचारले, ''कुठं?''

''आपल्याला अत्यंत तातडीने एका महत्वाच्या कामासाठी जावयाचं आहे!'' असे म्हणून आरामीने पार्थोला कपडे चढविण्यास मदत करण्यास सुरुवात केली.

''काय रे, काय घाई चालली आहे?'' अर्धवट उघड्या असलेल्या दारातून डोकावीत डॉर्टाने विचारले.

''तुला मॉ.फोके भेटले?'' आरामीने विचारले.

''हो! तेही आताच गडबडीने बाहेर पडले गाडीत बसून!''

''डॉर्टा, आम्हीही एका महत्वाच्या कामगिरीवर जात आहोत!'' आरामी चेहेरा शक्य तो निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न करीत म्हणाला.

''चल, पार्थो जल्दी कर!'' तो पार्थोला म्हणाला. त्यांची ही धांदल पाहात डॉर्टा मुकाट्याने उभा होता. थोड्याच वेळात पार्थो-आरामीचे घोडे वॉक्समधून तुफान वेगाने बाहेर पडले.

या सर्व गूढ प्रकाराने गोंधळलेल्या डॉर्टाने त्यांना हात हालवून निरोप देता देता दीर्घ सुस्कारा सोडला.

●●●

## ९. राजाची सुटका! व फिलिपचे दुर्दैव

सुसाट रस्ता कापीत मॉन्शर फोकेची गाडी पॅरिसच्या दिशेने धावत होती. बॅस्टाइलचा तुरुंगाधिकारी मॉन्शर बीमाँ याच्या निवासस्थानी गाडी येऊन उभी राहाताच घोड्यांनी धरणीवर अंग टाकले. पटकन् गाडीतून उडी टाकून, फोके धावतच मॉ.बीमाँपुढे जाऊन उभे राहिले. मुख्यमंत्री फोके यांना पाहाताच बीमाँची बोबडी वळून तो त् त् प् प् करू लागला. ''मला आताच्या आता एका कैद्याला भेटायचं आहे!'' फोके बीमाँच्या अंगावर ओरडले. ''कोणता कैदी?'' त्याने चाचरत विचारले.

''काल रात्री आरामींनी तुमच्या ताब्यात दिलेला!''

''राजाच्या हुकुमाने तो कैदी माझ्या ताब्यात आला आहे साहेब! आणि सध्या तो वेडाच्या लहरीत दंगामस्ती करीत आहे.''

''मला त्यालाच भेटायचं आहे!''

''राजाचा हुकूम पाहिजे!'' संशयाने भीतीग्रस्त झालेला बीमाँ धीर करून म्हणाला.

''बीमाँ, तुम्ही मुख्यमंत्र्यापुढे बोलत आहात!''

''होय साहेब! पण कर्तव्य म्हणून...''

''मला कर्तव्याचे धडे देता! दहा मिनिटात मला कैदी भेटला नाही तर सैन्याला हुकूम देऊन हा तुरुंग जमीनदोस्त करीन! तुम्हाला फासावर चढवीन!!'' फोके गरजले.

''पण महाराज...!''

''ठीक आहे!'' फोके उद्गारले व खसकन् एक कागद ओढून त्यांनी लिहिण्यास सुरुवात केली. ''प्रिन्स द् कान्द यांना राजकार्यासाठी हुकूम देण्यात येत आहे की, आपल्या सर्व शिबंदीनिशी बॅस्टाइलवर हल्ला चढवून.....''

''थांबा! थांबा, साहेब!'' बीमाँ गर्भगळित होऊन थरथर कापत म्हणाला, '' मी आपणास कैद्याकडे घेऊन जात आहे.''

थोड्याच वेळात कैद्याच्या कोठडीचे कुलूप उघडले गेले. फोकेंनी बीमाँला दूर जाण्यास फर्मावले व दार उघडून कोठडीत प्रवेश केला.

''माझा खून करण्यासाठी तुम्ही इथं आला आहात?'' फोकेंना ओळखून त्यांच्या अंगावर धावून जात, चवताळलेला राजा चौदावा लुई ओरडला. राजाचे कपडे फाटले होते, केस पिंजारले गेले होते. हातापायातून रक्त निघाले होते. संतापाच्या भरात केलेल्या आदळआपटीने व उपासमारीने, पोरांनी झोडपलेल्या बेकार कुत्र्याप्रमाणे त्याची एकंदर अवस्था दिसत होती.

राजाची ही स्थिती पाहून फोकेंना भडभडून आले; त्याच्यापुढे गुडघे टेकून ते नम्रपणाने म्हणाले, ''महाराजांचा विश्वासू सेवक आपल्या सेवेला हजर आहे!''

''विश्वासू सेवक!'' राजा करकर दात खाऊन ओरडला.

''होय महाराज!'' फोके कळवळून म्हणाले व त्यांनी राजाला आपल्याजवळ घेऊन कुरवाळले. त्यांचे हे वागणे पाहून राजा थोडाफार थंड झाला व म्हणाला, ''तुमच्या वॉक्स येथील घराला गराडा ठोकून प्रत्येक कटवाल्याला खेचून ठेवणार मी!''

''त्याची आवश्यकता उरली नाही. सरकार, मी सर्व बंदोबस्त केला आहे!'' फोके म्हणाले, ''हे एका व्यक्तीचंच काम आहे आणि ते तिनं गुपचुपपणाने उरकलं आहे! बाह्य जगाला याची काहीएक कल्पना नाही! आपण ताबडतोब वॉक्सला जाण्यास निघू!''

''कोण ही व्यक्ती?''

''आरामी! व्हॅनेचा बिशप!''

''तुमचा मित्र!''

''होय सरकार!''

''हे तुमचं दुर्दैव आहे! मी त्याची गय करणार नाही!''

''माझी तशी अपेक्षाही नाही! माझ्यावरील प्रेमाने त्यानं राजद्रोहापर्यंत मजल नेली असली तरीही मला माझं कर्तव्य केलंच पाहिजे आणि म्हणूनच मी इथंपर्यंत आलो आहे! या कारस्थानाचा मला काहीच सुगावा नसल्याने मला त्याला वेळेवर प्रतिबंध करता आला नाही! मित्र म्हणून मला त्याच्याबद्दल अगत्य असले, तरी मंत्री म्हणून मला माझं कर्तव्य केलंच पाहिजे!'' फोके निर्भीडपणाने म्हणाले.

''त्यांच्याबरोबर एक राक्षस होता!''

''मॉन्शर पार्था!''

''तेही सामील होते यात?''

''ते आरामीचे स्नेही म्हणून, त्याच्या सांगण्याप्रमाणे ऐकतात; पण त्यांना आपण काय करीत आहोत याची कल्पना असेलसं वाटत नाही!''

मग अधिक प्रश्नोत्तरे करीत न बसता ते दोघेही बाहेर पडले. दिवसाच्या प्रकाशात कैद्याला पाहून बीमाँ चांगलाच चरकला. फोकेंने नवी गाडी आणवून, वॉक्सच्या दिशेने कूच केली. आरामीने काहीतरी उलाढाल केली आहे, एवढी शंका बीमाँना आली. मुख्यमंत्री फोकेंनी ही काय गडबड चालविली आहे, याची कल्पना मात्र त्याला काहीच आली नाही! बीमाँच्या दृष्टीने फोकेंनी मार्चेलीला कुठे तरी नेले एवढे खरे! फोकेंची गाडी वॉक्सच्या दिशेने भरधाव निघाली.

आपली संपूर्ण मुक्तता झाली आहे याची खात्री पटताच राजा म्हणाला, ''आरामीला आणि त्याच्या त्या तोतया राजाला मी जाहीरपणे फासावर लटकवणार!''

''तोतया राजा, आपला भाऊ राजकुमार फिलिप आहे सरकार! त्याला काही करण्यापूर्वी आपण राजमाता ॲन यांची सल्लामसलत जरूर घ्यावी!''

फोकेंच्या शब्दांनी राजा कमालीचा दचकला.

''राजमाताच या सर्व रहस्याचा उलगडा करू शकतील!'' फोके म्हणाले, ''पण मला मात्र आरामी व पार्था यांच्यासाठी गळ घालायची आहे!''

''फोके, माझ्या जिवावर उठलेल्या लोकांना तुम्ही वाचवू पाहाता?''

''ते जिवावर उठले असते तर सरकारना बॅस्टाइलमध्ये न नेता वाटेतच मारून टाकलं असतं त्यांनी!'' फोकेंच्या त्या शब्दांनी राजा पांढराफट् पडला व निर्जीव झाल्याप्रमाणे

गाडीच्या मागील बाजूस टेकला.

■ ■ ■

बाहेरच्या जगात काय उलथापालथी घडून आल्या आहेत याची काहीच कल्पना नसल्याने फिलिप तोतया चौदावा लुई, आरामीची अत्यंत उत्सुकतेने वाट पाहात बसला होता. राजवेशात त्याला सजवून आरामी जो एकदा बाहेर सटकला तो फिरून परत आलाच नाही, व त्यामुळे फिलिपचा जीव कासावीस झाला. एवढ्या वेळात भेटावयास कोणी आले तर काय करावे या विचारानेच त्याला घाम फुटला; आणि दुर्दैव त्याचे! राजमाता ॲनच त्याला भेटण्यासाठी आली! तिला कोणी प्रतिबंध करणेच शक्य नसल्याने ती सरळ राजापुढे येऊन खुर्चीवर बसली!

''मुला, आज तुझी प्रकृती ठीक नाही काय?'' तिने विचारले.

''फोकेंची काय भानगड झाली आहे, तीमुळे तर तू चिंतेत नाहीस ना?''

''कसली भानगड?'' राजाने विचारले. राजाचा आवाज ऐकून ॲनही चांगलीच दचकली. राजाच्या अस्वस्थपणाचाही कदाचित् हा परिणाम असेल असे तिला वाटले.

''मॉन्शर कोलबर्ट व मादाम शेव्हरूज यांनी काही गोष्टी माझ्या कानावर घातल्या आहेत व त्या तुझ्याही कानी आल्या आहेत असं मला समजलं!''

''ती दोघंही हरामखोर आहेत!'' फिलिप भान न राहून ओरडला. पण लगेच भानावर येऊन तो हलक्या आवाजात म्हणाला, ''कोलबर्टप्रमाणेच आईसाहेबांचंही मत आहे काय?''

''कशावरून राजाला असं वाटतं?''

''शेव्हरूज आपल्या दिमतीला आहे असं समजलं. तिचा जन्मच गेला आहे कोणा ना कोणाविरुद्ध कारस्थानं करण्यात!''

ॲनला फिरून एक जबरदस्त धक्का बसला. आपला मुलगा इतके तोंड टाकून बोलू शकतो, याचा प्रत्यय आज तिला प्रथमच येत होता.

''पित्याचा पूर्वग्रह मुलाने पुढे चालविला आहे काय?''

''होय! कोलबर्टप्रमाणेच फोकेंच्याकडूनही पैसे काढण्याचा तिचा विचार होता! आहे! एकाला माझारीनची पत्रे विकून तिने पैसे घेतले, दुसऱ्याला चोरलेली पावती विकण्याचा तिचा विचार असावा. या थेरडीला फ्रान्सचा खजिनासुद्धा लुटण्यास शरम वाटणार नाही.'' फिरून खवळलेल्या फिलिपने तोंड टाकले. फिलिपच्या या दणक्याने ॲन पुरेपूर घाबरी झाली.

''महाराज! आपण आपल्या आईला फार कठोर वागणूक देत आहात!''

''यात तुमचा काय संबंध आईसाहेब? मी शेव्हरूजला उद्देशून बोलत आहे!''

''मी रजा घेते!''

''ठीक आहे! आपण मात्र तिला काही पैसे देऊ नका हं!'' फिलिप चेकाळला. ॲनला फिरून एक धक्का बसला. राजाने एवढ्यात आरामीला एक-दोन हाका मारल्या; त्या ऐकून मॉन्शर डॉर्टा आत आला.

''आरामी! कोण हे आरामी?'' ॲनने थबकून विचारले. डॉर्टा आपला संवाद ऐकत आहे याचेही भान त्या दोघांना नव्हते. ''माझे शिलेदार?''

''होय आईसाहेब! ज्यांनी तुमची एक महत्वाची कामगिरी पार पाडली आहे तेच हे आरामी?'' राजाने फिरून एक आघात केला. या फटकाऱ्याने ॲन जमीनदोस्तच व्हावयाची, पण पुढे होऊन धडपडणाऱ्या ॲनला डॉर्टाने सावरले. एवढ्यात काही गडबड धांदल ऐकू आली. ''काय गडबड आहे?'' फिलिपने विचारले व दाराकडे पाहिले. ''इकडून सरकार! इकडून सरकार!!'' असे म्हणत मॉन्शर फोके राजाला मार्ग दाखवीत चौदाव्या लुईला घेऊन तेथे आले. लुई दृष्टीला पडताच, एखादे पिशाच्च पाहावे त्याप्रमाणे ॲनने एक किंचाळी फोडली व ती मटकन् खाली बसली. लुईला पाहाताच फिलिपचा चेहरा पांढरा फटफटीत पडला व त्याच्या सर्वांगाला थरारून कंप सुटला. फिलिपला पाहाताच लुईची पण तीच अवस्था झाली. इतर सर्व लोक त्या उभयतांतील विलक्षण साम्य पाहून चांगलेच बुचकळ्यात पडले व अलटून पालटून त्या दोघांकडे पाहू लागले. इतक्यात लुई ओरडला, ''मॉन्शर डॉर्टा! आमच्या दोघांपैकी खरा राजा कोण ते तुम्हीच सांगा!'' व एवढेच बोलून तो शेजारच्या खोलीत निघून

गेला. या आकस्मिक सवालाने डॉर्टा आपल्या तंद्रीतून खडबडून जागा झाला. तो तडक फिलिपकडे चालत गेला व त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''तुम्हाला मी कैद करीत आहे! मला क्षमा करा, मी शिपाई आहे, आणि मी ज्याला आपली निष्ठा अर्पण केली आहे ते तुम्ही नव्हे!''

''ठीक आहे मॉन्शर डॉर्टा. पण आरामी कोठे आहेत?''

''आरामी परागंदा झाले!'' मॉन्शर फोके म्हणाले.

''मॉन्शर फोके!'' केविलवाणे स्मित करीत फिलिप उद्गारला.

''क्षमा करा महाराज!'' फोके नम्रपणाने म्हणाले. चौदावे लुई या घरात माझे पाहुणे म्हणून होते हे आपण ध्यानात घ्या!''

''या ठिकाणी सर्वच माणसे शूर व प्रामाणिक आहेत.'' फिलिप दीर्घ सुस्कारा सोडून म्हणाला, ''ठीक आहे मॉन्शर डॉर्टा, मी तुमच्याबरोबर येण्यास तयार आहे!'' डॉर्टा फिलिपला घेऊन बाहेर पडण्याच्या तयारीत असताच कोलबर्ट घाईघाईने आत आला व त्याने एक कागद डॉर्टाच्या हाती दिला. चौदाव्या लुईने दिलेला तो हुकूम होता. हुकूम वाचून डॉर्टाचा चेहरा लाली लाल झाला.

''काय आहे?'' फिलिपने विचारले.

''तुम्हीच वाचा!'' असे म्हणून डॉर्टाने तो हुकूम फिलिपच्या हाती दिला. फिलिप वाचू लागला ''मॉन्शर डॉर्टा यांना हुकूम देण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या ताब्यातील कैद्याला 'आईल सेंट मार्गारिट' येथे नेऊन ठेवण्याची व त्याच्या तोंडावर लोहमुकुट चढविण्याची व्यवस्था करावी! कैद्याला हा मुखवटा स्वत:च्या जीविताला धोका पत्करूनच काढावा लागेल, असा बंदोबस्त करण्यास विसरू नये!''

''रास्त आहे!'' फिलिप शांतपणाने म्हणाला, ''मी तयार आहे!''

''आरामीचे म्हणणे बरोबर आहे. राजरक्त इथंही सळसळत आहे!'' फोके पुटपुटले.

''लुईला आपल्या नौकऱ्या हव्या आहेत! भावना नको आहेत!! त्याला राज्यशास्त्र हे फार बडं नाव आहे सध्या!'' डॉर्टा म्हणाला व चालू लागला.

●●●

## १०. बेल बेटाकडे!

आरामी व पार्था यांची घोडदौड चालू होती; पण आपण कोठे आहोत व कोणीकडे जाणार आहोत याची पार्थाला काहीच कल्पना नव्हती. त्यांनी वॉक्सपासून सुमारे चाळीस मैलांचे अंतर काटले. ''आपण कोठे जात आहोत?'' पार्थाने विचारले.

''ब्लाईला!'' एवढेच मोघम उत्तर आरामीने दिले.

रात्री चंद्रोदय झाल्यानंतर त्यांनी ऑथाचे गाव ब्लाई गाठले. सर्वत्र चंद्राचा शुभ्र प्रकाश पडला होता. ऑथाचे निसर्गरमणीय निवासस्थान या चंद्रप्रकाशात न्हाऊन निघत होते. ''ऑथा! ऑथा!!'' आरामीने त्याच्या प्रासादापुढे उभे राहून हाक दिली. हाक ऐकून राऊल व ऑथा बाहेर आला. आरामी व पार्था यांना पाहून त्यांचा आनंद गगनात मावेना. राऊलने धावतच पुढे येऊन पार्थाच्या गळ्याला मिठी मारली. आरामीची पडलेली चर्या पाहून मात्र ऑथाला धस्स झाले.

''ऑथा, आम्ही संकटात आहोत!'' आरामी एकदम हताशपणाने म्हणाला.

''संकटात?'' कावराबावरा ऑथाने विचारले.

''होय! राजाविरुद्ध मी उभारलेला कट फसला असून एव्हाना माझा पाठलागही चालू झाला असेल!'' आरामीने खिन्नपणे कबुली दिली.

''राजाविरुद्ध कट? आणि तुझा पाठलाग? म्हणतोस तरी काय?''

''होय ऑथा, ही वस्तुस्थिती आहे आणि माझ्या

बरोबरच मी पार्थाचाही सर्वनाश केला आहे! त्याला बिचाऱ्याला यातील काहीएक कल्पना नाही, केवळ मित्रप्रेमाने त्याने माझ्याशी सहकार्य केले, पण आपण काय करीत आहोत व कशासाठी करीत आहोत याची त्याची काडीमात्र कल्पना नाही! मी त्याची फसवणूक केली आहे आणि तोही अजाणपणे फसला आहे!'' आरामी व्याकूळ होऊन म्हणाला. त्याचे हे भाषण ऐकून पार्थाही चकित झाला. आरामीशी आतापर्यंत सहकार्य करीत असता आपण काय करीत आहोत याचा विचार त्याने कधीच केला नव्हता. मित्रकार्य म्हणून तो आरामीच्या मागे धावत होता एवढेच! ''मग आता तुम्ही काय करणार आहात?'' चिंतातूर होऊन ऑथाने विचारले. ''इंग्लंडला किंवा स्पेनला निघून जाणार! माझ्या तेथे खूप ओळखी आहेत! पार्था अज्ञानाने यात गोवला गेला असल्याने राजा त्याला क्षमा करीलसे वाटते!''

''त्यात काही अर्थ नाही! तुला पार्थालाही न्यावे लागेल!''

''आरामी तुला माझ्याबद्दल वाईट वाटण्याचे कारण नाही! मी जे काही केले ते जरी तुझ्यासाठी असलं तरी मला त्याचे मुळीच वाईट वाटत नाही! जेथे तू तेथे मी!'' उदारहृदयी पार्था म्हणाला. पार्थाचे हे भाषण ऐकून ऑथाला भडभडून आले. या दोघांनी केलेल्या उचापतीमुळे आपल्या दीर्घकालीन मैत्रीला खंड पडतो की काय अशी भीती त्याला वाटू लागली. डॉर्टा राजाचा शरीरसंरक्षक व पथकाचा प्रमुख असल्याने या दोघांना हस्तगत करण्याची कामगिरी, त्याच्यावरच येऊन पडणार व मग मोठी विचित्र परिस्थिती निर्माण होणार याची त्याला कल्पना होती.

''स्पेन अगर इंग्लंड येथे जाणे सोपे नाही, आरामी!'' राजाने एव्हाना नाकेबंदी केली असेल!'' ऑथा काळजीने म्हणाला.

''आम्ही प्रथम बेल बेटाचा आश्रय घेऊ! तेथील शिबंदी माझ्या संपूर्ण परिचयाची आहे!'' आरामी म्हणाला.

''पण मॉन्शर फोके याला संमती देतील?''

''त्यांचा निरोप जाण्यापूर्वीच, मी तेथे जाऊन हजर होतो, माझ्या सर्वाधिकारित्वाखालीच या बेटाची तटबंदी व शिबंदी यांची रचना फोकेंनी केलेली असल्यामुळे, तेथे मला कोणीच अडविणार नाही. नंतर एखादे छोटेसे गलबत अगर होडी पैदा करून आम्ही निसटून जाऊ!''

''ठीक आहे; मग मी काय करू तुमच्यासाठी?''

''आम्हाला दोन उत्तम घोडे दे!''

''जरूर!'' असे म्हणून तत्काळ ऑथाने दोन उमदे घोडे सज्ज करून त्यांच्या हवाली केले.

निघताना पार्था, व आरामी यांनी ऑथाला मोठ्या प्रेमाने आलिंगन दिले. ऑथाच्या डोळ्यापुढे अंधारी आल्याप्रमाणे होऊन त्याचे मन एकाएकी उदास झाले. आरामी व पार्था दृष्टीआड होईपर्यंत ऑथा त्यांच्याकडे पाहात उभा होता. ते दिसेनासे होताच तो खिन्न मनाने परत फिरला.

दुपारी दोनचा सुमार असेल. पॅरीसला परत आलेला राजा प्रासादातील आपल्या बैठकीच्या खोलीत अस्वस्थपणाने येरझारा घालीत होता. आरामी व पार्था निसटल्याबद्दल राजाने फोकेंना जबाबदार धरले. राजाची सुटका करूनही त्यांच्यावर राजद्रोहाचा शिक्का बसावयाचा तो बसलाच! राजाची ही चलबिचल पाहात कोलबर्ट तेथेच उभा होता. फोकेंचा अध:पात झाल्याने स्वाभाविकच त्यांची जागा कोलबर्टला मिळाली होती.

''मॉन्शर कोलबर्ट, मॉन्शर डॉर्टा आले नाहीत काय अजून? त्यांचा तपास केला पाहिजे!'' राजा एकदम थबकून म्हणाला.

''त्यांनी एव्हांना यावयास हवे होते!'' कोलबर्टने एवढे म्हणण्यास व डॉर्टा ताड्ताड् बूट आपटीत तेथे येण्यास एकच गाठ पडली.

''कोण डार्टा!'' राजा आनंदाने ओरडला, पण डॉर्टाचा आजचा नूर काही चमत्कारिकच दिसत होता. तो फिकट तर दिसत होताच, पण मानसिक अस्वास्थ्याची दाट छायाही त्याच्यावर पडलेली दिसत होती. आत येताच तणतणल्यागत करून तो म्हणाला, ''महाराज, आपण शिलेदारांना हुकूम दिला आहे?''

''कसला हुकूम?''

''मॉन्शर फोकेंच्या प्रासादाबद्दलचा!''

''नाही!'' राजा निर्विकारपणे म्हणाला.

''हॉऽ, मला वाटलेच!'' मिशा पिंजारीत डॉर्टा

ओरडला, माझा अंदाज चुकणार नाही! याच साहेबांचे ते काम आहे तर!'' कोलबर्टकडे बोट करून तो कडवटपणे म्हणाला.

''पण कसला हुकूम ते तरी कळू दे!''

''फोकेंच्या प्रासादातील चीजवस्तू उपसून सडकेवर त्याचा बाजार मांडण्याचा! त्यांच्या नोकरांना मारपीट करण्याचा! आणि सर्व घराचा उकिरडा बनविण्याचा! सरकार! हा रानटी हुकूम आहे.''

''मॉन्शर!'' डॉर्टाची बडबड ऐकून हबकलेला कोलबर्ट हुकूम देण्याचे अवसान आणीत पुटपुटला.

''मॉन्शर! एऽ'' डॉर्टा मध्येच ओरडला; ''माझ्या शिलेदारांना राजेसाहेब हुकूम देऊ शकतात! पण आपण अशा रितीने लुडबुड केल्यास मला खपणार नाही! आपणास मी राजेसाहेबांच्या समक्ष सांगतो की, शिलेदार म्हणजे कानावर लेखण्या ठेवून बसणारे व आकडेमोड करणारे कारकून नव्हेत!''

''डॉर्टा! डॉर्टा!'' राजा पुटपुटला.

''हा अपमान आहे सरकार! राजशिलेदारांना कमीपणा आणणारी ही गोष्ट आहे! माझे शिलेदार म्हणजे बाजारबुणग्यांचा कळप नाही, का कारकुनांचं टोळकं नाही, सरकार!''

''होऽ हो! पण झालं तरी काय?''

''मला फोकेंना पकडण्याचा हुकूम दिला राजेसाहेबांनी, मला मान्य आहे! पण त्यांचे कागदपत्र जप्त करण्याच्या निमित्ताने त्यांच्या घरादाराची धुळदाण मांडण्यात आली आहे! आणि हे काम मला न सांगता, माझ्या हाताखालील शिलेदारामार्फत करून घेण्यात आले आहे! सरकार, आम्ही आपले नोकर आहोत, कोलबर्ट यांचे नाही!''

''मॉन्शर डॉर्टा!'' राजा जरा कठोर आवाजात म्हणाला. ''माझ्यासमोर आपण आपली भाषा जरा सौम्य कराल तर अधिक बरे होईल!''

ही संधी आपणास चढाई करण्यास योग्य आहे असे वाटून कोलबर्ट एकदम म्हणाला, ''मी राजेसाहेबांच्या हिताच्या दृष्टीने काही गोष्टी केल्या आहेत, पण त्यांचा असा विपर्यास एखाद्या अधिकाऱ्याने करावा ही गोष्ट अपमानास्पद आहे सरकार!''

''राजेसाहेबांचे हित!'' डॉर्टा मध्येच ओरडला. त्याच्या डोळ्यातून अग्निकणांचा वर्षाव होत होता. ''चाळीस वर्षे राजहितासाठी रक्त सांडणाऱ्या शिपाईगड्याला तुम्ही राजहिताच्या गोष्टी सांगता? एखाद्या निरपराध माणसाला छळण्यासाठी शिलेदारांनी कमरेला तलवारी लटकविल्या आहेत, अशी का तुमची कल्पना आहे?''

''फोकेंचे सहकारी दिसता आपण?'' कोलबर्ट कुचकेपणााने म्हणाला.

''फोकेंचे सहकारी म्हणवून घेताना, फोके अपराधी असते, गुन्हेगार असते, तर शरम वाटली असती मला, मॉन्शर कोलबर्ट!'' डोळे फिरवीत डॉर्टा म्हणाला.

नंतर तो राजाकडे वळून म्हणाला, ''सरकारांच्या हुकुमाप्रमाणे मी फोकेंना अटक केली आहे! भाषा मी सौम्य वापरू शकलो नाही, सरकार! कारण या आयुष्यात मी ती शिकलोच नाही!''

''ठीक आहे मॉन्शर डॉर्टा, आजपासून तुम्ही व कोलबर्ट स्नेही व्हाल असे मी धरून चालतो!'' असे म्हणून राजाने कोलबर्ट व डॉर्टा यांची हातमिळवणी करून दिली!

नंतर डॉर्टाला उद्देशून राजा म्हणाला, ''मॉन्शर फोकेंच्या बेल बेटाचा संपूर्ण कबजा तुम्हांस घ्यावयाचा आहे मॉन्शर डॉर्टा!''

''ठीक आहे महाराज!''

''या कामी काडीमात्र विलंब लावू नका! हवे तेवढे सैनिक दिमतीला घ्या!'' एवढेच बोलून राजा शेजारच्या खोलीत निघून गेला. कोलबर्ट डॉर्टाच्या जवळ येऊन म्हणाला, ''मॉन्शर डॉर्टा, ही कामगिरी तुम्ही चांगल्या रितीने पार पाडल्यास मला वाटतं राजेसाहेब तुम्हाला मार्शलचा हुद्दा देतील!''

''चांगल्या रितीने याचा अर्थ काय? मी कोणतीही कामगिरी अर्धवट कधीच टाकीत नसतो!''

''पण ही कामगिरी अवघड आहे!''

''ती कशी काय बुवा?''

''डॉर्टा, तुमच्या दोन मित्रांनी या बेटाचा आसरा घेतला आहे! आणि त्यांच्या मुडद्यावर पाय देऊन तुम्हाला त्या बेटाचा कबजा घ्यावा लागेल! ही कामगिरी सोपी वाटते

तुम्हाला?''

डॉर्टाने मान खाली घातली. त्याची मुद्रा चिंतातूर दिसू लागली. कोलबर्ट राजा असलेल्या खोलीत निघून गेला. थोड्याच वेळात डॉर्टाच्या हातात राजाच्या सहीचा पुढील हुकूम पडला. ''मॉन्शर डॉर्टा यांनी बेलबेटाचा संपूर्ण कबजा घ्यावा. बेटावरून कोणी प्रतिकाराचा प्रयत्न केल्यास, तटबंदी व शिबंदी जमीनदोस्त करावी. राजसैन्याला विरोध करणाऱ्या प्रत्येकाची राजद्रोही म्हणून सरसहा कत्तल करण्यात यावी!''

''अरेरे! पार्था, आरामी!'' डॉर्टा पुटपुटला, ''नाही! नाही!! मी माझे कर्तव्य करीत असताना तुमच्या केसाला धक्का सुद्धा लागू नये याची दक्षता घेतल्याशिवाय मी राहाणार नाही!''

तत्काळ डॉर्टाने आपल्या सैनिकांनिशी बंदराकडे प्रयाण केले. लढाऊ जहाज सज्ज करून बेल बेटाला वेढा देण्यासाठी तो निघाला.

●●●

## ११.शेवट!

बेल बेटाच्या तटबंदीवर सकाळच्या भरतीच्या लाटा धडाड् धडाड् करून आदळत होत्या. अशा वेळी बेटाच्या अगदी एकीकडील भागावर दोन व्यक्ती हात हातात घालून फिरत होत्या. समुद्रावर दूरवर नजर टाकीत एक व्यक्ती म्हणाली ''ते पाहा! ते पाहा!! दूरवर काय दिसत आहे!''

''काय आहे?''

''मला वाटते गलबत असावे''

''हो दिसते आहे काहीतरी खरे!''

''एऽक दोन, तीऽन, मला वाटते जहाजांचा एक काफिलाच्या काफिलाच असावा!''

''काय? आणि तो या बेटांच्या दिशेने येत आहे?''

इतक्यात तिकडून चाललेल्या कोळ्याला एकाने विचारले, काय रे बाबा, ही जहाजे कसली आहेत?'' कोळ्याने दूरवर नजर टाकीत व विचार करीत म्हटले, ''लढाऊ जहाजे दिसत आहेत, सरकारी.''

''आँऽ सरकारी जहाजे!'' आरामीने दचकून विचारले, ''कशावरून म्हणतोस तू?'' त्या व्यक्ती म्हणजे, आरामी पार्थाची जोडी होती.

''निशाणावरून!''

''बेट्या अजून जहाजही नीट दिसत नाही आहे! आणि तुला निशाण दिसते काय?'' पार्थाने कोळ्याला दाटले.

''काय राव सांगता. निशाण दिसत नाही काय?'' डोळ्यावर हात धरून दूरवर पाहाण्याचा प्रयत्न करीत कोळी म्हणाला. ''मला तर निशाण दिसते आहे!''

''कोळी किंवा व्यापारी जहाजावर निशाण लावीत नाहीत, हे लष्करी हालचाल करणारे आरमारच आहे खास! दर्यावर हयात गेली माझी साहेब!'' आपल्या ज्ञानाबद्दल शंका घेतल्याने नाखूश झालेला तो कोळी ठासून म्हणाला.

''ठीक आहे!'' आरामी एकदम म्हणाला; पार्था आपल्याला सज्ज झालेच पाहिजे! गोलंदाज तत्काळ तोफखान्यावर हजर होऊ देत! धोक्याचा इशाराही तत्काळ दिला पाहिजे!''

आरामीच्या या निर्णयाने गोंधळलेला पार्था म्हणाला, ''अरे पण काय भानगड आहे ते तरी कळू देशील की नाही?''

''पार्था हे राजाचे जहाज बेलबेटावर धडक घेण्यासाठी येत आहे आणि आपल्याला हस्तगत करण्याचा हा राजाचा प्रयत्न आहे! आता या प्रसंगाला तोंड दिल्याशिवाय गत्यंतर नाही.'' आरामी निर्वाणीने म्हणाला.

इतक्यात एक होडी बेटाच्या दिशेने येताना त्यांना दिसली. जहाजे पुढे न येता जागच्या जागी स्थिरावल्याप्रमाणे दिसत होती. होडीवरील पांढरे निशाण स्पष्ट दिसू लागताच आरामी म्हणाला, ''आपणाशी बोलणी करण्यासाठी कोणीतरी अधिकारी प्रथम पुढे आला

असावा!'' होडी किनाऱ्याला लागताच तीमधून उडी मारून एक लष्करी मनुष्य किनाऱ्यावर उतरला व पार्था आरामी उभे होते त्या बाजूस आला.

''आपण कोणाकडे आला आहात?'' आरामीने विचारले.

''मला मॉन्शर आरामींना भेटायचं आहे!''

''मीच तो! बोला आपलं काय काम आहे?''

''आपलं बेट फ्रान्सच्या राजेसाहेबांच्या हुकुमाने वेढण्यात आलं आहे!''

''मुख्य अधिकारी कोण आहेत?''

''राज-शिलेदारांचे कप्तान मॉन्शर डॉर्टा यांच्या नेतृत्वाखाली आरमारी अधिकारी हालचाली करणार असल्यामुळे तेच मुख्य अधिकारी आहेत असे मानण्यास हरकत नाही!''

''डॉर्टा!'' आरामी आश्चर्याने ओरडला.

''कोण! डॉर्टा!'' पार्थाने त्याला साथ दिली.

''होय महाशय, त्यांनीच हे पत्र दिलं आहे!'' असे म्हणून त्या इसमाने आरामीच्या हाती एक पत्र दिले.

''हे अक्षर तरी डॉर्टाचे दिसते,'' पत्रावरून नजर फिरवीत पार्था म्हणाला. आरामीच्या नजरेला पुढील मजकूर पडला.

''बेल बेटावरील सर्वांना अटक करण्याचा हुकूम घेऊन मी आलो आहे. फोकेंना कालच अटक करण्यात आली असून येथे कोणी प्रतिकाराचा प्रयत्न केल्यास नाइलाजाने शस्त्र उपसावे लागेल!'' खाली डॉर्टाची सही होती. पत्र वाचून होताच आरामी पांढरा पडला.

''काय मजकूर आहे?'' पार्थाने विचारले.

''विशेष काही नाही!''

''डॉर्टाचा आणखी काही निरोप आहे काय?'' आरामीने त्या माणसाला विचारले.

''तुम्हाला घेऊन येण्यास त्यांनी सांगितले आहे.''

''चला तर मग!'' पार्था एकदम घायकुतीने म्हणाला.

''शहाणा आहेस! आपल्याला आपसूक पकडण्याचा हा एक डाव असेल!'' आरामीने त्याला दाबले.

''हे पाहा त्यांना म्हणावे आरामी व पार्था यांनीच तुम्हाला बेटावर बोलाविले आहे!'' आरामीने त्या इसमाजवळ निरोप दिला.

''ठीक आहे! मग मी आपला निरोप घेतो!'' असे म्हणून तो इसम परत, होडीने जहाजाकडे निघून गेला. तो इसम जाताच आरामी व पार्था बेटावरील किल्ल्याकडे परत फिरले. आरामीने किल्ल्यात येताच सर्व लोकांना सज्ज राहाण्याचा सल्ला दिला, व तटावर उभे राहून समुद्राचे निरीक्षण करण्याचे काम चालू केले.

''डॉर्टा इकडे येईल असे वाटते तुला?'' पार्थाने विचारले.

''आपणाकडे आलेला निरोप खरोखरीच त्याचा असेल तर तो खास येईल!''

आणि खरोखरीच थोड्या वेळाने एक होडी किनाऱ्याला लागली व तीमधून डॉर्टा व आणखी एक लष्करी अधिकारी असे उभयता खाली उतरले. ''डॉर्टा! डॉर्टा!!'' आपल्या पहाडी आवाजात पार्थाने त्याला तटावरून हाक दिली. डॉर्टाने त्या दुसऱ्या अधिकाऱ्याला तेथेच उभे राहाण्यास सांगून पार्था, व आरामीकडे धाव घेतली. ''दोस्त हो बेलबेटावर हल्ला चढविला जाणार यात मला शंका नाही!'' तो पार्था व आरामी यांना म्हणाला, ''मी येथून परत जाताच राजीनामा सादर करीत आहे! नवीन अधिकारी येऊन लढाईला तोंड लागण्यापूर्वी तुम्ही येथून निसटण्याची सोय पाहा! माझ्या मागावर राजाने दुसरे अधिकारी ठेवले आहेत त्याचे प्रत्यंतर म्हणजेच तो खाली उभा असलेला दुसरा अधिकारी होय!'' डॉर्टाचे भाषण ऐकून पार्था आरामी चांगलेच चिंताग्रस्त झाले. थोड्याच वेळात डॉर्टा परत फिरला.

तो जाताच आरामी पार्थाला म्हणाला, ''पार्था, तुझा चेहरा इतका उतरलेला का? मी तुला सुरक्षित काढून नेण्याची व्यवस्था करीत आहे. काही झालं तरी मी मात्र इथंच राहून सामना देणार!''

''तू तिथं मी! मरावयाचे झालेच तर आपण दोघेही इथंच लढता लढता मरून जाऊ!''

''तुझा निर्धार असेल तर माझी ना नाही! पण मला तुझ्या चेहऱ्याकडे पाहून चिंता वाटते! तुला काही होत आहे काय?''

''मला एकाएकी अशक्तपणा वाटू लागला आहे!

आमच्या घराण्यात ही प्रथा आहे!''

''कसली प्रथा?''

''माझा आजा माझ्यापेक्षा दुपटीने दांडगा होता! पण त्यांना एक दिवस शीण आल्यागत वाटलं, पाय लुले पडले! व पुढं -अल्पावधीतच त्यांना मृत्यू आला! वडिलांचीही तीच स्थिती झाली! आणि आज मलाही शीण आल्यागत वाटत आहे, पाय लुले पडल्याचा भास होत आहे!'' पार्था उदासपणे म्हणाला.

''छत्, तुला काहीतरी उगीच शंका येत आहे! चल आपण जरा खाणंपिणं करू म्हणजे तुला हुशारी वाटेल!'' असे म्हणून पार्थाला घेऊन आरामी निवासस्थानाकडे गेला.

डॉर्टा जहाजावर जाताच आरामारधिपतीने त्याच्या हाती राजाचा एक खलिता दिला. राजाने डॉर्टाला सक्तीने रजा घेणे भाग पडून विश्रांतीसाठी तत्काळ पॅरीसला येण्याचा हुकूम दिला होता; बेल बेटावरील चढाईची सर्व सूत्रे, त्याच हुकुमाने दुसऱ्या एका अधिकाऱ्याकडे सुपूर्त करण्यात आली होती. डॉर्टा खाली मान घालून फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरण्यासाठी, त्याच्यासाठी तयार ठेवण्यात आलेल्या होडीत जाऊन बसला! त्याची होडी थोडीफार दूर गेली असेल नसेल एवढ्यात धडाड्ऽऽ धुडम् करून आरमारी तोफांनी आग ओकण्यास सुरुवात केली.

''आता यातून काहीतरी मार्ग काढलाच पाहिजे!'' पार्था अस्वस्थ मनाने म्हणाला.

''मला एकच मार्ग दिसतो!'' आरामी म्हणाला, ''किल्ल्याला लागून असलेल्या टेकडीमधून बोगद्याप्रमाणे एक मार्ग जातो, त्या मार्गाने निघून पलीकडच्या बाजूस असलेल्या खाडीत शिरावयाचे व होडीत बसून निसटून जाण्याचा प्रयत्न करावयाचा! दुसऱ्या बाजूने खाडीचा फाटा आत शिरत असल्याने या बोगद्याचं अस्तित्व तिकडे कळून येत नाही! प्रसंगविशेषी उपयोगी पडावा म्हणूनच हा मार्ग आहे!''

''हे ठीक आहे, पण राजाची जहाजे सर्वत्र पसरली असल्यानं आपण कोठे ना कोठे समुद्रावर त्यांच्या हाती लागणारच की!''

''रात्रीचा प्रवास करून पाहावयाचा जमलं तर!'

''आ ऽ फिरून पायातली शक्ती गेल्याप्रमाणे वाटते!'' पार्था विवळला पण एवढ्यात तोफांचा गडगडाट त्यांच्या कानी आला! डॉर्टाची काही एक मात्रा न चालू देता राजाने बेल बेटावर चढाई चालू केली ही गोष्ट स्पष्ट होती.

''आरमार! आरमार!!'' कोणीतरी ओरडले.

''बेटापासून आरमार अगदीच जवळ आले आहे! व जहाजावरून तोफा डागण्यात येत आहेत!'' एक इसम धडपडत आत येऊन धापा टाकीत म्हणाला.

''ठीक आहे! आता शस्त्राला हात घातलाच पाहिजे! आरामी उठता उठता म्हणाला. आणि पुढे पाचच मिनिटात बेल बेटावरील तोफखान्याने राजाच्या आरमारावर भडिमार चालू केला.

छोट्या होड्यांच्या साहाय्याने बेटावर सैनिक उतरविण्याची कोशीसही राजपक्षीयांनी चालू केली होती. बेटावरील थोडीफार शिबंदी त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडण्याची शिकस्त करीत होती पण सर्वच बेट असंख्य युद्धनौकांनी वेढले गेले असल्याने व हजारो सैनिक वाटेल ती नुकसानी सोसून बेटावर उतरण्यास चंग बांधून सिद्ध असल्याने, पार्था आरामींनी जातीने हाणामारीत भाग घेऊनही काही निष्पन्न होण्याचे चिन्ह दिसेना.

''पार्था, आपण आता सुटकेच्या खटपटीला लागल्याशिवाय गत्यंतर नाही!'' आरामी म्हणाला.

''तू म्हणतोस त्या गुहेच्या मार्गानेच ना?''

''होय!''

''पण पुढे तरी आपणास होडी कुठं मिळणार?''

''ती व्यवस्था मी करून ठेविली आहे! आता गुप्तपणे दारूगोळ्याचा भरपूर साठा करून ठेविला आहे.'' या बेटावरील शिबंदी मीच सुसज्ज केली असल्याने येथे काय आहे काय नाही याची प्रत्येक कल्पना आहे मला!''

''ठीक आहे, माझी तयारी आहे!''

आणि मग त्या दोघांनी लपत छपत बोगद्यात प्रवेश केला. पण त्याच घटकेला, तेथे उतरविण्यात आलेल्या राजसैनिकांच्या पुढाऱ्याला या दोन व्यक्ती गुहेत शिरलेल्या दिसल्या. त्याने आपली सैनिकांची तुकडी घेऊन गुहेत प्रवेश केला, व अंधारातून पार्था आरामीचा पाठलाग चालू केला.

आपल्यामागून काहीतरी हालचाल होत आहे याचा

सुगावा आरामीला लागताच पार्थाला तो म्हणाला ''आपला पाठलाग होत आहे पार्था! पाठलाग करणाऱ्यांना थोपविण्याचा काही तरी मार्ग काढला पाहिजे!''

इतक्यात ''गुडूऽम्!'' करून बंदुकीच्या फैरीचा आवाज त्या गुहेत दाटून घुमला; व काही गोळ्या सूं सूं करीत जमीन नांगरीत त्या दोघांच्या पायाजवळून गेल्या. एका कपारीचा आश्रय करीत आरामी म्हणाला ''येथील दारूचे कोठार उडवून या लोकांना इथल्याइथे गुहेत गाडणे हाच एक आता मार्ग दिसतो!''

''पण त्यांच्याबरोबर आपणालाही समाधी मिळेल ना?''

''दारूच्या कोठाराला सुरुंगाची वात लावून व तिला बत्ती लावून आपण पुढे सटकू! हे लोक कोठारापाशी येण्यास व स्फोट होण्यास एकच गाठ पडेल! तोपर्यंत आपण गुहेच्या दुसऱ्या तोंडास जाऊन बाहेर पडू व होडी घेऊन निसटूही!'' आरामी म्हणाला व तत्काळ ते दोघे अडोशाअडोशाने खोलवर शिरत दारूगोळ्यांच्या कोठारापर्यंत येऊन पोहोचले.

पाठलाग करणाऱ्यांनी चुड्या पेटविल्या होत्या; त्यांचा प्रकाश दुरून पुढे पुढे येताना त्यांना दिसू लागला. आरामी पार्था यांनी वात जोडून बत्ती दिली व धावण्यास सुरुवात केली.

''आऽ!'' पार्था विवळला ''आरामी तू पळ, माझे पाय गळाले! मला चालणे शक्य नाही'' पार्था निर्वाणीने म्हणाला. आरामीने त्याचा हात धरून व त्याला आधार देऊन हलविण्याचा खूप प्रयत्न केला, पण वज्रदेही पार्था जागच्याजागी खिळून गेल्याप्रमाणे झाला होता. तो पायात लुला पडला होता. त्याचा राक्षसी देह आरामीला इंचभरही हलेना. ''पार्था! पार्था!!'' आरामी कळवळून म्हणाला. त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.

''आरामी माझी वेळ भरली आहे! तू पळ! ऑथाला म्हणावं माझी सर्व मालमत्ता राऊलला मी देऊन टाकली आहे. मास्कटॉला राऊल सांभाळेल! नमस्कार डॉर्टा! आरामी तू पळ, वाईट वाटून घेऊ नकोस! राऊलसाठी मला राजाला काही ना काही शासन करावयाचे होतेच; म्हणूनच मी तुझ्याबरोबर होतो! माझी तुझ्यामुळं फसगत झालेली नाही! जा! पळ! देव तुझं कल्याण करो!'' एवढे बोलून पार्थाने धरणीवर अंग टाकले. अश्रू गाळीतच आरामीने पळण्यास सुरुवात केली. गुहेच्या दुसऱ्या तोंडास तो होडीपाशी आला व धडाड्! असा प्रचंड स्फोट होऊन गुहेचा मधील भाग जमीनदोस्त झाला. पार्थाला व त्याच्या पाठोपाठ आत शिरलेल्या सैनिकांना मातीधोंड्याच्या प्रचंड ढिगाऱ्यात समाधी मिळाली!

डॉर्टा फ्रान्सच्या भूमीवर उतरला तो तडक राजापुढे येऊन उभा राहिला. मध्यंतरी घडलेल्या हकिकतींची त्याला काहीच कल्पना नव्हती. त्याला पाहाताच राजा म्हणाला, ''मॉन्शर डॉर्टा, आपला आता वृद्धापकाळ झाला आहे. आपण खा, प्या, विश्रांती घ्या! मी जातीने तुमची सर्व व्यवस्था करून देत आहे!''

''पण महाराज बेल बेटावरील लोकांचं काय? त्यातील एक तर फार शूर व उदार हृदयी गृहस्थ आहेत!''

''तुम्हाला त्यांच्यासाठी माफी मिळवावयाची आहे काय?''

''होय सरकार! माझे ते जुने स्नेही आहेत! आम्ही चौघांनीही एकमेकांच्या जिवाला जीव दिला आहे आतापर्यंत!''

''ठीक आहे! मी त्यांना त्यांच्या अपराधाची माफी केल्याचं पत्र तुमच्याकडे देतो!''

डॉर्टाचा आनंद गगनात मावेना, माफीपत्र घेऊन तो एखाद्या कोंकराप्रमाणे उड्या मारीत बाहेर पडला.

''भोळा बिचारा!'' राजा स्वत:शी स्मित करून म्हणाला.

डॉर्टा बेटाकडे गेला आणि त्याला पार्थाच्या मृत्यूची बातमी कळली! त्याचा भीमकाय देह इतर प्रेतांबरोबर मातीतून उकरून काढण्यात आला होता. आरामीचा मात्र काहीच पत्ता नव्हता. पार्थाच्या मृत्यूने डॉर्टाला अत्यंत दु:ख झाले. एखाद्या लहान पोराप्रमाणे तो ढसा ढसा रडू लागला.

ऑथाला ही बातमी देण्यासाठी तो खिन्न मनाने ब्लाईकडे रवाना झाला. आरामी, पार्था ऑथाला सोडून ज्या दिवशी गेले त्याच दिवशी राऊल आफ्रिकेला जाणाऱ्या फ्रेंच सेनाविभागात दाखल होऊन तिकडे निघून गेला, व

मग ऑथाने अंथरूण धरले. त्याने अन्न-पाणीही वर्ज्य केले. ग्रीमाँ साश्रू नयनांनी त्याची शुश्रूषा करी व मालकाला खाण्यापिण्याचा आग्रह करी. पण ऑथा त्याला म्हणे ''आरामी आणि पार्था यांचे कुशल कळल्याखेरीज, ग्रीमाँ मी काही करू शकत नाही! आम्ही चौघेही एकाच सुख-संकटाचा आतापर्यंत उपभोग घेत आलो आहोत!''

आणि मग अकस्मात डॉर्टा एक दिवस ब्लाईला त्याच्या प्रासादामध्ये येऊन दाखल झाला. ''ऑथा! ऑथा!!'' ऑथाची ती अवस्था पाहून कळवळून गेलेला डॉर्टा ओरडला व धावत जाऊन त्याच्या छातीवर मस्तक ठेवून रडू लागला. साठ वर्षांच्या म्हाताऱ्या डॉर्टाचे मस्तक एखाद्या पोराच्या मस्तकाप्रमाणे कुरवाळून ऑथा म्हणाला, ''डॉर्टा! डॉर्टा!'' मग बराच वेळ कोणी काहीच बोलले नाही. इतक्यात एक इसम पत्र घेऊन आत आला. ग्रीमाँने पत्र घेऊन ऑथाकडे दिले. ऑथाने ते डॉर्टाकडे देऊन वाचण्यास सांगितले.

पत्र आरामीचे होते. स्पेनला पोहचल्यानंतर तेथून ऑथाला सविस्तर पत्र लिहिले होते. त्यात पार्थाच्या मृत्यूची हकीकत दिली असून, त्याने शेवटी व्यक्त केलेली इच्छाही आरामीने ऑथाला कळविली होती!

''पार्था! शूर पार्था!!'' खोल गेलेल्या आवाजात ऑथा म्हणाला. त्याच्या डोळ्यातून अश्रू व कपाळावरून घाम निथळत होता. चेहरा पांढरा सफेद पडला होता.

''ऑथा! ऑथा!!'' डॉर्टा ओरडला. ऑथाने इतका वेळ छातीवर ठेवलेला हात गळून खाली पडला. डॉर्टाने त्याच्या अंगावर धाडकन् अंग टाकले. ग्रीमाँ स्फुंदून स्फुंदून रडू लागला.....

ऑथाची उत्तरक्रिया आटोपून डॉर्टा विमनस्क स्थितीतच राजापुढे येऊन हजर झाला.

''मॉन्शर डॉर्टा, माफीपत्राप्रमाणे आपले स्नेही परत मिळाले आपल्याला?'' राजाने विचारले.

''सरकारी माफी पत्रापलीकडे गेले आहेत ते!''

''मला माहीत होते ते!''

''मग आपण माफीपत्र देण्याची तसदी का घेतली?''

''त्याचा उपयोग नव्हता म्हणूनच!'' राजा किंचितही विचलित न होता म्हणाला.

''मला हॉलंडच्या लढाईवर पाठवावे!''

''तुम्ही विश्रांती घ्यावी अशी माझी इच्छा आहे!''

''मला जगण्याची इच्छा नाही! या लढाईत मरता आले तर मला माझ्या मित्रांची भेट होईल व गॅस्कनचे मरणही मिळेल!''

''ठीक आहे!''

हॉलंडच्या तटबंदीस फ्रान्सच्या सैन्याने मोर्चे बांधले होते. उभयपक्षी तोफांच्या बंदुकींच्या फैरींचा भडीमार चालू होता. डॉर्टा एखाद्या उमद्या तरुणाप्रमाणे आख्या रणभूमीवर विजेसारखा चमकून जातीने सैनिकांच्या हालचाली करवीत होता.

एके दिवशी सकाळी, टेकाडावर उभे राहून डॉर्टा लढाईचे निरीक्षण करीत असता त्याचे हाती राजाचा खलिता आला. हॉलंडच्या लढाईतील डॉर्टाच्या कामगिरीवर खूश होऊन राजाने त्याला मार्शलच्या हुद्दा दिल्याची वार्ता त्या खलित्यात होती. खलिता वाचून डॉर्टाच्या श्रांत चेहऱ्यावर स्मिताची एक लकेर उमटली. इतक्यात एक प्रचंड स्फोट झाला! बेसावध डॉर्टाच्या छातीवर कसला तरी प्रचंड आघात झाला व तो टेकाडावरून कोलमडतच खाली आला.

त्याच्या तोंडातून रक्ताचे पाट वाहात होते! ''ऑथा, पार्था, मी येत आहे. नमस्ते आरामी! आता तुझी भेट या जगात नाही!'' तो कसेबसे पुटपुटला व मग सर्व शांत झाले.

●●●